म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र १२२८
IRBK-0101228
IRBK-0101228
IRBK-0101228

हा० क्र० ९२२६

मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. नों. नं. ७७४
ता. १.८.१९५३
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ८१०८
ठाणे.

वा. ना. नं. ८८७
१०/१२४३
दा. अं.

श्रीकृष्ण प्रसन्न

# पेशवाई नंतर

लेखकः—

**श्री. शांताराम गोपाळ गुप्ते**

" हिरा हरपला, रणरागिणी, सवता सुभा, युद्धाचा डंका, संधिसंग्राम, वेणुनाद, शिवसम्राट, रक्तध्वज, धनुर्धारी, सीमांतपूजा, देवदासी "
वगैरे नाटकांचा कर्ता.

नोव्हेंबर, सन १९३४

म. प्र. सं. शाखा, वाचनालय [illegible]
दा. क्र. ११२२८ गो. नि. ........
वि. नाटके

[ आवृत्ति पहिली ]

किंमत १२ आणे.

IRBK-0101228
IRBK-0101228

प्रकाशक :–
के. एन्. सापळे,
१५–१७, त्रिभुवन रोड, मुंबई नं. ४

या नाटकाचे गद्य स्वरूपाबद्दलचे त्याचप्रमाणें भाषांतर, पुनर्मुद्रण, चित्रपटाचे वगैरे सर्व हक्क लेखकाकडे आहेत.

मुद्रक :–
कृष्णाजी नारायण सापळे
रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस
१५–१७, त्रिभुवन रोड, मुंबई नं. ४

मराठी ग्रंथ संग्रहालय
वा. नं.
ता.
ठाणे.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद क्र.
ठाणे.

समर्पण—

# श्री. डोसाभाई माणेकजी

वकील, सातारा,

यांस त्यांच्या

## महाराष्ट्रेतिहासाच्या निस्सीम प्रेमाबद्दल

सादर समर्पण.

—ग्रंथकर्ता.

श्री. शांताराम गोपाळ गुप्ते

यांचीं

— लौकरच रंगभूमीवर येणारीं नाटकें —

पौराणिक

— संगीत —

# — धनुर्धारी —

अर्थात्

## द्रौपदी–स्वयंवर

— ऐतिहासिक —

# — दख्खनचा मोहरा —

— संगीत —

# — देवदासी —

— सामाजिक नाटिका —

# — सीमांतपूजा —

व

# पाखरूं !

# प्रस्तावना.

**मराठशाहीच्या** शेवटचा आणि आंग्लाईच्या जवळ जवळ सुरवातीचा हा "**पेशवाई नंतर**" चा काल आहे. हा प्रसंग महाराष्ट्राच्या इतिहासांत अपूर्व उज्वलतेनें घडून आला आणि त्यानंतर महाराष्ट्रांत नीच स्वार्थीपणाचा घनदाट अंधःकार पसरला! प्रस्तुत प्रसंग जितका करुण तितकाच हिंदूच्या जिव्हाळ्याचा आहे.

कोणाचींही मनें दुखवावींत किंवा आपसांत वैमनस्य वाढवावें अशी प्रस्तुत लेखकाची मुळींच इच्छा नाहीं; तर आमच्यांतील स्वार्थीपणानें, जातिद्वेषानें, आमच्या राष्ट्रीयत्वासही धोका कसा पोहोंचला हें दर्शविणें एवढेंच लेखकाचें उदिष्ट आहे. ज्ञात असलेला इतिहास सडेतोड कठोरपणानें मांडतांना, लेखक जनदेवतेच्या निःपक्षपाती वृत्तीवरच विसंबून आहे. सदर लेखनाचें कामीं **डॉक्टर बसू** यांच्या "The Story of Satara," पार्लमेंटरी पेपर्सवरून तयार झालेल्या "Ranee Sugunabai's Apeal" या दुर्मिळ पुस्तकांचा व श्री. राणेकृत प्रतापसिंहाचें चरित्र, त्याचप्रमाणें सातारच्या राजवटींत वाढलेल्या वृद्धांचा अनुभव व माहिती यांचा मला फारच उपयोग झाला आहे.

सदर नाटक रंगभूमीवर येत असतांना, सातारच्या राजवंशाशीं गेल्या अर्धशतकांत अत्यंत जिव्हाळ्याचा संबंध असलेले सातारचे जन्मानें "पारशी" परंतु कृतीनें आणि वृत्तीनें पूर्णपणें "मराठा" असलेले सद्गृहस्थ **श्री. डोसाभाई माणेकजी**, वकील, त्याचप्रमाणे **सरदार अण्णासाहेब मुतालीक, श्री. आर. एस्. हिरेमठ**, आय्. सी. एस्. कलेक्टरसाहेब, कै. रावसाहेब **लक्ष्मणराव पोतनीस**, हुजूर डेप्युटी सातारा, **रावबहादूर आर्. आर्. काळे**, व माझे स्नेही **श्री. जी. व्ही. गुजर** उपाध्यक्ष सातारा 'स्थानिक स्वराज्य', यांनीं जी मदत केली, सहानुभूती दाखवली, व सातारच्या प्रतापशाली वंशाबद्दल आदर दाखवला त्याबद्दल लेखक या सज्जनांचा आजन्म ऋणीच राहील.

सातारचे **श्रीमत्छत्रपती बालराजे शाहू महाराज**, यांनीं सार्वजनिक प्रयोगास न जाण्याची पूर्वपरंपरा मोडून, स्वतः प्रथम प्रयोगाचें अध्यक्षस्थान

स्वीकारून लेखकास उपकृत केलें आहे. त्याचप्रमाणें **श्रीमन्मातोश्री ताराराजे**, सातारा यांनीं देवीच्या मंदिरांत या नाटकाचा खास प्रयोग करविला, या ऋणाचें ओझें आजन्म शिरावर बाळगण्यांत लेखकास अभिमानच वाटेल !

सदर नाटक अल्पावधींत आपल्या **भारत भूषण संगीत मंडळी**कडून रंगभूमीवर आणून लोकप्रिय करण्याचें श्रेय माझे स्नेही व कंपनीचे मालक श्री. **दत्तोपंत भोंसले** व **नांद्‌णीकर** यांना आहे. पदांच्या सर्व चाली देऊन व पुस्तकांत घालण्याकरतां निरनिराळ्या प्रसंगाचे फोटो दिल्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. पूर्वपरिचय नसतांही सदर पुस्तकाचें प्रकाशनकार्य उत्साहानें अंगावर घेणारे रामकृष्ण प्रिंटिंग प्रेसचे मालक **कृष्णाजी नारायण सापळे,** यांचा मी अत्यंत आभारी आहे. त्याचप्रमाणें मला वारंवार निरपेक्ष मदत करणारे स्नेहांकित **श्री. गजाननराव ताम्हाणे,** ( गणेश टाईप फाउंड्री, मुंबई ) यांचा त्याचप्रमाणें प्रुफें तपासण्याचे कामीं मदत केल्याबद्दल **सौ. कलावती गुप्ते,** यांचा उल्लेख करणें माझें कर्तव्य आहे.

शेवटीं सदर नाटकाकडे ऐतिहासिक दृष्टीनेंच पहावें अशी चिकित्सक रसिकांना विनंति करून ही प्रस्तावना पुरी करतों.

सातारा,
बलिप्रतिपदा,
तारीख ७ नोव्हेंबर १९३४.

रसिकांचा सेवक,
**शांताराम गोपाळ गुप्ते.**

गा. ५५५

# पेशवाई नंतर

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.
ठाणे

## नांदी

[ रागः-देसकार. झपताल ]

गुंफी कवनहार ॥ गौरांगीपाळा ॥
मृदुला इंदुकांति ॥ स्वर्धूनि भालां ॥ ध्रृ० ॥
शुभपूर्ण गुणधाम ॥ वनिं जातसे राम ॥
सीता "सती" नाम ॥ गिरिराज-लीला ! ॥ १ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय.
वा. ना. नं.
ता.
ठाणे.

# अंक १ ला

## प्रवेश १ ला

[ **स्थळः**—सातारा रेसिडेन्सी, कर्नल ओव्हान्सचा तंबू. एक सार्जंट पहारा करीत आहे. ]

**ओव्हान्सः**—( प्रवेशून ) Oh, Mr. Natu arrives ! Sergeant, fire one in honour of Mr. Natu ( सार्जंट आवाज काढतो ) Oh lo ! Mr. Natu, welcome !

( बाळाजीपंत नातू प्रवेशतात )

**बाळाजीः**—नमस्कार, नमस्कार साहेब ! हें काय ? आपण बसावं ! चाकराला तोफेच्या सलामीचा मान दिल्यावर, छत्रपतींना काय चौघडातुतारीनं मान द्यायचा ?

**ओव्हान्सः**—बलाजीपन्ट, टेना कशा वागवावा, हें कलावा म्हनून टर टूमाला पूनाहून बलावला ! So glad to see you !

**बाळाजीः**—आम्हालाही पुण्याच्या दफ्तरकामाचा वीटच आला होता ! बुद्धिवान् मेंदूला त्या कारकुनी कामाची काय गोडी ? छत्रपती प्रकरण हातीं आलं ! मेंदूला थोडी हुशारी वाटली ! सरकारची भरीव अशी चाकरी तरी करतां येईल या प्रकरणीं !

**ओव्हान्सः**—बलाजीपन्ट, पूना केशमंडी, पेशवांच्या टाइमला टूमी लई आमाला मडट डेली टे आमी जानटो ! कुंपनीशरकार टूमाला लई चाटे ! आन् म्हनून टूमाला ईटं बलावला—

**बाळाजीः**—भलताच गौरव चाकराचा ! सरकार, बरीवुरी बुद्धी देवानं बाळाजीला दिली पण—कुंपनीसरकारनं त्याचं चीज केलं ! गुणांची पारख असणारे धनी फारच थोडे ! तरवार पराक्रमी खरी, पण ती कुशलतेनं वापरणारा वीराचा हात तिला जरूर लागतो ! बाळाजी लेखणीचा शिकंदर असला, तरी त्या लेखणीची करामत करून दाखविणारी बुद्धि आपलीच !

**ओव्हान्सः**—ओव्ह ! बलाजीपन्ट, टूमी लीनार म्हनून टूमाला आमी, टूमचा फेव्हरिट प्रेझेन्ट डेनार हाय ! Sepoy ( कॉलबेल वाजवतो )

**पट्टेवाला**:—Sir. ( ट्रे मधून फाउंटनपेन आणतो )

**ओव्हान्स**:—ये ले ! ये इंग्लिश पेन टूमाला लई चांगला, चांगला काम डेल !

**बाळाजी**:—हें काय ?

**ओव्हान्स**:—Fountain Pen ! ये इंकविगर चाल्टे !

**बाळाजी**:—फाउंत्तन पेन ! अहाहा ! शाईशिवाय चालणारी लेखणी !–पण बुद्धिशिवाय कशी चालेल ? इंग्रेजी कला ! इंग्रेजी ज्ञान ! हें सातारा प्रकरण याच लेखणीनं लिहून काढीन ! किती किती तरी लिहावं असं वाटतं !

**ओव्हान्स**:—बलाजीपन्ट, टूमी चाई पेल ?

**बाळाजी**:—नाहीं साहेब; मला आज उपास आहे ! मी चहा घेत नाहीं–

**ओव्हान्स**:—ओह् ! टूमी हींडू ! आमचा चाई नाई पेल ! पन आमचा मेमरी म्हनून टूमाला आमी टीसेट प्रेझेंट डेल ! सीपाय—

**पट्टेवाला**:—Sir ! ( ट्रे मधून टीसेट आणतो )

**ओव्हान्स**:—बलाजीपन्ट, आमी टूमाकडं येल टवा ये टी सेट टूमाला काम डेल ! !

**बाळाजी**:—काय सुंदर हे प्याले ! साहेब, उपकार झाले ! दातृत्व करावं आपणच ! कधींमधीं आपले पाय गरीबाच्या झोंपडीला लागलेच तर होईल उपयोग यांचा ! आम्ही दरिद्री हिंदू पितळी पेल्यांतून दूध पिणारे !—काय डौलदार ही घडण ! इंग्रेजी कला ! इंग्रेजी ज्ञान ! मातीचं सोनं करावं इंग्रेजबहादुरानींच ! या वस्तु मी आजन्म देवाप्रमाणं पूज्य मानीन ! ( नमस्कार करतो )

**पट्टेवाला**:—( प्रवेशून ) आपासाब सरकार आ रहा है !

**ओव्हान्स**:—Allow !

**बाळाजी**:—आप्पासाहेब सरकार ! आहाहा, लक्ष्मणाचे अवतार !

**ओव्हान्स**:—( सामोरे जाऊन ) Oh lo ! Welcome आप्पासाहेब ! ये बलाजीपन्ट !

**आप्पासाहेब**:—( प्रवेशून ) रामराम. रामराम बाळाजीपन्त !

**बाळाजी**:—नमस्कार सरकार ! हुजूर ओळख विसरले नाहींत तर ? साहेबांचा हुकूम आला नी धावतच आलों ! प्रकरण इतकं बिघडेल असं वाटलं नव्हतं !

**आप्पा०:**—बाळाजीपन्त, आपण आलांत म्हणून आतां धीर आला! लोक म्हणतात आप्पासाहेबांना काय कमी आहे? पण बाळाजी, अंतरीचे कढ जगाला कसे जाणवणार? आम्ही राजवाड्यांत राहिलों म्हणून राजे नाहीं! राजांच्या राजशाला, म्हणजे आमच्यासारख्या दुर्दैवी जिवांच्या बंदिशाला असतात—

[ रागः—**काफी. त्रिवट** ]

**या बांधिल्या बंधना ॥ राजशाला ॥ नुरत लव शांति नृपतिला ॥ धृ० ॥ मार्गे नभांत विशाल आंखला ॥ बंधन चंद्रा! देत लांछना ॥ १ ॥**

**बाळाजी:**—सरकार, असं उदास होण्याचं काय कारण? छत्रपती बुवामहाराजांचा स्वभाव माहीत कां नाहीं कुणाला? आम्ही दिवाणपदाची इच्छा दाखवली, ती नाकारण्यांत, छत्रपतींचा हेतु मन मानेल ती मुखत्यारी गाजवितां यावी—हाच होता ना? पण दयाळू कुंपनीसरकारला आतां सारे प्रकार उघड झाले आहेत!

**आप्पा०:**—दयाळू कुंपनीसरकारचा भरंवसा वाटला म्हणून तर इथपर्यंत धाव घेतली ना बाळाजीपन्त!

**ओव्हान्स:**—टे शारा खरा! पन परटापशिम रूलिंग प्रिन्स हाय! टेच्यावर लई पूरावा पाजे!

**आप्पा०:**—पुरावे—कसे पुरावे मिळणार? सत्ता त्यांच्या हातीं—प्रजेचं सुखदुःख त्यांच्या मर्जीवर!

**बाळाजी:**—करूं—याचाही विचार करूं! कुंपनीसरकारचा पाठिंबा आणि आपली कृपा असल्यावर काय वाटेल तें करूं ना सरकार! हीं ग्रामण्याचीं बंडं—हा दयाळू कुंपनीसरकारलाही न जुमानणारा उद्दामपणा—किती दिवस चालणार?—

**आप्पा०:**—आजच गांवांत पारसनीस वगैरे मंडळी ग्रामण्याबाबत निकाल देणार आहेत! छत्रपतीच्या इच्छेला मान तुकवणारे हे न्यायाधीश जनतेचीं मनं दुखवल्या शिवाय कसे राहतील? आजच कांहीं दंगाधोपा नाहीं झाला म्हणजे झालं!

**ओव्हान्स:**—टेला आमी काय करनार? हायनेस मुकत्यार है! पन आपाशाब टूमी आमाला मिलाला टर कुंपुनीशरकार टूमाला मडट डेल!

**आप्पा०:**—हृदय मोकळं करण्याकरतां तर इथं आलों ना? साहेब, साताराचा

आम्हाला पुरा वीट आला आहे! भावाच्या या नजरेकैदेपेक्षां आपण ठेवाल त्या कैदखान्यांत अवघी हयात गुजरायला आम्ही तयार आहोंत!

**बाळाजीः**—आरे आरे! शिव शिव! सख्या भावाची ही स्थिती! साहेब, अशा दुःखितांनीं आपणाकडं धाव घ्यायची नाहीं तर कुठं जायचं! आप्पासाहेब महाराज, साहेबांच्या जवळ आपलं हृदय मोकळं करा! दयाळू, न्यायी, अंतःकरण जिव्हाळ्याच्याही नात्याला लाजवील! चलावं-चलावं आंत;· बाळाजी आपला मित्र आहे!

**आप्पाः०**—चला! केंव्हां एकदां हृदयाचा पडदान् पडदा उकलून दाखवीन असं मल्राही झालं आहे!

**बाळाजीः**—चलावं तर- कुंपनीसरकार दयाळू आहे.

**ओव्हान्सः**—आच्छा-so glad! चलाव आमंडी! Sergeant, Resident not at home! [ जातात. ]

—पडदा पडतो—

## प्रवेश २ रा

( **स्थळः**—सातारा: जलमंदीर. दिलारा व राणी प्रवेशतात. )

**राणीः**—दिलारा, काय असेल तें असो; अलीकडं मनाला चैन असं नाहीं! एकसारखी मनाला हुरहूरच लागते! कांहीं तरी भयंकर संकट दैवानं पुढं वाढून ठेवलं आहे कीं काय असा धसका वाटतो जिवाला!

**दिलाराः**—सरकार, वैरी चिंती ना तें मन चिंतत असतं झालं! साताराची राजवट आताशीं कुठं आनंदांत हसूं खेळूं लागली आहे! असल्या चढत्या आनंदाला एकाएकी आवर घालतांना देवाचा सुद्धां हात कापूं लागेल! मराठ्यांना अद्याप खऱ्या आनंदाचे दिवस यायचे आहेत!

**राणीः**—नाहीं दिलारा! ते दिवस गेले असंच वाटतं! मराठ्यांच्या घोड्यांच्या टापांनीं उधळलेल्या धुळीनं एक वेळीं चंद्रसूर्यसुद्धां दिसेनासे झाले होते;—पण तो काल

आतां फिरला! इकडून हौसेनं बांधायचं झालेलं हें जलमंदीर,—हे किल्लेकोट आम्हाला लौकरच पारखे होणार, असंच वाटतं!

**दिलारा:**—वेड्या विचारांनीं सरकार उगीच कष्टी होतात झालं! असं काय कारण दिसलं सरकारना?

**राणी:**—ही आपसांतली दुही! भावोजींची वृत्ति कांहीं ठीक नाहीं! आजच म्हणे बाळाजीपंत नातू पुण्याहून आले! कांहीं तरी जबर कारस्थान चाललं असावं असं वाटतं! इकडचा स्वभाव असा मानी, तापट! अशा स्थितींत साहेबांचं मन बिघडायला काय अवकाश—?

**दिलारा:**—राजकारणाचे खेळ आपल्याला काय समजणार सरकार?—या मा-कोण?

**राणी:**—कोण? चिटणीस—रंगो?

( चिटणीस व रंगो प्रवेशून मुजरा करतात. )

**चिटणीस:**—कसूर माफ! सरकार, राबता बंद आहे हें न कळल्यामुळं आगळीक घडली!

**राणी:**—म्हणजे चिटणीस? त्यांत आगळीक कसली? छत्रपतींचीं दारं चिटणीसांना केव्हां लागलेलीं आढळलीं? लहानाचे मोठे करून, छत्रपतींना या पदवीला पोहचवीपर्यंत जिवाभावाची सोबत करणाऱ्या चिटणीसांकरतां कां हे रीतिरिवाज पाळायचे? लेकीसुनाप्रमाणं आम्ही! कर्त्या मंडळीकरितां नवा रिवाज सुरू करण्याचं कारण आजच नाहीं!

**रंगो:**—सरकारची कृपा सेवकांच्यावर अशीच अखंड राहो म्हणजे झालं—

**राणी:**—नव्या अमदानींत असा विचार यायला कारण रंगो?

[ राग:—**बिहाग. त्रिवट** ]

**कधिं नच प्रियकाज करितसां नृपराज ॥**
**करि विरुद्‌विनाश किंकरलाज ॥ धृ० ॥**
**दैवाचा हा खेळ निरंतर ॥ चळवि हातें**
**दास धुरंधर ॥ विफल नांव विसरतां**
**आत्मकाज ॥ १ ॥**

अंक १ ला

...ग्रंथालय ... ११

**रंगो**:—सरकार, चिटणीसांनी लेखणी काम लिहिणारे, आणि रंगोची जीभ तरी काय बोलणार? केल्या कृत्याचा उच्चार करूं नये, पण सरकार चिटणिसांनी स्वतःच्या कल्याणाकरतां केलें नाहींत इतके आत्मयज्ञ या प्रतापी पुण्यवानांच्या सेवेंत केले—पण—

**राणी**:—पण—पण काय? राजांच्याकडून—कांहीं भलतेंच—

**चिटणीस**:—जीभ झडून जाईल असे शब्द चिटणीस उच्चारतील तर! मायेची पाखर आहे म्हणून आज अन्न खात आहोंत हें विसरण्याइतके चिटणीस कृतघ्न नाहींत! पण याचा परिणाम—

**राणी**:—काय होणार?

**रंगो**:—कायस्थांबरोबर राजांना,—सरकार थोरल्या महाराजांच्या अंतापासून आजदिन पुष्कळ ग्रामण्यं झालीं! हुजूरनीं मोठेपणानं आमचं तोंड प्रत्येक वेळीं उजळ ठेवलं! चिटणीसांनीं थोरल्या महाराजांच्या राज्याभिषेकांच्या वेळीं विरुद्ध पक्षानं उठवलेलं काहूर शांत केलं;—पण त्यावेळेपासून कायस्थांबद्दल जी तेढ या द्वेषी मंडळींत उत्पन्न झाली आहे ती अजून नाहींशी होत नाहीं. भोंसल्यांच्या वंशाशीं एकनिष्ठ असलेली आमची जात, शंकराच्या पिंडीवरील विंचवासारखी विरोधींना वाटली तर नवल नाहीं! पण आम्हांवर उचललेले हात देवावर पडूं नयेत—

**प्रताप०**:—[ प्रवेशून ] कोण—कोण कुणावर हात टाकणार रंगो? परिस्थितीमुळं असे उचलले जाणारे हात तिथल्या तिथं आज आम्हांला कलम करतां येणारे नसले तरी आवरून मात्र खास धरूं? छत्रपतींची पुण्याई आजच इतकी संपली नाहीं कीं वाणीतलं सुद्धां तेज नाहींसं झालं असेल!

**रंगो**:—सरकार, त्याचाच आज कस आहे! हें दिव्य आलंच नसतं तर फार बरं होतं! श्रीनीं चिटणीसांच्याकडं पाद्यपूजा कबूल करून ऐनवेळीं ग्रामण्य उभारलं; पुन्हां कायम निर्णयाकरतां हुजूरनीं पंचायत नेमली;—पण सरकार यांत न्यायबुद्धीपेक्षां सूडाच्याच मनोवृत्ति विजयी होणार—

**प्रताप०**:—कशावरून?

**चिटणीस**:—आज पंचायतीचा निकाल म्हणून बेळगांवप्रांतीचे सुद्धां लोक शाहूनगरांत आले आहेत—त्यांचा इरादा—

**प्रताप०**:—त्यांचा इरादा कांहीं असो! छत्रपतीच्या मनगटांतली शक्ति आजच मेली नाहीं! केल्या उपकारांना विसरून "छत्रपतींच्याच गादीला पाय लाऊन

पेशवाईचीं वस्त्रं घेऊं "—असा उद्दाम जावसाल करणाऱ्या पुण्याच्या नारायणराव पेशव्यांचे शब्द भोंसल्यांच्या दप्तरीं दस्तुर आहेत! कोंकणांतून कफल्लक म्हणून येऊन चिटणीसांच्या मध्यस्तीनं, महाराजांच्या कृपेनं, महत्पदाला चढलेले पेशवे कर्तबगारीनं खंबीर असतील, पण मुत्सद्देगिरीनं " स्वार्थी "च ठरले हें आम्ही विसरणार नाहीं! छत्रपतींनाच बंदींत ठेवणाऱ्या पेशव्यांच्या—अमदानींत जुलूम अनाचार झाले असतील—पण आज पेशवाई नाहीं! पेशवाई नंतरचा काल आहे; छत्रपती थोडा तरी स्वतंत्र आहे—

**रंगोः**—आणि म्हणूनच पायांशीं धांवत आलों! बरा वाईट प्रकार झाला तर कायस्थापायीं असं नको व्हायला हुजूर!

**राणीः**—रंगो, पित्याच्या मानानं छत्रपतीचा दर्जा राखणारावर, राजांची कृपा न राहील तर राजा कर्तव्याला चुकला असं नाहीं कां होणार?

**चिटणीसः**—पण सरकार, स्वकीयांच्या अभिमानानं आपण भलता अविचार करूं नये एवढीच विनंति करायला—

**प्रताप०ः**—तें तुम्हीं सांगूं नका! स्वकीयांची बाजू सांवरण्याकरतां, किंवा अभिमानाच्या भरीला पडून आम्ही या प्रकरणांत पडलों नाहीं! चिटणीस हें ग्रामण्य तुम्हांवर नसून दौलतीवर आहे, हें तुम्हांला दिसत नसेल पण आम्हांला पटतं! या ग्रामण्याची तळी उचलणारे सातारमाहुलकर आहेत असं कां तुम्हांला वाटतं? हे हात फार दूरचे आहेत—

**राणीः**—म्हणजे?

**प्रताप०ः**—पेशव्यांनीं पटवर्धनांना दक्षिणेंत दौलत राखावी म्हणून कां पाठवलं? आपल्या वाढत्या वैभवाचा, चढत्या महत्त्वाकांक्षेचा मनोरा गदगदून हालवणारी शक्ति शाहूनगरांत सुप्तावस्थेंत आहे हें न जाणण्याइतके पेशवे नादान नव्हते! छत्रपतींना पायबंद घालण्याकरतां पाठवलेले पटवर्धन, आणि पेशवाईला मूठमाती देणारे बाळाजी या प्रकरणीं नसतील कशावरून?

**राणीः**—भावोजींची वृत्तिसुद्धां—

**प्रताप०ः**—समजतात हे चाळे समजतात आम्हाला! आप्पांच्या इतमामांत आम्ही काय कधीं कमी ठेवलं म्हणून त्यांचीं वृत्ति बदलावी? बाळाजीपंतांना आम्हीं सातारची दिवाणी देऊन, पेशवाईची पुन्हां प्राणप्रतिष्ठा आम्ही केली नाहीं, त्याचा सूड असा घरभेदानं घेतला जाईल हें आम्ही जाणून होतो! संभाजीराजांनीं ऐषा-

रामांत दौलतीची धूळधाण उडवल्याचा दाखला असतांना, वीस वर्षांपूर्वीच्या पेशव्यांच्या बंदीखान्यांतल्या वेदनांचा अद्याप विसरही पडला नसतांना, आप्पासाहेबांनीं घरभेद्यांचा हात धरावा? चिटणीस, हा, घरभेद पाहिला, ही कर्त्या जातींतली आत्मघातकी दुही पाहिली कीं पेशव्यांच्या कैदेंत, अज्ञातवासांत छत्रपतींच्या घराण्याचा शेवट होता तरी पुरवता–इतका वैताग येतो—

**चिटणीसः**—मेलेल्या रोपट्याला पुन्हां पालवी फुटत आहे हुजूर! यावेळीं असा निराश विचार काय कामाचा? थोरल्या राजांनीं हिंदुपदपादशाही स्थापन केली ती काय मखमाली रुजाम्यावर चालत जाऊन? कडेकपारींच राजांची दौलत लपली होती हें नव्यानं कां सांगायला पाहिजे?

**प्रताप०ः**—चिटणीस, तशा कर्तबगारीला आतां वाव कुठला? आहे याच परिस्थितींत प्रजा संतुष्ट रहावी, म्हणून आज एक तप प्रयत्न केला! गेल्या स्मृतींचं–पुनरुज्जीवन व्हावं म्हणून "हिंदुपदपादशहा" म्हणवून घेऊं लागलों; त्याचा विपर्यास झाला! आम्हांला वैभवाला चढवलेल्या "इंग्रेज–बहादुरांशीं द्रोही" असाच आमचा दुर्लौकिक झाला ना?

**राणीः**—दयाळू इंग्रज न्यायी आहेत! त्यांना खऱ्या खोट्यांचा निवाडा खात्रीनं करतां येईल!

**प्रताप०ः**—आणि म्हणूनच दुःखांत सुख मानतों आम्हीं! आज इंग्रजांनीं आम्हांला "गादीखालीं व्हा" असं फर्मावल्यानं जितकं वाईट वाटणार नाहीं तितकंच आप्पासाहेब बाळासाहेबांच्या कारवाईनं वाईट वाटतं!

[ बजाजी प्रवेशतो ]

**बजाजीः**—सरकार ब्राह्मण पंचायतीवर गर्दी करूं पाहतात.

**राणीः**—काय–काय म्हणतोस बजाजी?

**बजाजीः**—होय सरकार; पंचशाळेवर बाहेरगांवच्या ब्राह्मणांनीं गर्दी केली आहे!

**प्रताप०ः**—काय? शाहूनगरी म्हणजे बदमाष बेरडांचा बाजार झाला कीं काय कीं–त्यांत वाटेल त्यांनीं गर्दी करावी? छत्रपतीनं नेमलेल्या न्यायमंडळाची गादी म्हणजे पोरांचा पोरखेळ नव्हे! चिटणीस, रंगो, स्वतः जातीनंच आम्ही आज तिथं राहतों! "गोब्राह्मणांचे प्रतिपालक" एवढ्याच चांगुलपणाच्या आधारावर जर हे आमच्याही डोकीवर मिरी वाटूं पाहतील, तर त्यांची खरी जागा त्यांना अवश्य दाखवली पाहिजे—

**राणीः**—कांहीं अविचार तर नाहीं ना होणार ? मला भीति वाटते—

**प्रताप०ः**—याचं उत्तर जलमंदिरासारख्या शृंगारस्थानीं उभं राहून कसं देतां येणार ?

[ एक हुजऱ्या प्रवेशतो ]

**हुजऱ्याः**—सरकार, धाकटे महाराज कोंडवाबागेकडं जाऊं कां म्हणून विचारतात—

**दिलाराः**—ही धाकट्या महाराजांची मला तर सूचना नाहीं ना ? जावंच झालं—( जाते )

**हुजऱ्याः**—मग निरोप काय सांगूं ?

**प्रताप०ः**—भाग्यशाली शाहूराजांची सुखी अमदानी शाहूनगरीला नाहीं एवढंही आप्पासाहेबांना कळूं नये ? जा-परवानगीचं कारणच-नाहीं म्हणून सांग !—( हुजऱ्या मुजरा करून जातो.) राणीसाहेब, चिटणीस रंगोचीं ताटं आज इथंच होऊं द्यात ! या ग्रामण्याचा निकाल लागेपर्यंत, पंचायतीचा द्वारपाल छत्रपतीनंच व्हायला पाहिजे !

**चिटणीसः**—आल्या अन्नाला डावलूं नये म्हणतात; पण हुजूर—

**प्रतापः**—चिटणीसांच्या प्रतापी पूर्वजांनीं छत्रपतीच्या देहावर स्वतःच्या कातडीचं चिलखत, ऐन रणधुमाळींत लाखदां चढवलं आहे ! चिटणीसांच्या सोबतीची यां फुसक्या धांवपळींत जरूरी नाहीं !— तुम्ही निश्चिंत असा—

[ सर्वजण मुजरे करतात. जातात. ]

---

## प्रवेश २ रा

[ **स्थळः**—सातारा. कोंडवा रस्ता, दिलारा प्रवेश करते ]

**दिलाराः**—मेल्या बजाजीनं मी पाय काढलेला पाहिला वाटतं ?—धाकटे महाराज कोंडवाबागेकडं निघाले ऐकलं नी धीरच धरवेना !—महाराज दिलाराच्या मोहजालांत घेरले गेले तर या बजाजी-कांचनाचे भुंगे कायमचे मारून टाकायला मला काय उशीर ? कांचनाला नुसत्या नजरेच्या जरबेंत झुलवीत ठेवला आहे ! बजाजीच थोडा छट् दिसतो;—महाराज दिलाराच्या गळीं लागतील कां ?—कीं दिलाराच



**प्रतापसिंह:**—चिटणीसांच्या सोबतीची या फुसक्या धावपळींत जरूरी नाहीं! —[ पृष्ठ १४ ]

पांचहजारांच्या तैनातीच्या मोहानं तोंडघशीं पडणार?—मोहानं बुद्धिवरचा सुद्धां ताबा उडतो म्हणतात तें—खरं असेल कां?—या मा; आलीच स्वारी! आज बागेंत कोणत्या फुलवंतीचा बहर लुटायचा आहे?—

(रागः—पिलुजंगला. केरवा)

**प्रिय राया! तुझ्या पायां ॥ दिलवर!**
**माझा जीवप्राण ॥ धृ० ॥ पडे भूल माया ॥**
**झुले जीव वाया! ॥ नुरलासे जरा त्राण ॥ १ ॥**

[ आप्पासाहेब येतात ] गरीबपरवर—तश्रीफ लाईये—[ मुजरा करते ]

**आप्पा०**:—कोण? दिलारा? भलत्याच वेळीं सामोरी कां?

**दिलारा**:—सरकार बागशाही लुटायला निघाले—

**आप्पा०**:—तुला कसं कळलं?

**दिलारा**:—गरिबाला अधिकारानं समजणं अवघड असलं तरी मनाला प्याऱ्या जिवाचा इरादा कळतोच हुजूर—

**आप्पाः०**—आज कुणा नवतीची बागशाही लुटायला जात नाहीं आम्ही! तशा नाजुक मोहिमेंची दख्खल दिलाराला यापुढं खात्रीनं मिळेल!

**दिलारा**:—मग आज?

**आप्पा०**:—दिलारा तुझ्यासारख्या नाजूक फुलवंतीचा बहार हयातभर राजरोस लुटता यावा अशा महत्वाच्या—राहूं दे—दिलारा, असल्या मीठ्या गोष्टी करायला सध्यां आमचा दिल् शांत नाहीं!—कळेल—कळेल—तुला—

**दिलारा**:—मग अशीच मागं जाऊं? राजे, फुलांचा गजरा तरी पुढं केला असता; अमृताचा एकादा तरी प्याला—

**आप्पा०**:—या बुवासाहेबांच्या कडेकोट पाहऱ्यांतून कायमचे मुक्त झाल्यानंतर—प्यार दिलारा, तुझ्या हारगजऱ्याशीं खेळायला आम्ही मोकळेच आहोंत! या शिस्तीचा—आणि बंदिवासाचा आम्हाला पुरा वीट आला आहे! आज या गोष्टीचा—

**दिलारा**:—काय?

**आप्पा०**:—त्या गोष्टीचा आम्ही उच्चार करीत नाहीं! तुझ्यासारखी सुंदरी अशा वेळीं पुढं आली म्हणून आमच्या हातीं असलेल्या कामीं आम्हाला उमेद वाटते! या पुढं दिलाराला आम्ही विसरणार नाहीं ही खात्री ठेव—

( कवाली )

हा प्रेमाचा विसावा जिवाला ॥ धृ० ॥
भाव विलोला ॥ प्रकटुनि अतुला ॥
जणुं काव्य-कला, गुणिला, अवला ॥
पथ दावि मला;-ने यशाला ॥ १ ॥

[ जातो. दिलारा मुजरा करते ]

**बजाजी:**—( बाजूनें ) अस्सं ?

**दिलारा:**—आज कांहीं तरी नवलखबर आहे, त्याशिवाय महाराज असें तांतडीनं जायचे नाहींत ! जाऊं कां अशीच मागोमाग ?

**बजाजी:**—( प्रवेशून ) हां हां जी दिलारा बेगम ! वाड्यांतलं हें फूलपाखरूं फुलामागं उडालंच पाहिजे !

**दिलारा:**—कोण ? बजाजी ?

**बजाजी:**—हां जी बेगम !

**दिलारा:**—तूं कसा इथं ?

**बजाजी:**—जशा बेगम तसाच बजाजी !

**दिलारा:**—बजाजी, तुला हजारदां सांगितलं कीं तूं भलता नाद सोड; पण अजून तूं ताळ्यावर येत नाहींस !

**बजाजी:**—जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाहीं बेगम !

**दिलारा:**—अधिक जिवंतपणा जिभेंत दिसला तर त्याची निरवानिरव करणं दिलाराला अवघड नाहीं ! कांहीं स्वतःची पायरी ओळखशील ?

**बजाजी:**—कोण बेगम स्वतःची पायरी ओळखून वागतो ? आप्पासाहेब महाराजांशीं लघळपणा करणारी बेगम स्वतःची पायरी ओळखते, कीं आप्पासाहेब महाराज आपला दर्जा ओळखतात ? मग बजाजीनंच आपली पायरी कां पाळावी ? पायरी ओळखणारे हरीचे लाल थोडेच ! ! दोन दिवसांच्या आयुष्यांत " खाना पिना और मजा करना " याशिवाय कांहीं आहे ? स्वतःवरूनच सांग—

**दिलारा:**—राजाची राणी दिलारा;—तुझ्यासारख्या शिपुरड्यांला काय उत्तर द्यायचं ?

**बजाजी:**—काय खुशींत गाजरं खाते !—कसूर माफ राणीसाहेबां;—पण कांहीं दिवसांपूर्वी दिलारा बजाजीशीं निका लावायला तयार झाली होती !—

**दिलारा**:—त्यावेळीं दिलारा आंधळी होती !

**बजाजी**:—प्रेम आंधळं असतंच मुळीं !

**दिलारा**:—त्यामुळंच बजाजी मोठा दिसला !

**बजाजी**:—पण आतां मोठ्या घरचं मोठं प्रेम ! दिलाराला मागचं दिसावं कसं ? पाठीला थोडेच डोळे आहेत !

**दिलारा**:—तुझ्याशीं फाजील बडबड करायला मला नाहीं फुरसत !

**बजाजी**:—हां जी–तेंही बरोबर ! राजाच्या राणीला हुजऱ्याशीं बोलायला कुठं फुरसत असते ?

**दिलारा**:—आतां अधीक बडबडशील तर—

**बजाजी**:—प्रतापराजांचं राज्य आहे म्हटलं साहेबां !

**दिलारा**:—अशी धाकट्या महाराजांच्याकडं जाईन–आतां तेंच महाराज बरं–( स्वगत ) या मां–भलतंच बडबडलें मी !

**बजाजी**:—( बाजूस ) ही काय भानगड ? हरकत नाहीं ! ( उघड ) जा जा; मीही अस्सा जातों थोरल्या महाराजांकडं–नी देतों सांगून सारं–( जातो. )

**दिलारा**:—अस्सं काय ? ठीक आहे–[ विरुद्ध बाजूनें जाऊं लागते. समोर कांचन येतो ]

**कांचन**:—मनःपूतं समाचरेत् । त्यांत पाप नाहीं ! कोण दिलारा ? सांपडलीस शेवटीं ? सारा गांव पालथा घातला ! रंगमहाल, आरसे महाल, अलादत–पण दिलाराच्या पायांवर पडलं नक्षत्रं—

**दिलारा**:—नी तुमच्या तोंडावर ! हा दुसरा वेडापीर ! कांचन, अहो कांहीं लाज, अब्रू ? मी कोण–तुम्हीं कोण–आणि सडकेवर माझ्याशीं—

**कांचन**:—राजकारणांत हा ‘ तूं मी ’ भेद ! प्रेमांत हा भेदभाव नाहीं ! प्रेमांत एक प्रेम, प्रेम नी प्रेमच असतं ! त्यांत काळस्थळाला जागा नाहीं–! ‘नहि प्रणयेन सदृशं पवित्रमिह विद्यते ।’ काय समजलीस ? अग एवढा मोठा पेशवा बाजीराव, पण याच प्रेमानं मस्तानीचा मालक झाला—

**दिलारा**:—प्रेम ! कांचन, तुम्ही पढलेले पंडीत हें ‘ प्रेम प्रेम ’ म्हणतां–हें कसलं हो असतं प्रेम ?

**कांचन**:—आहाहा—प्रेम ! प्रेमांत, मखमल, फुलं, गालिजे, कापूस, अमृत–हाय–हाय ! सगळं असंच कांहीं तरी असतं ! हें पाहिलंस; आलेलं संकट टळावं

म्हणून राणीसरकारनीं देवीला एकादशणी केली आणि हा कंठा मला दक्षिणा दिला! पण प्रेमापुढं या कंठ्याची सुद्धां किंमत मी विसरून जाईन—

**दिलारा**—पाहूं-पाहूं कांचन? प्रेमाची चकाकी इतकी कां असते?

**बजाजी**:—(बाजूनें) अगदीं डोळे दिपण्या इतकी—

**कांचन**:—अग दूर हो—दूरून बोल—

**दिलारा**:—तर तर! आतांच मी जवळ नको कां? ठीक आहे, अशी जाऊन वाड्यांत उठवते कीं कांचन मला शिवतात येवढंच नाहीं पण माझ्या हातचं खातात, पितात, काय वाटेल तें करतात! (जाऊं लागते)

**कांचन**:—अग अग! तुम्ही बायका म्हणजे अस्तनींतला निखारा! केव्हां वस्त्राबरोबर देहाचा अंगार कराल त्याचा नियमच नाहीं!

**बजाजी**:—(प्रवेशून) नमस्कार कांचन! अहो देहाचा नाहीं पण अब्रूचा मात्र अंगार असलं जळतं अंगवस्त्र करतं हो! असं कसं हें पवित्र प्रेम चव्हाट्यावर आणलंत?

**कांचन**:—हा कसा उपटला इथं?

**दिलारा**:—बजाजी, फिरून तुम्ही कां आलांत?

**बजाजी**:—बजाजीचं प्रेम श्रीमंत नाहीं म्हणून कां आवडलं नाहीं-एवढं विचारायला!

**कांचन**:—म्हणजे?

**दिलारा**:—बजाजी पहा वरं—

**कांचन**:—काय? बजाजीवर सुद्धां तुझं प्रेम?

**दिलारा**:—म्हटलं कां मी तसं?

**बजाजी**—प्रेम नुसतं गालावर रंगतं, डोळ्यांत चमकतं आणि जिभेआड दडतं!

**कांचन**:—माय माझे, चांगलं केलंस! आतां काय हात जोडूं तुला?

**बजाजी**:—इष्काचा दिवाणा प्यारीचा बंदा असतोच मुळीं!

**कांचन**:—पण बजाजी, हात जोडतों आतां! बाहेर कुठं—

**बजाजी**:—त्याची नका हो करूं काळजी! पण माझ्या सावलीचा विटाळ मानणारे तुम्ही कर्मठ कांचन—जाऊं द्या झालं!

**कांचन**:—कशी लाखांतली गोष्ट बोललास? खाजगी अंधार कुणी कुणाचा पहावा?-सुखांत जगायचं असतं-बजाजी सुखांत जगायचं असतं ना आपल्याला?

**बजाजी**:—हें कां मी सांगायला पाहिजे? दिल्‌दिल्‌रुबा दिलारा हें प्रीतीचं कोडं सोडवायला खडीच आहे!

**दिलारा**:—आहेच मुळीं! इष्कांत—बजाजी काय—कांचन काय—

**बजाजी**:—कीं धाकटे महाराज काय—

**दिलारा**:—एकसारखे प्रेमाचा फेर धरून, प्रीतीच्या कारंज्याभोंवतीं गुंगायचेंच! हा प्रीतीचा राजा साऱ्यांनाच सारखा प्यार असतो हो! त्याला जातगोत, गरीबी श्रीमंती यांचा विचारच नसतो!

(कवाली)

**प्रेम-गुणिं या ॥ सखया! ॥ प्रणयरंग खेळा रे! ॥ धृ० ॥**
**रतिपति बोलतसे ॥ खेळतसे हृदयिं प्रिया! ॥ धनिक न नीच न या ॥ मोदमया जगमाया ॥ १ ॥**

— जातात —

---

## प्रवेश ४ था

[ **स्थळ**:—सातारा राजवाडा. एक महाल. रंगो प्रवेश करतो ]

**रंगो**:—पंचांनीं निकाल शेवटीं कायस्थांच्या बाजूनं दिला!—भोंसले क्षत्रिय ठरले! पण हीं पुरलेलीं हाडं उकरून काढण्यांत आमच्या विद्वानांना भूषण वाटतं! नामशेष झालेल्या हिंदूपदपादशाहीचा पुनरुद्धार झालेला पाहून, नवजीवनाचा संचार पुन्हां महाराष्ट्रांत व्हावा;—पण स्वार्थी कर्तबगारांच्या मतलबी दृष्टीला हें दिसत नाहीं!—प्रतापराजांना राज्याभिषेक होऊन पुरं संवत्सर लोटलं नाहीं तोंच स्वराज्याच्या भाग्यक्षितिजावर, स्वार्थसाधूंची काळी छाया दिसावी? बाळाजी, मेलेल्या पेशवाई नंतर नव्या हिंदूपदपादशाहीच्या पेशवाईचा मूळपुरुष होण्याची आपली इच्छा छत्रपतींनीं नाकारली, म्हणून ग्रामण्याचं बंड उभारलंत? छत्रपतीविरुद्ध पराचा कावळा करण्याची कारवाई सुरू केलीत? पेशवाईच्या प्रेताची चिता अद्याप पुरी विझली नाहीं, तर पुन्हां जीव धरूं पाहणाऱ्या छत्रपतींच्या गादीलाच गाडण्याची इच्छा?—आणि तीही स्वार्थी अपमानामुळं?—बाळाजी, उद्यांचा महाराष्ट्र असल्या नीच कृत्याबद्दल आजच्या कारवाई पिढीच्या तोंडावर थुंकेल—हो थुंकेल!

[ रागः—भीमपलास. दीपचंदी ]

नीचाधमा हृदय ना ॥ देवता नांव ना ॥
पावना कामना ॥ जीवासि लवहि ना ॥ धृ० ॥
राजा जनां देव ॥ करि विमल नरनांव ॥
जरि 'धन्य' हा भाव ॥ निपटमति नमत ना ॥ १ ॥

*बजाजीनें दिलेली बातमी खरी असेल कां !—*

**राणी**—( प्रवेशून ) कोण रंगो–इतकं तातडीनं यायचं कारण ? असे विचारांत कां ?

**रंगोः**—काय सांगूं सरकार ? शंका बोलून दाखवायलाही चाकराजवळ बोल नाहींत;–ऊर भरून येतो.

**राणीः**—म्हणजे रंगो ? गादीवर नवं संकट ?

**रंगोः**—मासाहेब, हुजूरच्या प्रयत्नांचा विपर्यास होणार कीं काय भीती वाटते !

**राणीः**—याचा अर्थ काय समजावा ?

**रंगोः**—मासाहेब, चिटणीसांना ताटांतला घांस काढून आजवर छत्रपतींनीं दिला;–बऱ्यावाईट प्रसंगांत चिटणीस सरकारकदमाशीं सेवेला रुजूं राहिले;–पण हें चिटणीसांचं भाग्य सर्वांनाच कुठं पाहवतं ? मासाहेब, हल्लींच्या स्वार्थी काळांत धूर्तांच्याच इच्छेनं थोडं नको कां जायला ? बाळाजीपंत नातूंना दिवाणपद सांगण्यांत स्वराज्याच्या संकटापेक्षां कल्याणच झालं असतं असं आतां वाटतं !

**प्रतापः**—( प्रवेशून ) स्वराज्याच्या कल्याणाची काळजी स्वार्थी लोकांनीं नको करायला ! आजदिन निस्वार्थ बुद्धिनं स्वराज्यतोरणाला अभिमानानं मस्तकांचा नजराणा देणारे वीर,–आम्ही जर असल्या स्वार्थी लोकांना जवळ करून दौलतीचं हित साधूं लागलों–तर आम्हांला हंसतील ! पूर्वजांच्या कीर्तीला साजेशा तोलानंच राखता आली तर त्या दौलतीची आम्हांला जरूरी आहे ! रंगो, असा काळजीचा कोणता मोका दिसला ?

**रंगोः**—घरभेद–सरकार, आप्पासाहेब कोंढवबागेंत बाळाजींशीं खलबत करायला गेले होते–अशी बजाजीनं बातमी—

**प्रतापः**—याचाच–याचाच वैताग येतो आम्हाला ! हा घरभेद पाहिला कीं तळपायाची आग मस्तकाला जाते ! पांचहजारांची महिना नक्त नेमणूक असतांना,

आप्पांना समाधान नाहीं ! यांच्या बाहेरख्याली चैनी करतां तीस हजारांचं देणं द्यायला आम्ही तयार झालों, तरी अदालतींत लाचाचे प्रकार चालूंच आहेत ! इंग्रजसरकारचं आमच्याबद्दल मत दूषित करायला बाहेरचे शत्रू पुरेनासे झाले म्हणून हे घरभेदे कर्मचांडाळ असे दौलतीवर उठले !

**राणी**:—यांत मार्ग कसा काढायचा ? बाळाजींनाच वळवून कांहीं उपयोग नाहीं कां होणार ?

**प्रताप**:—सिंह जर्जर झाला म्हणून कोल्ह्याजवळ दयेची याचना कशी करील ? " छत्रपती हिंदूच नव्हेत " इथपर्यंत पटवर्धन–थत्ते मंडळीकडून काहूर उठवणारा बाळाजी, दौलतीला सावरण्याकरितां आम्ही जवळ करूं–असं कां आपल्याला वाटतं ?

**रंगो**:— जातीनंच अशावेळीं साहेबांची गांठ घेतली तर उघड बोलता तरी येईल !

**प्रताप**:—रंगो, साम्राज्यसत्तेच्या दारीं पन्नासदां जाण्यांत छत्रपतीला कमीपणा नाहीं ! बाळपणीचे दिवस आम्हीं विसरलों नाहीं ! अन्नाला महाग असणारे भोंसले आज ज्यांच्या कृपेनं नीरेपासून कावेरीपर्यंत राज्य करतात, त्यांच्याशींच कृतघ्न होतील हें शक्य नाहीं ! पण त्यांचाही अलीकडं गैरसमज झालाच आहे ना ? बाळाजीनं आम्हांला दौलतीवर आणण्यांत मदत केली एवढ्याच करतां म्हणून, त्यांच्या ओंजळीनें आम्ही पाणी–प्यायला तयार नाहीं ! बाळाजीच्या वृत्तींत तो स्वार्थी नीचपणा नसता तर असला मुत्सद्दी–दौलतीचा पेशवा म्हणून आम्ही जरूर जवळ केला असता–पण—

**रंगो**:—आतां मानापमानापेक्षां दौलतीच्या रक्षणाकडंच प्रभूंनीं नको कां पाहायला ? हल्लीचा काळ समशेरबहाद्दरीचा नाहीं–मुत्सद्दी डोक्याचा आहे हें हुजूरना मी कां सांगावं ?

**प्रताप**:—पण रंगो मुत्सद्दी डोकं तरी आजच्या परिस्थितींत काय करणार ? आमच्या विरुद्ध उठलेलं वादळ कोणत्या स्वरूपाचं आहे हेंच समजेना तर त्याचं निवारण तरी आम्ही कसं करणार ? अशा वेळीं केल्या प्रयत्नांचा विपर्यास होऊन, आम्ही जास्तच गुरफटले जाणार नाहीं कशावरून ?

**राणी**:—पण कुलाच्या अब्रूकरतां तरी पुढं व्हायला नको कां ? भावोजींचा अविचार घरची परिस्थिती उघडी करणार नाहीं कशावरून ?

**प्रताप**:—राणीसाहेब, आप्पासाहेबांची आम्ही योग्य ती बरदास्त ठेवली असतांना, त्यांचं समाधान नाहीं ! गादीचा हव्यासच जर त्यांना सुटला असेल तर सरळ

प्रतापसिंहाजवळ त्यांनीं तसं बोलून दाखवावं! त्याच घडीला त्यांना स्वहस्तानं राज्याभिषेक केला नाहीं तर "हिंदुपदपादशाह" म्हणून गादीला फुकट पाय लावला असं होईल!—

[ पडद्यांत तोफेचा आवाज ]

**रंगो:**—ही पहा—आप्पासाहेबांची स्वारी निघाली म्हणून इशारत! बातमी खरी!—सरकार मस्तक शांत ठेऊन आपण जरूर जातीनं रेसिडेंटकडं जावं! कुल-पूर्वजांची आण आहे आपल्याला! सरकार, भावि आपत्ति टाळण्याकरतां, एकवार सेवकाची विनंति मानावी! आमच्यापायीं झालेलं ग्रामण्य आणि आज पांच पिढ्या गादीचं खात असलेलं निमक—रंगोला शांत बसूं देत नाहीं हुजूर!

**प्रताप:**—ठीक आहे! रंगो, या प्रकरणाचा एकदां सोक्षमोक्ष झालाच पाहिजे! आणि या देशबुडव्यांनीं जरी साहेबांचं मन दूषित करून, त्यांच्या हातीं अन्याय केला, तरी आपली बाजू थेट विलायतीं मांडूं! पण रंगो—एक लक्षांत ठेवा, चिटणीसांना सांगा कीं तुम्ही आमच्यापासून आतां थोडे दूरच रहा! तुमच्या स्वामिनिष्ठेचा चांगला मोबदला मिळण्याऐवजीं, कदाचित् तुमचा सत्यानाश आमच्या पायीं होईल! झाली स्वामिसेवा पुरे झाली—

**रंगो:**—सरकार, जळत्या राखेचे तोबरे खाल्ले, पण जबान हालली नाहीं कीं इमान फिरलं नाहीं, त्या खंडोबल्लाळचे वंशज छत्रपतींच्या अन्नानं जगले, कृपेनं मोठे झाले ते छत्रपतींच्या पायीं स्वतःवर येणाऱ्या संकटांना आज पाठ दाखवण्याकरतां नाहीं! छत्रपतींची सावली होऊन राहणं हेंच चिटणीसांचं ब्रीद आहे.

**प्रताप:**—पण आजच्या परिस्थितींत असल्या एकनिष्ठ देवांचं रक्षण करायला प्रत्यक्ष छत्रपतीचेच हात तोकडे पडतील कदाचित्!—रंगो—तुम्हांवर इतराजी म्हणून नव्हे तर आल्या पेचांतून सुटण्याकरतां हा उलटा डाव दाखवणं बरं नाहीं कां?—विचार करा;—तुमच्या सांगीप्रमाणं आम्ही साहेबांची स्वतःच गांठ घेतों!

**राणी:**—रंगो, स्वारीबरोबर तुम्हीही जा;—वेळ प्रसंगच तर—

**प्रताप:**—नको—रंगोनीं नको यायला आमच्याबरोबर! वस्तुस्थितीचा ताळमेळ घालण्याइतका माथ्याचा थंडपणा अद्याप आमच्यांत आहे! [ जातो ]

**राणी:**—रंगो, कांहीं वेळीं फाजील आज्ञाधारकपणा घातुक ठरतो! ताबडतोब स्वारींमागं जा! भावोजीवरील राग कदाचित् साहेबांच्याकडच वळेल! ग्रह बरे

नाहींत आपले! रंगो, निष्ठेचं बळ, मुत्सद्याचं डोकं आणि चढत्या आवेशाला आवर घालणारी रसाळ रसवंती देवानं तुम्हांला दिली आहे! राजांचा विचारावरचा ताबा सुटला तर आपल्या हजरजबाबी वाणीनं स्वारीच्या विकाराला आवर घाला! जा—

**रंगोः**—कुलपूर्वजांची पुण्याई चाकराला जरूर यश देईल!-(मुजरा करून जातो.)

**राणीः**—राजाचं वैभव पराक्रमी समशेरीपेक्षां एकनिष्ठ सेवकांवरच असतं कां? देवा-रंगोचिटणीसासारख्या जिवलग जिवांना उदंड आयुष्य द्या म्हणजे आमच्या दौलतीला नी कीर्तीला कमी नाहीं!

(कवाली)

**सुकीर्ती नृपासी राहो॥ सुखि दास ठेवा; देवा!॥ ध्रु०॥**
**नभीं चढतसे चंद्रा अतुलता॥ चमचमती तारा॥**
**जरि सदा त्या; देवा!॥ १॥**

(पडदा पडतो)

---

## प्रवेश ५ वा

[ **स्थळः**—सातारा. राजवाड्याची एक बाजू. कांचन प्रवेशतो. ]

**कांचनः**—चांगलाच गळा कापला कीं काल दिलारानं! कोणतीहि गोष्ट षट्कर्णी होणं चांगलं नाहीं—असं सूत्र आहे! पण उद्यां साऱ्या शाहूपुरींत माझी बेअब्रू तो बजा करणार! कांचनाचं उणं पडतं कुठं नी त्यावर झडप घालतों केव्हां असं आधींच याला होऊन गेलं होतं!-छेः; या रंगेलपणांत चांगलंच थोबाड रंगलं आज! तो उपटसुंभ त्याचवेळीं कसा आला सैतानासारखा तिथं? काय वाटेल तें करून त्याचं तोंड बंद केलंच पाहिजे!

**बजाजीः**—कां कांचन, असे नक्षत्रं काय मोजतां? फूलपांखरूं वर उडालं कीं काय?

**कांचनः**—हां-दुरून बोल-दुरून बोल! मी पूजेच्या तयारींत आहे-दिसत नाहीं तुला?

**बजाजीः**—वा जगद्गुरू! दिलाराचा नाहीं वाटतं विटाळ होत? तो तर मराठाही नाहीं!

**कांचनः**—लहान तोंडीं मोठा घांस घेऊं नकोस! अंधारांतल्या गोष्टी अशा चव्हाट्यावर जर शहाणे लोक आणूं लागले तर जगायलाच नको—

**बजाजीः**—याचं उत्तर दिलाराला विचारा! कांचन, पूर्वीचे मंत्रतंत्राचे दिवस गेले म्हटलं! झकपक् आंग्लाई आली आहे! सोन्याचं मोल ठरवायचं तरी कस लावावा लागतो; मग जातीच्याच कथलाला कोण विचारणार?

**कांचनः**—अरे हळूं बोल–हळूं बोल–कुणी ऐकेल ना?

**बजाजीः**—असलं नाजूक ऐकायला आपल्याशिवाय कुणाचेच कान लांब नाहींत! कांचन, अहो देवाचं देवघर म्हणजे रंगमहाल करणारे तुम्ही–तुम्हाला कसली—

**कांचनः**—काय करूं रे?

**बजाजीः**—शाप द्या–शाप द्या–शापून भस्म करा बजाला—

**कांचनः**—तसंही केलं असतं! पण जाऊं दे—

**बजाजीः**—जाऊं दे; तूं खूप जाऊं देशील! पण जिवंत असतांना मी तुला जाऊं दिलं पाहिजे ना? थांब; आईसरकारनां सांगून तुझी पूजाच बंद करवतो!

**कांचनः**—काय निष्ठुर आहेस रे! अरे शिवरायांनीं गोब्राह्मणाकरतां देह झिजवला—

**बजाजीः**—मी तुला झिजवणार आहे!

**कांचनः**—फारच मोठी पुण्याई पदरीं बांधशील! ब्रह्महत्या लागेल ना वेड्या! अरे–इंद्राला सुद्धां ब्रह्महत्या बाधली!

**बजाजीः**—पण तुझी खात्रींनं बाधणार नाहीं! दिलाराशीं दिलजमाई करणारे तुम्हीं—

**कांचनः**—पण प्रायश्चित घेतों ना मी? प्रायश्चित्तानं पुन्हां शुद्धि प्राप्त होते! प्रायश्चित्तानं सारीं पापं जळून जातात!

**बजाजीः**—वारे माझ्या राजा! काय बेसुमार बरळतो आहे! पण कांचन–दिलाराचं हें पाप—

**कांचनः**—माझे आई, हात जोडतों तुला पण इथं तिचं नांव नको घेऊस! माझं नाकच तुझ्या हातीं गेलं कीं!

२५

**बजाजी**:—म्हणून काय झालं ? तुमचं तोंड तर चालूंच आहे ना ? तुम्हाला कशाची भीती ?

**कांचन**:—खंडोबा-तुझी ! दुसऱ्या कुणाही देवाची माय नाहीं व्याली या कांचनाला भीति दाखवायला ! ( नमस्कार घालतो, दिलारा येते )

**कांचन**:—कांचन, हें हो काय ?

**कांचन**:—कोण दिलारा ? अरे अरे-वाड्याची तख्तपोशी याच वेळीं कोसळून कां नाहीं पडत ? याच वेळीं देवघरांतला आंधार कां नाहीं झाला इथं ?

**दिलारा**:—कां ? पाय घसरला होय कांचन ?

**बजाजी**:—तुझ्यापायीं त्यांचा केव्हांच पाय घसरला आहे ! आतां दांत तेवढे पडले !

**कांचन**:—( उठून ) आतां पुरे कर ना ही घसरगुंडी ! माझे दांत पडले पण तुझं तोंड वाजतयच ! !

**दिलारा**:—तुम्ही भलत्याच्याच तोंडाला तोंड देतां त्याचा हा परिणाम !

**बजाजी**:—मग काय त्यांनीं उठल्यासुटल्या तुझ्याच तोंडाला तोंड द्यायचं ?—

**दिलारा**:—बजाजी, पुरे झाली ही तोंडातोंडी ! बाईसाहेब आल्या तर साऱ्यांचीच तोंडं कायमचीं बंद होतील ! नी देतील हाकलून ! इथं भीकही कुणी घालणार नाहीं !

**बजाजी**:—तुला कशाला भीक पाहिजे ? अग राजाची राणी ना तूं ?

**दिलारा**:—हं चूप-त्या पहा-राणीसाहेबच देवघराकडं निघाल्या ! कांचन—हं-धावा-पळा—

**बजाजी**:—हां जाऊं देणार नाहीं ! आजची दक्षिणा माझी असेल तरच हें गुपित—

**कांचन**:—दिलारा—

**बजाजी**:—ती खुशाल तुम्ही घ्या !-तिची नाहीं मला जरूरी—

**दिलारा**:—दिलारा वाटेवर नाहीं पडली वाटेल त्याला मिळायला ! दिलारा राजवैभवाशीं खेळलेली, प्रेमरंगांत रंगलेली, राजयोगी आहे राजयोगी ! समजलांत ? दिलाराचा दिलरुबा छेडायला रत्नजडीत कमान लागते !—

( कवाली )

**रमणि रंगाया, वश व्हाया ॥ वाया रीति अशा कामुका ॥**
**गुणहीनता दीनता ॥ रुचते ना ॥ मतिमानां ॥ ललनांना**
**कामुका ! ॥ धृ० ॥ प्रीतिचा बोल मनिं बोलतसे, जिव जीवा**
**एकसा ॥ हासते, डोलते, खेळतसे मग प्रीती राजसा ॥**
**भुलवी झुलवी अबला ॥ प्रेमाभासें कामुका ॥ १ ॥**

असें ' आ ' वासून काय उभे राहिलांत कांचन? अहो, हें जड जोखीम पचवायला आहोरात्र दक्षिणेकरतां घंटा बडवावी लागेल! समजलांत? [ जाते ]

**कांचनः**—चल दूर हो !

**संभाषयेत् स्त्रियं नैव पूर्वदृष्टां च न स्मरेत् ।**
**कथां च वर्जयेत्तासां नो पश्येल्लिखितामपि ॥**

चल दूर हो ! मी सोंवळा आहे— ( जातो. )

**बजाजी:**—ठीक आहे ! ही दुकल अशी नाजूक जागीं माझ्या माऱ्यांत सांपडली हें ठीक झालं ! ही दिलारा, बिलंदर कार्टी धाकट्या महाराजांच्या नसली तरी या कांचनाच्या दक्षिणेच्या गळीं आहे खास ! कांहीं तरी जबर कारस्थान ही टोळी करणार ! बंजाजी सावध रहा; शिकार हेरली पण सुटूं देऊं नकोस !

---

## प्रवेश ६ वा

[ **स्थळः**—रेसिडेन्सी, सातारा, ओव्हान्सचा तंबू, ओव्हान्स कागदपत्र वाचण्यांत चूर आहे. एक लिफाफा फोडून एक कागद विशेष लक्ष्यपूर्वक वाचतो. व आनंद, खुनशीपणा या भावना बदलून तोंडावर दिसतात. ]

**ओव्हान्सः**—"In all your Communications with the Raja, Government are of opinion, that you should be reserved & distant." ( हंसतो ) So such is the crisis now ! The spell had its charm over the Government !— But still "I must be resevered & distant"— Is not it ? ( पड्यांत–तुताऱ्या वगैरे ) नाद आला वाटं ?

( आप्पासाहेब व बाळाजीपंत प्रवेशतात )

**बाळाजीः**—आपण कशाला उठतां साहेब आप्पासाहेब कांहीं रागावणार नाहींत!

**ओव्हान्सः**—पन रीवाज शोडून कशा चालल? आप्पाशाव, टूमी माराजांना शोडून ईटं आला,–लइ चांगला–चांगला झाला! कुंपनी टूमाशीं लई नामी वागल—

**आप्पा०:**—आणि याच भरंवशावर तो मानाचा बंदिखाना सोडला! लाचारींत बोलायलाही लाज वाटतें साहेब; पण यातनांची सीमा झाल्यावर मगच सरकार-कदमाजवळ दाद मागितली! नांवाचे महाराज होऊन, राजवाड्यांत बंदिवानाप्रमाणं उणींपुरीं वीस वर्षं काढलीं;–पण काडीवर सत्ता नाहीं—

**बाळाजीः**—याचा मोबदला सरकारना मिळाल्याशिवाय राहणार नाहीं! हुजुरचे पाय एकदां सातारच्या गादीला लागले कीं ज्या चिटणीस दिवाणांच्यामुळं आपल्याला हे दिवस आले त्यांच्या घरादारांवरून नांगर फिरवायला काय उशीर?–राजा झाला म्हणून निरंकुश सत्ता हातीं येत नाहीं!—

**ओव्हान्सः**—बुवामाराजांनीं आमचा शैन्याट फिटूर पाडला! टेचा इन्शाफ कुंपनी शरकार करेलच! पन शाटारचे नवे शरकार, टूमी आमाला मीलाल अशा वाटला नवटा! भावाशीं आमचा लोक अशा कडीवी वागाचा नाय!

**बाळाजीः**—साहेब, दौलतीच्या कल्याणापुढं हिंदूंना आपपरपणा दिसतच नाहीं! नात्यांचा विसर पडतो अशा वेळीं!

**ओव्हान्सः**—Certainly Balajipant, certainly! आमी टूमाला जानून हाय!

**बाळाजीः**—पण साहेब, आप्पासाहेब महाराजांना हातीं धरल्यासारखं गादीवर बसवण्याचं यश घ्यावं! गरीबाचा शब्द खालीं पडूं नये! बाळाजी दिवाणपदाच्या आशेनं नाहीं बोलत;–सातारचा अभिमान मला बोलायला लावीत आहे! प्रजेचा दिवसेंदिवस वाढत जाणारा असंतोष गादीच्या कल्याणाला आणि आपण त्यांचे पाठिराखे म्हणून आपल्या लौकिकाला कमीपणा आणल्याशिवाय राहणार नाहीं!

**आप्पा०:**—बाळाजीपंत, मुत्सद्दी तिढे ओळखण्याचा मेंदूचा तलखपणा आमच्यांत नाहीं! ज्या ईर्षेनें आम्ही वाड्याबाहेर पडलों ती ईर्षा सार्थ ठरली कीं तुमची मेहनत वाया जाणार नाहीं ही खात्री ठेवा—

**बाळाजीः**—मोबदल्याच्या आशेनें मी हें करीत नाहीं हें फिरून फिरून कां सेवकानं सांगायला पाहिजे? सर्व कांहीं आतां साहेबांच्या हातीं—

**ओव्हान्स**:—कंपनी शरकार ट्रीटी करून हायनेशला बांडली हाय: मोटा-मोट्ठा पूरावा टेंच्यावर असल्या बिगर आमाला काय बी करटां येनार नाय—

**आप्पा०**:—पंत, सैन्याचा फितूर कमी ठरणार असेल तर काय वाटेल तें करा-पण—

**बाळाजी**:—एवढा पाठिंबा असतांना, चाकर काय वाटेल तें करूं शकेल ना हुजूर! चारदोन दिवसांत हुजुरना किंवा खुद्द कंपनीसरकारना कल्पना नसेल असा भयंकर पुरावा आपल्या हातीं हमखास सादर करीन असा भरंवसा आहे चाकराला—

**आप्पा**:—म्हणजे बाळाजी-पंत—?

**ओव्हान्स**:—काई नवी बाटमी?

**बाळाजी**:—सरकार, प्रतापसिंह महाराज गोवेकरांशीं कुंपनीसरकार विरुद्ध—

**ओव्हान्स**:—My God! What do you say Balajipant? Monstrous! Simply shocking!

**बाळाजी**:—पण हे महत्वाचे कागद हातीं यायला चारशें रुपये पुढं करावे लागतील! पण अशा महत्वाच्या कामीं पैशाची किंमत नाहीं हें आम्ही जाणतों!

**आप्पा**:—बाळाजीपंत-बाळाजीपंत, मुत्सद्देगिरीला मराठा नालायख आहे हें आज प्रत्यक्ष पटवून दिलंत! मराठ्यांची कर्तबगारी मनगटांत नाचते तर तुमची बुद्धीच्या किरणांत खेळत असते! हा सातारचा भावि छत्रपति, बाळाजीपंत, तुमच्या कर्तबगारीबद्दल तुम्हांला दिवाणपद बहाल करीत आहे!

**प्रताप**:—(प्रवेशून) कोणता छत्रपति कुणाला दिवाणपद बहाल करीत आहे? कोण आप्पा? आणि बाळाजी? ठीक-ठीक दौलतीची अब्रू राखता आप्पा! गादीनं आपलं काय कधीं कमी पडूं दिलं म्हणून हा तेढा डाव? साहेब, शाहूनगरचा छत्रपति,-आपल्याला मित्र म्हणून विचारतों, कंपनीसरकारशीं आम्ही केलेले करार-मदार आज कागदांचीं चिटोरीं ठरूं पहात आहेत तें कां, हें सरळ, खुल्या दिलानं आम्हाला सांगा! छत्रपति माथ्याचा भडक असला तरी नेकजात मराठा आहे हें विसरूं नका! असं कोणतं कारस्थान आमच्या हातीं घडलं म्हणून आमचे दोस्त कंपनीसरकार आम्हाला दुष्मन लेखतात?

**ओव्हान्स**:—हायनेशशाब, पूराव्या बीगर आमी टशा कशा करेल?

**प्रताप**:—रेसिडेंटनं आमच्या मित्राप्रमाणं वागून चुकल्या ठिकाणीं सांवरून धरायचं असा आमचा समज! पण साहेब, साधे मित्रत्वाचेहि शिष्टाचार राखण्याची

आपली इच्छा नाहीं, इतका कटु अनुभव आम्हांला येऊं पाहतो! आमच्याबद्दल आपल्या कानांचा इतका चावा घेणारे आमचे दुष्मन पुराव्यानं आमच्या पुढं उभे करा; पुराव्याचं माप पदरीं टाका; छत्रपती आपखुशीनं आमरण आपला कैदी व्हायला तयार आहे!

**बाळाजीः**—इंग्रेजबहादूर पुराव्याशिवाय कधींच कांहीं करीत नाहींत!

**प्रतापः**—तुमच्यासारखे हांजीखोरपणानं स्वार्थापायीं वाटेल त्याची थुंकी झेलणारे जोंपर्यंत आमच्याभोंवतीं वावरतात, तोंपर्यंत खोटे नाटे वाटेल ते पुरावे उभे नाहीं कां करतां येणार? विश्वासानं हाताखालीं हांसत फुलणाऱ्या फुलवेली सुद्धां, जहरी नागिणीचा विषारी फूत्कार टाकतील आपल्या कारवाईमुळं! मग इतरांची गोष्ट कशाला?

**आप्पाः**—कृती तशी फळं—

**प्रतापः**—कोणती निमकहराम अवलाद हे शब्द उच्चारते? आप्पा, कोणती पागल कृति छत्रपतीनं आपल्याशीं केली म्हणून आपण रेसिडेन्सी गांठलीत? आपल्या कामुक चैनीला छत्रपतीचा खजिना मोकळा नाहीं म्हणून? सीतासावित्री सारखी साध्वी पत्नी आपल्या आसऱ्याला थरकांप भिऊन जाते; तिला आम्ही पोरी-प्रमाणं सांभाळतों म्हणून? आपल्याला छत्रंचामरं उडवून घ्यायची हौस आली आहे म्हणून? गादीच पाहिजे असेल तर खुला जवाब द्या; इथल्या इथं साहेबांच्या स्वाधीन होऊन, आपखुशीनं राजसंन्यास घ्यायला आम्ही तयार आहोंत!

**बाळाजीः**—भविष्यापोटीं काय आहे हें कोण जाणणार? पण बुद्धिवंतानीं सूज्ञ-पणानं वागणं चांगलं! प्रत्यक्ष भावानं भावाविरुद्ध वागणं हें लोकांना तरी कसं दिसेल? धाकट्या राणीसरकारना हुजूरनीं पोरीच्या नात्यानं आसरा दिला असला तरी जनता—

**प्रतापः**—खबरदार बेजबाब निघेल तर! लहान तोंडीं मोठा घास घेतलास! साहेब, हीं भुतं कुणाच्या हातीं नाचतात हें; आम्ही जाणतों; आणि तो सूत्रधार जर आमच्या उपकारकर्त्याआड दडला नसता तर दौलतीचा दावेदार म्हणून अदालतीसमोर उभा सोलून काढला असता त्याला! छत्रपतींच्या घराण्याच्या अब्रूची काळजी वाटेच्या वाटसरूंना नको! खोटे पुरावे-खोटे दस्तैवज—

**बाळाजीः**—कोण म्हणतं खोटे पुरावे केले म्हणून?

**रंगोः**—( प्रवेशून ) मी-मी म्हणतों तसं! ओळखलंत मला! चिटणीस नव्हे मी! चिटणीसांचा सोयरा, तुमचीं काळीं कृत्यं चव्हाट्यावर आणणारा रंगो बापूजी—

**बाळाजी:**—पुराव्याशिवाय बेताल बडबडाल तर—

**रंगो:**—कोणता पुरावा देऊं? पटवर्धनांच्या वजनानं संकेश्वर पीठाकडून "कायस्थ-भोसल्याविरुद्ध" बनावट आज्ञापत्र बाहेर काढल्याचं स्मरतं?

**प्रताप:**—काय–काय म्हणतां रंगो ? इतका हा कर्मचांडाळ ?

[ अंगावर धांऊन जातो, रंगो आवरतो ]

**रंगो:**—सरकार, अविचाराला वाव नाहीं ! कारस्थानाचे तिढे गळ्याभोंवतीं इतके बेमालुम गुरफटले आहेत कीं किंचित् अविचार झाला तर उद्याचं मरण आजच येईल !

**प्रताप:**—मग आजपर्यंत आम्हांला अंधारांत कां ठेवलंत ? या चोरपावलीं गळा दाबणारांचे पाय तिथल्या तिथंच छाटून टाकले असते आम्ही ! मग कंपनी-सरकारनीं आम्हांला तोफेच्या तोंडीं दिलं असतं तरी फिकीर नव्हती !

**ओव्हान्स:**—हायनेशशाब, बाँबे शरकारकडं आमी शारा पूरावा पाठवून डेल ! टॅचा ऑर्डर येल टशा आमाला वागावा लागल ! बलाजीपंट, टूमी आप्पा-शावना टॅच्या वाड्यामंदी पोचवा; आन् टॅची आमाला खबरबाटमी डेट् जावा !

**प्रताप:**—अरेरे, भविष्याचा उगम पायाखालीं होत असूनही मनुष्याला दिसूं नये ! साहेब, आपल्या तीन हजार बंदुकांच्या तोंडी बांधलेला छत्रपति–आपखुशीनं आपल्या स्वाधीन होत आहे; पण भोसल्यांच्या घराण्यावर कोणत्याही विटंबनेची आग पाखडूं नका—

**ओव्हान्स:**—हायनेशशाब, टूमी शांट अशावा ! आमी टूमचा डोस्ट हाय ! रंगूजी, हूक्माविगर आमंदी आला, पन हायनेशकरटा गूना माफ !

**रंगो:**—उपकार झाले साहेब ! पण खरा प्रकार आपणांसही कळला नसेल म्हणून धाडस केलं !

**ओव्हान्स:**—आच्छा आच्छा ! हायनेश शरकार, उगाच टकलीफ पडली टूमाला !—

**प्रताप:**—त्यांत तकलीफ कसली साहेब !–ठीक आहे; जातों आम्ही !–आपली इच्छा असो वा नसो–आपला मित्र म्हणून छत्रपति आपला हात पुढं करीत आहे–

**ओव्हान्स:**—Ah so glad ! Good bye !—

( हस्तांदोलन करतात. पडदा पडतो )

**अंक १ ला समाप्त**

# अंक २ रा

## प्रवेश १ ला

( **स्थळः**—सातारा: कुरण, अजिमताऱ्याची पिछाडी. एका बाजूनें बाळाजीपंत व ओव्हान्स बंदूकी झाडीत प्रवेश करतात. )

**बाळाजीः**—साहेब, जनावर फार मोठं आहे! जपून–जपून निशाण मारलं पाहिजे!

**ओव्हान्सः**—( निशाण धरतो )–ओह्–बडमाश्! कौन आया उधर?

( पडद्यांत बार होतो. )

**बाळाजीः**—रंगो बापूजी! बरोबर छत्रपतीसुद्धां शिकारीला आहेत वाटतं? साहेब, बाजूनं गोळी चालवावी आपण!

**ओव्हान्सः**—नो! हायनेश हाय! टे बरा नाय!

**बाळाजीः**—हायनेस असले म्हणून काय झालं? शिकार आपली आहे! मी चालवूं कां गोळी?

**ओव्हान्सः**—चला देव—

[ निशाण धरतो. इतक्यांत आंत वाघ गुरगुरतो ]

ओह्! रंगोचा निशान मिस् झाला! बलाजी–टायगर इधर आ रहा है–समालो—

**बाळाजीः**—[ बंदूक टाकून ] अरे बापरे! साहेब पळा–पळा–त्या खडका आड व्हा—

**ओव्हान्सः**—Oh my god! [ धांवत जातात. आंत आवाज होतो ]

**प्रतापः**—( आंतून ) शाबास रंगो! कलमदानीं कारकून नाहींस!

**रंगोः**—( प्रतापसिंहाबरोबर प्रवेशून ) सरकार, काय हें धाडस? बंदुकीवर तोडा चालेना म्हणून काय अशा जनावराशीं हातघाईवर यायचं? पहिली गोळी चुकली तेव्हां तोंडचं पाणी पळालं! पण दैवयोग म्हणून दुसरी जोडगोळी अचुक लागली! आज भवानीनंच छत्रपतींना जिवदान दिलं.

**प्रतापः**—रंगो, या प्रसंगावरून मला गेल्या इतिहासाची आठवण येते! हाच अजिमतारा! हीच ती राई! संभाजीराजे असेच एकदां जंगलशेराच्या जबड्यांत

सांपडले ! गोळी चुकली आणि वाघानं किरण साधलं ! निधड्या छातीचा खंडो जवळ होता म्हणूनच राजे वाचले ! खाशांना हातावर झेलून, किरण चुकवून, नागमोडी वळणानं या पलीकडच्या डोंगरसोंडे आड झाले आणि मग वाघाची शिकार केली ! आज त्याच इतिहासाची पुनरावृत्ति होत आहे असं वाटतं !

**रंगो**:—सरकार, भडक वृत्तीचे संभाजीराजे, प्रसंगाचा कडवेपणा जाणणारे असते तर पुढचे बाके प्रसंग त्यांच्यावर गुदरतेच ना ? उघड्या हातीं जंगलच्या राणीवर चालून जाणारा मराठी राजा हिंमतीचा हिमालय वाटला तरी विचाराचा खंबीर नव्हता ! जीवसंकटांत कोण जिवाची पर्वा करतो ? पण सुखासुखीं संकटाशीं प्राणांचा तोल बांधणं गैरहिशेबीं आहे हुजूर !

[ रागः— **खमाजः त्रिवट** ]

**तोल सुटला, सुधीर कसला ? ॥ फसला नर जरि**
**कालकराला ! ॥ धृ० ॥ भेदी अंबरा ॥ घन दापि धरा ॥**
**तरिहि धैर्यधर भास्कर अतुला ॥ लोपला कां ? ॥ १ ॥**

( वाघ गुरगुरतो )

**प्रताप**:—अरे–ही वाघीण उठली वाटतं ? रंगो–गोळीबार तयार आहेना ?

**रंगो**:—अरेरे– सरकार, काय झालं हें ? दारू खलास झाली ! ते पहा साहेब ओव्हान्स, –बरोबर बाळाजीपंत–किरणांत सांपडणार कीं काय ?

**ओव्हान्सः**—( नातूसह घाबरून प्रवेशून ) Oh my God ! Save me Save me ! A terrible tiger! My God !

**बाळाजी**:—स–सरकार वाचवा—

**रंगो**:—गोळी शाबूत आहे साहेब ?

**बाळाजी**:—गोळीबार भरून तयार आहे माझी बंदूक ! पण उचलून तेवढी घ्या !

( रंगो बंदूक उचलतो, व साहेबांना व बाळाजींना पाठीशीं घालतो )

**रंगो**:—सरकार–सरकार, मागं व्हा ! वाघीण आपल्यावर किरण टाकणार !

**प्रताप**:—रंगो, जीवसंकटांत प्राणांची पर्वा कोण करतो–खरं ना ? झुंज तोलाच्या शत्रूशीं आहे यांतच समाधान आहे ! आम्ही ही जंगलची राणी, अशी हातावर झेलून घेतों ! न चळत्या हातानं गोळी चालवा—

( वाघ गुरगुरून उडी घेतो. प्रताप त्याला हातानें दाबून धरतो )

**ओव्हान्सः**—Oh Heavens, have mercy !

**बाळाजीः**—अरे बापरे ! ( रंगो गोळी झाडतो. वाघ मरतो )

**प्रतापः**—शाबास रंगो !

**रंगोः**—कसली हुजूर शाबासकी ! मेल्या मेंढराला मारण्याचा पराक्रम केला ! त्यांत शाबासकी कसली ? वाघिणीला दाबून ठेवली नसती तर रंगो—

**ओव्हान्सः**—मरगया शाला !

**बाळाजीः**—कसा लोळत पडला आहे ! छत्रपतींचा पराक्रम पूर्वजांना साजेसाच आहे ! रंगोनीं सुद्धां पूर्वजांचं नांव राखलं !– आज जिवदान मिळालं—

**प्रतापः**—गोब्राह्मणांचा प्रतिपाळ हें छत्रपतीचं ब्रीदच आहे बाळाजी ! तुमच्या कारवाया डोळ्यांनीं दिसत असतांना सुद्धां तुम्हाला वाचवण्यांत आम्ही आमच्या कर्तव्याला जागल्याचं समाधान आम्हाला आहे ! साहेब, अशा जंगली जनावराशीं खेळणं आम्हां मराठमावळ्यांना कांहींच वाटत नाहीं !

**ओव्हान्सः**—Oh, thank you, thank you both ! अमी लई घाबरला ! thank you, your Highness ! रंगोबा बडा हुश्यार है ! .

**प्रतापः**—छत्रपती भोंवतीं तळपणारी प्रभावळ अशीच प्रभावी आहे साहेब !

**बाळाजीः**—पण या मैदानी कर्तबगारीचा आतांच्या काळीं कांहीं उपयोग नाहीं याचं वाईट वाटतं ! शिकार छत्रपतींच्या मर्दुमकीनं केली असं म्हणण्यापेक्षां इंग्रेजी बंदुकीनंच केली ! कां साहेब–खरं ना ?

**प्रतापः**—बेवकूफ ! हे तेढे बोल आम्हाला समजत नाहींत असं कां वाटतं ? या पंजानं तो उगारलेला पंजा दाबून धरला नसता, तर बाळाजी, यावेळीं त्या कृतघ्न देहाच्या चिंध्याचिरफळ्या उडाल्या असत्या !

**बाळाजीः**—विनाकारण गैरसमज ! वस्तुस्थिती विनोदानं सांगितली ! त्यांत व्याजोक्ति नव्हती ! छत्रपतींना शब्द लागले असल्यास मागं घेतों !

**प्रतापः**—ही शब्दांची देवघेव नकोच आहे आम्हाला ! आमचं कर्तव्य आम्ही केलं ! तुमची वृत्ति आम्हाला काय समजत नाहीं ? वाघाशीं आमची झुंज चालू असतांना, साहेबांनीं निशाण खालीं केलं पण तुम्ही मात्र बंदूक रोखलीत, हें आम्ही पाहिलं नाहीं असं कां तुम्हाला वाटतं ?

**बाळाजीः**—आपला जीव वाचावा म्हणूनच मी निशाण धरलं ! शिकार होती तर–

**प्रतापः**—कदाचित् छत्रपतींचीच शिकार झाली असती ! जिवाचा पाहरेकरी रंगो होता म्हणून बचावलों !

**रंगो०ः**—दैवयोगानं माझी पहिली गोळी चुकली आणि वाघ नातूंच्या सुमारानं उधळला !—म्हणून तरी बाळाजींची बंदूक गळाली !

**बाळाजीः**—सरळ हेतूंचा सुद्धां विपर्यास ! साहेबांच्या इच्छेकरतां आज शिकारीला निघालों तों हें अपयश —

**प्रतापः**—बस्स—पुरे झाले हे लपंडाव ! आम्ही तुम्हाला पूर्ण ओळखून आहोंत ! बाळाजी, यापुढं छत्रपतींच्या कुरणांत छत्रपतींच्या खास परवानगीशिवाय स्वारी-शिकारीला तुम्ही फिरकतां कामा नये !

**ओव्हान्सः**—आच्छा ! हायनेस शाब–Good day !

**प्रतापः**—साहेब, रंगो ही शिकार आपणांकडं पोहोंचवतील ! आजच्या प्रसंगाची आठवण म्हणून ठेऊन द्या ! विलायतीं असला प्राणी पाहायला सुद्धां मिळणार नाहीं !

**ओव्हान्सः**—Thanks; many many thanks !

**रंगोः**—आजचा प्रसंग साहेब कधींच विसरणार नाहींत !

**प्रतापः**—रंगो, बाळाजींना कुरणाबाहेर पोहोंचवा; रेसिडेन्सींत हा वाघ पावता करा !

**रंगोः**—बाळाजी—चला पुढं ! ( जातात. )

—पडदा पडतो.—

## प्रवेश २ रा

[ **स्थळः**—सातारा. राजवाड्याची एक बाजू. रात्रीची वेळ. कांचन प्रवेश करतो. ]

**कांचनः**—यत्र यत्र धूमस्तत्र तत्र वन्हिः । भविष्य कांहीं ठीक दिसत नाहीं ! ही भावाभावांतल्या धुमसण्याची झळ आम्हां आश्रितांना जाणवते कीं काय भवानीला माहीत ! ही दिलारा धाकट्या महाराजांच्या गळीं आहे हें यावेळीं ठीक झालं ! तिच्या मोहबतीवर तरी जगता येईल ! आजची चोरी—अरे बापरे—कल्पनेबरोबर थरकांप उडतो जिवाचा ! पण चोरी करीत नाहीं कोण ? आणि त्यांतल्या त्यांत ही प्रेमापायीं चोरी ! आहाहा—रुमझुम—आस्ते कदम्—आस्ते कदम्—निगा रखो, निगा रखो बिबीजान—

**दिलारा**:—कोण—कांचन ना? अगदीं ठरल्याप्रमाणं वेळेवर आलांत अं?

**कांचनः**—हें सारं तुझ्याकरतां!

**दिलारा**:—अहो, पण हें पाप ना? ही तर चोरी!

**कांचनः**—अग हा सारा चोरांचा मामला! शिवाय अशा नाजूक चोऱ्या करीत नाहीं कोण? संकेतानं होणाऱ्या चोऱ्यांत पाप नाहीं! कारण त्यावर विचार झालेला असतो! शिवाय प्रेमांत पापाला मुळीं जागाच नाहीं! शर्विलकानं नाहीं कां प्रेमपात्राकरतां—छेः हा संस्कृत दृष्टांत तुला काय समजणार? पण खरा प्रेमी आपल्या प्रेमपात्राची नजर चुकवून—त्याच्या रूपाची चोरी किती वेळां करतों हें तर तुला पटेल?

**दिलारा**:—अहो पण ही तर भयंकर—राज्याची चोरी! शिक्केकट्यार—

**कांचनः**—जितकी चोरी मोठी—तितकं प्रेम मोठं!

**दिलारा**:—बरीच तयारी दिसते,—पण तो दुसरा तर नाहीं ना पाळतीवर—

**कांचनः**—त्याचीच तेवढी मला भीती वाटते! दिलारा—

**दिलारा**:—अलीकडं मला सुद्धां त्यानं तोंडघशीं पाडण्याचा बेत आणला आहे! थांगच लागत नाहीं त्याचा!

**कांचनः**—ठीक आहे! आज तेवढे शिक्केमोर्तब हातीं आले कीं खाशांच्याकडून तोफेच्या तोंडीं देतों बेट्याला! जामदारखान्याचा नाईक झाला आहे बेटा!

**दिलारा**:—हं—आतां—वेळ नका बाई दवडूं! प्रेमापायीं होणारी प्रत्येक गोष्ट कशी तडकाफडकीं झाली पाहिजे!

**कांचनः**—म्हणजे मरण सुद्धां कसं तडकाफडकीं यायचं एकादे वेळीं!

**दिलारा**:—कांचन, तुमच्या जिवावर उठायला मी कां माणूस नाहीं? चला, व्हा पुढं; मी जागवतें पाहरा—बाहेर. कोतवाल वेळप्रसंग तर आहेतच!

**कांचनः**—तूं नसतांना सुद्धां तुझा माझ्या भोंवतीं पाहरा असतोच कीं! मग हा दुहेरी मारा कशाला?—नाहीं, दिलारा;—खरं सांगूं कां?—पोटांत गोळा उठतो बघ! जर कां कुणी पाहिलं—

**दिलारा**:—मी आहे म्हणते ना? पहा बरं! या एकाच गोष्टीमुळं तुमचं माझं कामग्रचं सूत जमेल!

**कांचनः**—पण पुढच्या नुसत्या कल्पनेनंच माझ्या नाकाशीं सूत धरायची वेळ आली ना! पुढचं सूत अनुभवायला जिवंत राहिलों तर!

**दिलारा:**—कांचन जिवंत राहणार-राहणार-राहणार !

**कांचन:**—ठीक आहे तर मग ! जय मारुतिराया, सांभाळरे आपल्या दासाला ! जय बजरंग ! जय बलभीम !

**दिलारा:**—अहो असे ओरडतां काय ? आरडा ओरडा करून कां चोरी कर-णार ? वक्रतुंड व्हावं लागेल ना कुणी ऐकलं तर ?

**कांचन:**—पुढं होणारा आरडा ओरडा आतांच करून घेतों ! शिवाय दंग्याची सूचना देऊन दगा करणारा अधीक वीर असतो ! कोणत्याही चळवळींत भग-वंताचं अधिष्ठान असावं लागतं तरच जय येतो; म्हणून या चोरीच्या चळवळींत बलवंत बलभीमाचं मी नांव घेतलं !—घाबरूं नकोस— ( जातो. )

**दिलारा:**—कांचनानं एवढं काम केलं कीं दिलारा धाकट्या महाराजांची झालीच ! एवढे शिक्केमोर्तब महाराजांच्या हातीं पडले कीं महाराज छत्रपती, बाळाजी दिवाण आणि मी—मी—? मी इष्कानं दिवाणी तर नाहीं ना झालें ?—ही सुळावरची पोळी—पचेल ना दिलाराला ? ( पडद्यांत धांवपळ सुरूं होते ) या या—हें काय ?

**कांचन:**—( धांवत प्रवेशून ) यः पलायते स जीवति ! दिलारा-पळ, पळ—चोर चोर—

**दिलारा:**—कोण- कोण चार ?

**बजाजी:**—( प्रवेशून ) चोरावर मोर हा बजाजी !

**कांचन:**—अरे चोरा ! तोंडावर बुरखा घेऊन चोरी करतोस ? शिक्के पळवतोस ?

**दिलारा:**—कुठं- कुठं आहेत शिक्के ?

**कांचन:**—हें पहा; हे पहा ! जिवाची छाती केली ! पानिपतावर सदाशिवराव भाऊनीं केला नसेल एवढा पराक्रम गाजवला ! राज्याची अब्रू राखली ! अरे चोरा—

**बजाजी:**—याच चोराच्या उलट्या ! थांब, तुला असाच नेतो थोरल्या सरकारकडं ! सोड सोड ते शिक्के ! मुद्देमालासह देतों स्वाधीन करून ! मग उडव माहुलीवर इष्काचा रंग ! ( शिक्के हिसकावून घेतो )

**दिलारा:**—कांचन, पळेल हो तो तिकडून ! तुम्ही व्हा तिकडून; मी इकडून नाकेबंदी करतें !

**बजाजी:**—इतक्या दिवस नजरबंदी केलीस ती पुरे नाहीं का झाली ? आईसाहेबांनीं गळ्यांतला ताईत म्हणून जवळ केली ती तूं अशी नागीण झालीस ? थांब, मुरळी म्हणून देतों जेजूरीला पाठवून ! ( जाऊं लागतो. कांचन मधें येतो. )



**जाजीः**–फुंक शंख खुशाल! तुम्हां दोघांनाही असा डांबून मेंढराप्रमाणं नेतों खेचून—

—[ पृष्ठ ३७]

वा. ...... नं. ... ३७
ता. ..

**कांचनः**—हा वाघ्या आहे कीं इथं ! चोरा, चोरी करून पळून जातोस ? आरडा ओरड करीन ! दिलारा—फुंक रणशिंग !

**बजाजीः**—फुंक शंख खुशाल ! तुम्हां दोघानांहि असा डांबून मेंढरांप्रमाणं नेतों खेंचून— ( दोघांनाही पकडतो )

**दिलाराः**—धावा हो धावा—चोर—चोर—

**कांचनः**—अजापुत्रो बलिं दद्यात्। दिलारा—आतां काय करूं ?

**दिलाराः**—ओरडा—ओरडा मोठ्यानं ! तुम्हांला देवळांत ओरडण्याची संवय आहे !

**कांचनः**—अग जोडीला तेव्हां शंख नी घंटा असते !

**बजाजीः**—मग ही घंटा आहेच कीं जवळ ! शंख तूं आहेसच !

**कांचनः**—चोरी करून शंख म्हणतोस ! धावा—धावा—चोर—

**दिलाराः**—कोतवाल, चोर हो चोर—कोतवाल चोर—

( कोतवाल दोन शिपायांसह प्रवेशतो )

**कोतवालः**—काय—काय रे आहे गडबड !

**कांचनः**—चोर ! चोरी करून पळून जात होता ! शिर्केमोर्तबाची चोरी ! तो पहा हातांत मुद्देमाल !

**कोतवालः**—कुठं आहे मुद्देमाल ? आण तो इकडं— ( हिसकून घेतो. )

**बजाजीः**—कोतवाल—कोतवाल—चोर सोडून संन्याशाला सुळावर देतां कीं काय ? चोरी केली यानं आणि पकडली मी !

**कोतवालः**—पकडलीस तूं ! मग आम्ही कशाला इथं ? वारे वा ! चोरी केली यानं आणि मुद्देमाल मात्र तुझ्या हातीं—! शिपाई, पकडा या हरामखोराला !

( शिपाई बजाजीला पकडतात )

**कांचनः**—मला छळलंस ! शापून भस्म केलं असतं ! पण कोतवाल आले !—

**दिलाराः**—बजाजी, शेवटीं असा चतुर्भुज झालास ?— कोतवाल याच्यावर दया नाहीं कां करतां यायची ?

**कोतवालः**—औरतीचा शब्द मानीत नाहीं तो माणूस कसला ! बजाजी, महाराजांचा खास नोकर पडलास, म्हणून तुला बंदींत ठेवीत नाहीं ! उद्यां आप्पासाहेब महाराजासमोर अदालतींत हजर रहा !

( शिपाई शिर्केमोर्तब घेऊन जातात )

**बजाजी**:—महाराजांचे नोकरच जिथं फितूर तिथं सद्दी संपली असंच म्हटलं पाहिजे !

**कांचन**:—बजाजी !

**बजाजी**:—कां ?

**कांचन**:—असा वक्रतुंड कां रे ?

**बजाजी**:—तुझ्या चेहऱ्याचं वळण गिरवतों आहे !

**दिलारा**:—चोर ! दिलाराच्या उमद्या उमरीची बागशाही लुटायची होती नाहीं ?

**बजाजी**:—अशा बागशाहीला बजाजी भुकेला असता तर शिवराईला छपन्न फुलांचा बाजार पडला आहे !

**कांचन**:—चोर तो चोर आणि पुन्हां शिरजोर !

**दिलारा**:—बजाजी, उद्यांचा विचार करा ! रात्रीं थोडी शांत झोप घ्या ! उद्यां धाकट्या महाराजांच्या हातून सुटायचं असेल तर दिलाराचेच पाय धरावे लागतील हें ध्यानांत ठेवा ! समजलांत ?

**कांचन**:—अग तुझे पाय धरायला तो फटिंग आतां तयार होईल ! त्यांच्यावर त्याचा कधींपासूनचा डोळा आहे ! त्यानं तुझे पाय डोळे झांकून धरले पाहिजेत !

**बजाजी**:—उद्यांच्या आशेनं काय हुरळून गेली आहे ! पण दिलारा, शेवटीं तुलाच बजाजीचे पाय धरावे लागतील !

**दिलारा**:—दिलाराच्या प्रीतीची सारंगी छेडायला हा राकट बजाजी किंवा निष्कांचन कांचन नाहीं चालायचा बरं !

**कांचन**:—काय ? डोळ्यांपुढें काजवे चमकूं लागले !

**बजाजी**:—दिलारा, कोण ग डोळे झाकून असल्या अंधारांत उडी घेणार ?

**दिलारा**:—इष्काचे खेळ म्हणजे आषुक माषुकांची जन्माची आंधळी कोशिंबीर ! त्यांना दिवस रात्रीं सारखे वाटतात आणि रात्रीचा दिवस कसा होतो हें तर कळतच नाहीं ! दिलाराची दिल्दौलत लुटणारे धाकटे धनी ! बजाजी, अहो कांचन, इष्काचा रंग असा न्यारा आहे बरं !

**कांचन**:—डोळस असून आंधळा झालों कीं ! बजाजी, आतां काय करूं रे ?

**बजाजी**:—शंखनाद ! दुसरं काय—?

**दिलारा**:—इष्काच्या आबादानींत असा शंखनाद नका करूं बाई ! त्यांत कोकिळांचा पंचम, चंडोलांची भरारी, फुलांचा सुगंध, ताऱ्यांची चमूचमू नी चातकांची बुलबुल चाललेली असते हो !

( कवाली )

नव रसें रसराजा खेळे आनंद ॥ ध्रु० ॥
निशिदिनीं रंगेला, सुम-कर त्याला ॥
रतिराज खेळे; हा नाचे आनंद ॥ १ ॥
प्रणयांत गुंगावें; सुखानंदें रंगावें ॥
मद्धुंद डोलावें; हाची आनंद ॥ २ ॥

## प्रवेश ३ रा

[ स्थळः—सातारा रेसिडेन्सी. बाळाजी व आप्पासाहेब प्रवेशतात. ]

**बाळाजी:**—आप्पासाहेबमहाराज, धीर सोडायचं कांहींच कारण नाहीं! गव्हर्नरसाहेबांची आणि राजांची मुलाखत झाली असली, त्यांनीं नवीन अटी जरी राजांच्यापुढं केल्या असल्या, तरी त्या अटी महाराज कबूल करतीलच असं नाहीं! आजच साहेबांनीं महाराजांजवळ शेवटचं उत्तर मागितलं आहे!

**आप्पा:**—बाळाजीपंत, काय असेल तें असो; पण आज आमचा धीरच खचत चालल्याप्रमाणं आम्हांला वाटतं! इतकंही करून जर यश आलं नाहीं तर आमची अवस्था काय होईल? धड तुम्हीं जवळ नाहीं धड बुवासाहेबमहाराज आम्हांला जवळ करणार नाहींत! केवळ शब्दांच्या भरंवशावर जीव जगवणं गैरहिशेबी ठरेल असंच वाटतं!

**बाळाजी:**—बाळाजीचा शब्द खोटा नाहीं होणार हुजूर! साताराची गादी छत्रपतींनीं आज पड खाऊन जरी राखली तरी हरकत नाहीं! काय वाटेल तें कारस्थान करूं! हातीं संस्थानचे शिक्केमोर्तब असल्यावर राज्य हातीं यायला काय उशीर?—पण आपण मात्र आपलं इमान कायम राखलं पाहिजे!

**आप्पा:**—भोंसल्याच्या कुळाचं नांव सांगायचं आहे आम्हांला बाळाजीपंत—

**बाळाजी:**—पण आज आपण कुळ बुडावयाला तयार झाला आहात! हुजूर—

**आप्पा:**—बाळाजीपंत, दिला जाब खरा करूं मगच तुमची आमची भाषा! पण साहेबांचा रोख कांहीं भलताच दिसतो! आपला तहनामा होता तर अधीक बरं नाहीं कां होणार?

**बाळाजी**:—तहनाम्याला काय उशीर ? आपली इच्छाच असेल तर साहेबांच्या जवळ मी आजच गोष्ट काढतो ! तहनाम्यानंच आपलं समाधान होत असेल तर त्यांत अवघड कांहींच नाहीं !

**आप्पा**:—तेवढाच बुडत्याला काडीचा आधार ! हें नवीन अटींचं प्रकरण निघालं नसतं तर आम्ही इतका अविश्वास दाखवलाच नसता !

**बाळाजी**:—सरकार, आबासाहेबमहाराजांचा स्वभाव, आपण त्यांचे बंधु असून ओळखला नाहींत असंच म्हणावं लागतं ! बुवामहाराज वाटेल त्या अटी मान्य करतील पण चिटणीसांना हद्दपारीची अट मान्य करून, सैन्यांत फितूर पाडल्याचा गुन्हा कधींच कबूल करणार नाहींत !

**आप्पा**:—बाळाजी, तसंही असेल कदाचित् ! पण उतावीळ शंकेचं समाधान व्हायला अन्य उपायच नाहीं ! बाळाजीपंत, तुमच्यावर विसंबून घरदार सोडलं, स्वकीयांशीं दुष्टावा आरंभला, त्याचं फळ आम्हाला हताश करून देणार असाल तर तसं आगावूच सांगा !

**बाळाजी**:—सरकार, आपलं समाधान कसं करूं ? हें पहा—साहेबच आले ! आपल्या समक्षच आपला मनोदय त्यांना कळवतों—मग तर हरकत नाहीं ?

**ओव्हान्स**:—( प्रवेशून ) Good morning Balajipant, Appasaheb !

**बाळाजी**:—नमस्कार ! आज छत्रपतींचं शेवटचं उत्तर मिळणार आपल्याला ?

**ओव्हान्स**:—Yes !

**बाळाजी**:—पण छत्रपतीनं आपल्या अटी मान्य केल्या तर ?

**ओव्हान्स**:—नाईलाजानं गादी टेंच्याकडं ठेवनं भाग परेल !

**बाळाजी**:—मग आप्पासाहेबांची वाट काय ?

**ओव्हान्स**:—टेनी हायनेशजवळ रावा, और अंग्रेज सरकारजवळ रावा—

**आप्पा**:—बाळाजीपंत, पहा, माझ्या शंका खऱ्या ठरणार !

**बाळाजी**:—साहेब, असं करून कसं चालेल ? आपण धाकट्या महाराजांना गादी द्यायचं वचन दिलं आहे ना ?

**ओव्हान्स**:—पण हायनेशाचा ट्रीटी हाय ना ?

**बाळाजी**:—हो—तेंहि खरंच !—पण आमच्या करतां म्हणून; शिवाय छत्रपतींनीं गुन्हां करून तहनामा मोडल्याचं आपण सिद्ध केलंच आहे !

**ओव्हान्सः**—पन डिरेक्टरनां टें पटलं पाजे नां ! आप्पाशाब, आमी म्हनूं तशा ट्रीटी टूमी आमाला डेल कां ?

**आप्पा०**:—आपण म्हणाल तो करार आम्ही करून द्यायला तयार आहों ना ? छत्रपतीप्रमाणं आम्ही सचीवांच्या जहागिरीचा लोभ दाखवणार नाहीं कीं स्वतःच्या बुद्धीनं कधीं वागणार नाहीं ! बाहेर पडल्यासारखं " छत्रपति " म्हणून साताऱ्यांत गेलों म्हणजे झालं !

**ओव्हान्सः**— आच्छा—आच्छा ! हायनेश व्हाल टूमी !— बलाजीपन्ट, यांच्याशीं करायचा ट्रीटी शंध्याकालीं करूं ! हायनेश यायचा टाइम झाला ! आप्पाशाब, टूमी आटा जावा—

**आप्पा०**—पण दिला जबाब कायम ना ?

**ओव्हान्सः**—बलाजीपन्ट शांगील टूमाला—

[ वाचण्यांत गर्क होतो. बाळाजी आप्पासाहेबांना पोहोंचवून परत येतो. ]
बलाजीपन्ट, टूमी लई हुशियार !—

**पट्टेवालाः**—( प्रवेशून ) हायनेश आ रहा है !

**ओव्हान्सः**—His Highness ? Oh (पट्टेवाला जातो) Good morning, Your Highness !

**प्रतापः**—आपण मुद्दाम बोलावलंत ? काय म्हणणं आहे आपलं ?

**ओव्हान्सः**—टूमी आमच्या टूपला फिटूर पाडला—

**प्रतापः**—पुन्हां पुन्हां तेच सवाल आणि तेच जवाब काय कामाचे ? आम्ही फितुर असतों तर अशा वर मानेनं तुमच्याकडं येतोंच ना; बेदर्द जाबसाल करतोंच ना ! केला गुन्हा कबूल करण्यांत छत्रपतीच्या अवलादीला कमीपणा नाहीं !

**ओव्हान्सः**—आमचे जवल पूरावा है !

**प्रतापः**—तर मग उघड चौकशींत गुन्हा शाबीत करा ! गुन्हेगार ठरलों तर राज्यत्यागच काय, तोफेच्या तोंडीं जायला तयार आहोंत !

**ओव्हान्सः**—टशा करायला आमाला टाइम नाय ! आमी शांगूं टशा वागला पाजे !

**प्रतापः**—यालाच न्याय म्हणतात कां ? आमचा पत्रव्यवहार मधल्यामधें फुटूं लागला ' दोस्तीकरतां आम्ही शांत राहिलों ! न्याय मागण्याकरतां सय्यद मीरला विलायतीं पाठवूं लागलों;—त्यालाहि पायबंद घातलांत ! गोंवेंकरांशीं छत्रपतीला

कारस्थान करायचं असतं तर असला महत्वाचा पत्रव्यवहार असा उघडा चालूं द्यायला छत्रपति खुळा नाहीं हें तुम्ही जाणायला पाहिजे होतें! हा प्रश्न जर अशा जबर-दस्तीनंच सुटणार असेल तर विनाकारण हीं- प्रश्नोत्तरें तरी कशाला? पुराव्याची भीती काय म्हणून-? जातो आम्ही—

**ओव्हान्सः**—बाँबेचा गवर्नरशाब हायनेशना भेटले! टेनी हा नवा करार टूमाला डिला हाय! येच्यावर कुंपनीशरकार टूमाला सोडाला टैय्यार है!

( करार देतों. )

**प्रतापः**—( वाचून ) सातारच्या गादीवर मेल्या मर्दाईचा पुरुष असता तर त्यानं या कराराला मोठ्या आनंदानं कबूली दिली असती! पण आम्ही पूर्ण निर्दोषी असतांना, गादीच्या लोभापायीं आम्हीं हा अपमान कां सोसावा?

**बाळाजीः**—आप्पासाहेब महाराजांचा तनखा नियमित चालूं राहून, त्यांची खाजगी दौलत त्यांच्याकडं रहावी अशासारख्या साध्या कलमांतसुद्धां छत्रपतींना काय कमीपणा वाटावा समजत नाहीं!

**प्रतापः**—पोटाकरतां वाटेल तें पाप करणारांना तें कसं समजणार? बाळाजी आप्पासाहेब आमचे बंधु आहेत;- त्यांचा दर्जा कसा सांभाळावा हें तुम्हा उपऱ्या-पेक्षां आम्हांला अधीक समजतं!

**बाळाजीः**—आम्ही उपरे तर खरेंच; पण आम्हां उपऱ्या पायींच महाराजांचे पाय या गादीला लागले हें विसरून चालणार नाहीं!

**प्रतापः**—त्याचबरोबर आम्हांला लहानाचे मोठे करणाऱ्या बळवंतराव चिटणी-सांची चाकरी आम्हांला कधीं विसरतां येणार नाहीं हें तुम्हीही समजायला पाहिजे! आज त्यांना हद्दपार करा असं कलम सुचवण्यांत, त्यांची कीर्ती तुमच्या डोळ्यांत सलूं लागली आहे हें उघड आहे!

**बाळाजीः**—परिस्थितीचा ताळमेल न पाहतां, बलाबल ओळखतां, केल्या उपकाराला विसरून, गगनाला गवसणी घालूं पाहणारे छत्रपती फंद फितुरी—

**प्रतापः**—बस्स! साहेब, आमचा उपमर्द करण्याकरतांच कां आम्हाला इथं बोलावलंत?

**ओव्हान्सः**—बलाजीपन्ट, टूमी बोलूं नाय! हायनेस आजून गाडीवर हाय!

**प्रतापः**—म्हणजे उद्यांचं चित्र आमच्यापुढं उभे करतां?

नो. ७७

**ओव्हान्स**:—टेला काय करावा ? ये कंडिशन्स टूमाला कबूल हाय !

**प्रताप**—साफ नाहीं ! कुळाच्या लौकिकाला, स्वतःच्या निष्कलंक चारित्र्याला लाज लावणाऱ्या या अटी आम्ही कधींच कबूल करणार नाहीं ! गादीपेक्षां छत्रपतीला आपला दर्जा अधीक प्यारा आहे !

**ओव्हान्स**—मग कळवूं टशा शरकारला ?

**प्रताप**:—बेशक ! उद्यां गादीवरून खालीं उतरण्याचा प्रसंग आला तरी वाईट वाटणार नाहीं ! हा आपला दोष नाहीं ! आपल्यापुढं निरनिराळ्या रंगांत आमचं चित्र रंगवणाऱ्या कलमबहाद्दरांची ही कारवाई आहे हें आम्ही जाणतों !—केला तह पाळण्यांत आम्ही शिकस्त केली ! दोस्तीकरतां अजूनही गर्दन द्यायला आमची तयारी आहे !—पण बेगुन्हा, बिगरचौकशी, आम्हावर दोषीपणाचा मोर्तब आम्ही कधींच होऊं देणार नाहीं !

**ओव्हान्स**:—Very Sorry ! आमाला नाइलाजानं वाईट वागावा लागल !

**प्रताप**:—मर्जी आपली !—संपली आपली मुलाखत ! जातों आम्ही—

[ जातो. जातांनाच— ]

**ओव्हान्स**:—आच्छा. Good Luck to you ! बलाजीपन्ट, आपाशाबला शाटारच्या गाडीवडल ट्रीटी कराला ले आव—

[ लिहूं लागतो. ]

**बाळाजी**:—भवितव्यता बलीयसी ! ( जातो. )

( ड्रॉप पडतो )

**अंक २ रा समाप्त.**

# अंक ३ रा

## प्रवेश १ ला

[ **स्थळ**:—सातारा. दिलारा प्रवेश करते. ]

**दिलारा**:—चोरी फळाला आली कीं फसली ? मेल्या बजाजीनं ऐनवेळीं घात केला ! चोरी केल्यावरोबर वाटलं होतें कीं धाकटे धनी गादीवर येतील ! पण माळ लागली दुसऱ्यांचीच ! काल दिवाण गेले–आज काय म्हणे–चिटणीसांना धरणं आलं आहे ! ही माळका थेट थोरल्या महाराजांपर्यंत पोंचली म्हणजे जिंकलं ! पण जर कां मधेंच–या मा. कोण कांचन ?

**कांचन**:—चोरी करावी तर अशी !–कांचन, आनंदाची बातमी ! आनंदी आनंद ! आनंदी आनंद !

**दिलारा**:—म्हणजे ? झालं तरी काय ? तो बजाजी सुटल्यापासून माझ्या जिवांत जीव नाहीं; आणि तुम्हांला आनंद होतो ! कांचन असं झालं तरी काय !

**कांचन**:—अग बजा सुटला पण चिटणीस चालले ! आहेस कुठं ? उद्यां महाराज हलणार ! आणि मग, परवां धाकटे महाराज गादीवर आले कीं या बजाची गाढवावरून धिंड काढून, अजिमताऱ्यावरून त्याचा कडेलोट करायला काय उशीर ?

**दिलारा**:—पण जर कां कांचन मधेंच कांहीं नशिबानं चक्कर खाल्ली तर बजाजी ऐवजी आपलीच गाढवावरून धिंड निघेल ! मला भीतीच वाटते !

**कांचन**:—हें चिटणीसाचं पिल्लू होतं तोंपर्यंत मलाहि थोडी भीती वाटत होती ! पण आतां स्वतःच्याच दाढी मिशा पेटल्यावर दुसऱ्याच्या जळत्या घरांकडं लक्ष द्यायला कोण शाहाणा तयार होईल !–दिलारा–आतां आपली धिंड नाहीं–निघणार !–वरात—

**दिलारा**:—कांचन, पण तो बजाजी थोरल्या महाराजांना नाहीं ना सांगणार कांहीं !

**कांचन**:—खुळी आहेस ! हलकट गोष्टी ऐकण्याकरतांच मोठ्यांचे कान छोट्या लोकांपर्यंत लांबत असतात ! असले शेकडों कांचन दिलारा किंवा बजाजी मेले

तरी महाराजांना काय त्याचं वाटणार! कांहीं म्हण दिलारा, हा पुण्याचा बाळाजी बुद्धिचा शिकंदर खरा! शिक्केमोर्तब हातीं आले मात्र; यक्षिणीची कांडी फिरल्याप्रमाणं एक एक मोहरं साताऱ्यांतून जाऊं लागलं!

**दिलारा:**—एवढं मात्र खरं कांचन! हें उंटाचं पिल्लूं साताऱच्या वाड्यांत शिरलं नीं बोलबोलतां हलकल्लोळ उडवलान् कीं!

**कांचन:**—खरंच मला सुद्धां आतां या भिक्षुकी पेशाचा कंटाळाच आला आहे! चोरी केल्यापासून माझ्यांत सुद्धां कांहीं तरी विशेष कर्तबगारी आहे असं वाटूं लागलं आहे! शिक्केमोर्तबच जर बाळाजीपंताच्या हातीं पडले नसते तर ह्यांना इतकी कर्तबगारी करतां आलीच नसती! मी ठरवलं आहे—

**दिलारा:**—काय, काय ठरवलं आहेत कांचन तुम्ही?

**कांचन:**—प्यार दिलारा—

**दिलारा:**—हं, भलतं सलतं नाहीं अं बडबडायचं!

**कांचन:**—ठीक आहे! ह्या शब्दांचा मान तुला कुणाला द्यायचा असेल त्याला खुशाल दे! पण आप्पासाहेबांचं उद्यां राज्य झालं, ही बेहिस्तानची परी उद्यां धाकट्या महाराजांची राजरोस रखेली–चुकलों–राणी झाली, कीं कांचन भिक्षुक नाहीं राहणार!—मीहीं कलमबहाद्दर कारकून, दिलारा–तुझा कारभारी होणार! त्यावेळीं माझ्या सुखांत प्रत्येक वेळीं येणारा तो बजाजी जिवंत मात्र पाहिजे!— म्हणजे—

**बजाजी:**—( प्रवेशून ) काय करणार! बोल काय कारणार?

**कांचन:**—बेटा, तुला मोठा सरदार करणार!

**बजाजी:**—अरे चोरा, अशी कोलांडी मारतोस काय? काय ग ए दिवाणी, आतां आणखी कसलं कारस्थान चाललं आहे?

**दिलारा:**—बजाजी, तोंड सांभाळून बोल! एकदां तुझ्यावर दया करून महाराजांनीं तुला सोडलं! पण आतां मात्र—

**बजाजी:**—मीच तुम्हांला महाराजांकडे न्यायला आलों आहे! दिवसाढवळ्या साऱ्या राजवटीला आग लावलीस;—थोरले महाराज रामाचे अवतार; त्यांना हीं काळीं कृत्यं कशीं दिसणार?—चल, रंगोंच्यापुढं तुम्हांला उभं करण्याचा चिटणीसांचा हुकूम आहे!

**कांचनः**—चिटणीसांचा ना? मग मुळींच डरत नाहीं आतां! चिटणीसांना आतां सत्ता आहे कुठं?

**बजाजीः**—चूप निमकहराम बदमाष—मुकाट्यानं पुढं हो नाहींतर पाठ फुटून निघेल! चामडी लोळवीन दोघांची!

**दिलाराः**—अगे मा गे! तरी मी कांचनाला म्हणतच होते कीं चोरी करतांना आरडाओरडा करूं नका!—आतां काय करूं?

**बजाजीः**—उडीव या कांचनाबरोबर आतां माहुलीवर रंग! चल ए बदमाष—चोरी करतोस नाहीं?

**कांचनः**—मी चोर? चोरीच्या वेळीं आरडाओरड करणाराच चोर ठरत असेल—तर—( बजाजी चावूक उडवतो ) बरं आहे पाहून घेतों! ( जातात. )

---

## प्रवेश २ रा

[ **स्थळः**—सातारा, राजवाडा, एक महाल. चिटणीस व बजाजी येतात ]

**चिटणीसः**—बजाजी सरकार स्वारी कुठं आहे? मासाहेबांकडचा राबता बंद नाहीं ना?

**बजाजीः**—सरकारस्वारी वाड्यांत आहे. राबता बंद नाहीं सरकार. मासाहेबांना देऊं का खबर?

**चिटणीसः**—जा—आणि मासाहेबांना सांग कीं चिटणीस आले आहेत!

**बजाजीः**—आज्ञा सरकार. ( मुजरा करून जातो )

**चिटणीसः**—भोंसले आणि चिटणीस! कोणत्या विधिघटनेनं हीं दोन घराणीं इतकी एकजीव झाली—प्रभु जाणें! ही राजवट, हे किल्लेकोट, पुन्हां या जन्मीं चिटणीसांना दिसतील कां?—नाहीं—खास नाहीं; चाकराचा शेवटचा मुजरा तरी राजापायीं रुजूं होवो!

**राणीः**—( प्रवेशून ) चिटणीस, बोलावणं पाठवलंत, पण कोणत्या तोंडानं तुमच्याशीं बोलूं? लेकीला जीभ कुठं ठेवलीत बोलायला? एकनिष्ठेचं देणं देऊन उपकारांच्याच भाराखालीं छत्रपतींचं घराणं जिंकून घेतलंत! चिटणीस, कोणत्या देवाद्वारीं आपला जन्म झाला म्हणून छत्रपतींच्या करतां हा स्वार्थत्यागाचा कुलाचार पाळता?

**चिटणीसः**—मासाहेब, भलत्या बोलानं चाकराला हिणवूं नका! पूर्वजांच्या कृतींची आठवण झाली कीं या निसत्व जिण्याचा वैताग येतो! कुठं ते गगनाला गवसणी घालणारे बाळाजी आवजी, खंडोबल्लाळ, आणि कुठं हा बळवंतराव? शत्रू समोर दिसत असतांना सुद्धां सुतकी चेहऱ्यानं शेवटची निरवानिरव करायला आपल्याकडं आलों!

**राणीः**—चिटणीस, कलमदानाची तरवार करणारे खंडो छत्रपतींच्या खास अमदानींत कर्तबगार ठरले; पण आजचे छत्रपती नांवाला! चाकराचं रक्षण करतां येत नाहीं तो धनी कसला? धन्याकरतां चाकर मेला तर धन्याचं धनीपण चाकराच्या मालकीचं होतं! चिटणीस "शेंदूर फाशीन त्याला देव करीन" असा खंडोजींचा पराक्रम असतांना, एकनिष्ठेमुळं शाहूराजानांच पुन्हां गादीवर आणलं;—आमचं धनीपण कुठं राहिलं? आज डोळ्यांसमोर तुम्हाला ओढून नेत असतांना, छत्रपतींना कांहीं करतां येऊं नये— चिटणीस, ऊर फाटून जातो तो यामुळं—

**( कवाली )**

**रागा मुकुंद आला ॥ नाशा काल–व्याळ टपला ॥ धृ० ॥**
**द्यावा हात परिजनाला ॥ तो हात काय तुटला? ॥ १ ॥**
**बसला डंख या जिवाला ॥ माथां कां भुजंग टपला? ॥२॥**

**चिटणीसः**—मासाहेब, हा परिस्थितीचा प्रताप! मावळमराठ्यांचं नांव आज भोंसल्यांच्या पराक्रमामुळं महाराष्ट्र सांगत आहे, हें विसरून चालणार नाहीं! कलमदानाची तरवार करण्याचा काळ असता तर बळवंतराव मेल्या पायांनीं आणि तुटल्या हातानं असा शेवटचा मुजरा करायला येताच ना! स्वार्थत्याग नी स्वामी-सेवा हें बापजाद्यांनीं बाळकडूं पाजलं;—तेवढाच मार्ग देवानं आज खुला ठेवला आहे! येतों आम्हीं—

**राणीः**—चिटणीस–चिटणीस–डोळ्यांतलीं येतीं आसवं मागं घ्या! दुबळ्या छत्रपतींची राणी हीं मोतीमोलाचीं आसवं मातीला मिळूं नयेत म्हणून पदरांत झेलून घ्यायला तयार आहे! चिटणीस, तळमळून, आंतड्याला पीळ पडून निघालेले हे अश्रु या भूमीला करपून टाकतील!

**चिटणीसः**—अरेरे, दैवा काय लिहिलंस हें नशीबीं? मासाहेब, अशा जिव्हारीं झोंबणाऱ्या बोलानं चाकराचा दुबळेपणा नका जाणवूं त्याला! माझ्या राजस राजांच्या

डोळ्यांतला एक अश्रुबिंदू पुसायला आमच्या सारख्यांच्या रक्ताचं शिंपणं झालं-म्हणून काय हरकत? जा-शांत रहा;-या जन्मीं पुन्हां पायांची सेवा या नशिबीं आहे कीं नाहीं भवानीला माहीत;-असो अथवा नसो;-केल्या सेवेंत गुन्हा घडला असला तर चिटणीसांला एकवार माफ करा! पुन्हां बळवंतराव पायांशीं विनंति नाहीं करणार—

**राणी**:—बळवंतराव, बाबा, छत्रपतींच्या जिवांत जीव असें तों छत्रपती चिटणीसांची चाकरी विसणार नाहींत! प्रसंग सर्वांवरच बिकट आहे! आज तुम्ही चालला; उद्यां कदाचित् आम्हीही पाठोपाठ येऊं!-पण चिटणीस, निरोप घेतांना लहान जीव वडिलांचा आशीर्वाद मागतात; खरं ना? मग जायच्या आधीं लेकीला शेवटला आशीर्वाद नाहीं कां देणार? ( नमस्कार करते. )

**चिटणीस**:—आहाहा! मराठ्यांच्या माऊली, माझ्या मुली, ऊठ! काळाचा काळ आला तरी राजांची, छत्रपतीच्या या वंशाची कीर्ती अखंड राहील!

**प्रताप**:—( प्रवेशून ) त्याचबरोबर, चिटणीस, भोंसले चिटणीसांचं प्रेम अखंड राहील!! ( भेटतात ) चिटणीस, आसवं ढाळायला आतां कुणालाच अवसर नाहीं! एका हातानं डोळ्यांतलीं येतीं आसवं निरपून, दुसऱ्या हातानं पुढं उभ्या असलेल्या काळाला हात दिला पाहिजे! या जातिभेदानं महाराष्ट्राचं वाटोळं केलं! चिटणीस, तुम्ही चालला, दिवाण गेले-आणि आम्हीही मागोमाग आहोच!

**चिटणीस**:—नका. मायबाप असं अभद्र बोलूं नका!

**प्रताप**:—आतां अभद्र आणि शुभ यांत कांहींच फरक नाहीं चिटणीस! आजच्या छत्रपतीच्या दृष्टीनं जें अशुभ तेंच उद्यांच्या छत्रपतीच्या दृष्टीनं शुभ आहे! आप्पासाहेब बाळाजींना केलं कारस्थान फळाला आलं म्हणून हर्षवायु झाला असेल!

**चिटणीस**:—कुणाचीं नावं कशाला घ्या? गादीच्या कल्याणाकरतां अशीं जिवावरचीं दिव्यं गादीच्या चाकरांनीं करावींत आणि दौलतीला बरकत यावी असाच आजवरचा दाखला आहे हुजूर!—

**राणी**:—आणि म्हणूनच कां चिटणीस आज सैन्याच्या फितुरीसारखे भलते आरोप आपल्यावर ओढून घेऊन मरणाच्या दावणीला जात आहेत?

**चिटणीस**:—गादीच्या कल्याणाकरतां; पूर्वजांच्या अब्रूकरतां!

**प्रताप**:—जिथं नोकर राजाच्या तोलानं मरतो तिथं राजानं कुत्र्याच्या मोतीनं मरावं? चिटणीस, छत्रपतीकरतां, राजाराम महाराजांच्या जिवाकरतां, खंडोबानं



**प्रतापसिंहः**—त्याचबरोबर चिटणीस, भोंसले चिटणीसांचं प्रेम अखंड राहील !

—[ पृष्ठ ४८ ]

पोटच्या पोराला मुसलमान केला! राजाराम राजांना चंदीतून सोडवतांना, कमावलेली दौलत शिर्क्यांच्या हातीं सुपूर्त केली!- कोणतीं दिव्यं चिटणीसांनीं करायचीं ठेवली? राजाच्या तोलानं मेला, एक राजा संभाजी—

**चिटणीसः**—नोकर बेहराम झाले म्हणजे राजांना असं मोलाच्या मरणानं आत्मयज्ञ करावाच लागतो!

**प्रतापः**—आणि तसाच आत्मयज्ञ करण्याचा आमचा निश्चय आहे! छत्रपती निर्दोष, निष्कलंक असतांना, या कारस्थानीं डावाला आज बळी पडत आहे! स्वार्थी तेढीनं आमच्यावर आमच्या दर्जाला कमीपणा आणणाऱ्या अटी लादल्या जात होत्या! पण शिवाजी महाराजांनीं स्थापन केलेली ही गादी अशा भिकारी लाचारीनं आम्हाला नकोच होती! त्यांनीं भिक्षा मागून गादी मिळवली नाहीं ते आम्ही त्या पुण्यप्रतापी गादीकरतां आजही भिक्षा मागूं!

**चिटणीसः**—म्हणूनच राजा, तुझ्या पायीं घरादारावर तुळशीपत्रं ठेवतांना आनंदाच्या, उत्साहाच्या उकळ्या येतात!

[ रंगो घाईनं प्रवेशतो. ]

**रंगोः**—बाळासाहेब, प्रसंग आला;—मायभवानीचं नांव घ्या नी सिंहाच्या छातीनं वाड्याकडं निघा! सरकारशिपाई दाराशीं खडे झाले!

**चिटणीसः**—ठीक आहे! चिटणीसांची मायभवानी रक्ताच्या थेंबथेंबांत संचारून सांगते कीं चिटणीसाला काट्याच्या पिंजऱ्यांत उभा केला किंवा चुनकळीच्या खड्यांत जिवंत जाळला, तरी मेंदूत बुद्धीचा किरण कायम असें तों छत्रपतीच्या गादीशीं बळवंतराव राजनिष्ठच राहील!

**प्रतापः**—बळवंतराव, प्रतापी चिटणीसांच्या बच्चा, माझ्या एकनिष्ठ सेवका, मोलाचं मरण आणि निष्ठेचं देणं देऊन चिरंजीव झालास आणि तुझा राजा—तुझा राजा आज जिवंत असून मेलेला ठरला! ये—एकदां कडकडून भेट! म्हणजे उद्यांच्या प्रसंगाला मराठ्यांच्या राजाच्या तोलानं, उत्साहानं आम्ही तोंड देऊं! ( भेटतात ) आहाहा! आमचे जिवलग सरकारला गुन्हेगार वाटून, देखतां डोळा त्यांना ओढून न्यावं?—नाहीं—सहनच होत नाहीं हें! आम्हीच केलेला तह आम्हांलाच असा बंधनकारक होईल असं वाटलं नवतं!

**चिटणीसः**—महाराज, मासाहेब, येतों—पण जातांना हा चिटणीसांचा सोयरा रंगो, आपल्या हातीं निरवून जातों! कृपेंत अंतर पडूं देऊं नये! रंगो, चिटणीसांचा

सोयरा आहेस विसरूं नकोस! राजांची राजवटी हसावी म्हणून ज्या चिटणीसांच्या संतूनं हिरकणी खाऊन प्राण दिला, त्या चिटणीस घराण्यांतील कन्येचा हात तुझ्या हातीं आहे! चिटणीसांचा सोयरा राजांच्या पडत्या काळीं राजाशीं दगलबाज ठरला असं होऊं देऊं नकोस! राजांना तुझ्या निष्ठावंत हातीं निरवून आमच्या भविष्याकडं जातों। आतां भेट—?

**रंगोः**—पुढच्या जन्मीं! राजांच्या कृपेंत, या देवरूपांची सावली होऊन राहीन! पण–निष्ठेंत अंतर पडूं देणार नाहीं! जा; वेळ गमावूं नका। आल्या मरणाला तयार झालंच पाहिजे!—

**चिटणीसः**—राजा–मासाहेब–छेः पाऊलच उचलत नाहीं!

**प्रतापः**—जा, रोमरोमांत स्वामीप्रेमानं फुलून गेलेल्या देवदूता जा–आणि या अभागी राजाचं गाऱ्हाणं देवादारीं ने! बाळपणीं या भोंसल्यांच्या कच्चाबच्चांना बापाच्या प्रेमानं ताटांतले दूधभाताचे घांस घातलेस त्याचा मोबदला, हा अभागी राजा आज तुला रक्तामांसाचे हे घांस चारून देत आहे!– जा—

**चिटणीसः**—दयाळा–दयाळा–विसरा या चाकराला—( जातो )

**प्रतापः**—आहाहा! गेला–गेला–जन्माचा सोबती, प्रेमाचा पिता, छत्रपतीचा खरा मालक छत्रपतीकरतां बंदिखान्याकडं निघून गेला आणि आम्ही स्वतंत्र? रंगो, शरीरानं बंदिवान होणारे चिटणीस आज कर्तव्य करून स्वतंत्र झाले आणि आम्ही छत्रपती असून या लाचार जीवनानं बंदिवानापेक्षांहि बंदिवान ठरलों! नाहीं–यापुढं इथंच राहिलों तर अविचार होईल आमच्याकडून! रंगो–कुठंतरी शिकारीला चला! हृदयांत सळसळणारी हिंस्र वृत्ति कुठं तरी शांत करूं द्या! राणीसाहेब, या एकनिष्ठ सेवकाला सद्गति मिळावी म्हणून भवानीची प्रार्थना करा! (रंगो व प्रताप जातात.)

**राणीः**—चिटणीस आपल्या उपकारांची फेड करायला छत्रपतीची ही जाती दौलत कशी पुरणार? या कंगाल राणीचे हे दोन गरीब अश्रु आपल्या पायीं वाहते! भिकारी,–दुबळ्या छत्रपतीवर रागावूं नका बरं!

[ रागः–**मांड. केरवा.** ]

**ठेवा गुणधना! लोभा नतजनां ॥ धृ० ॥ नरपति फसला; देश बुडाला ॥ राजा कशाचा? प्रेमाचा हो जीवजिव्हाळा ॥ होता आम्हाला ॥ १ ॥**

( जाते. पडदा पडतो. )

५१

## प्रवेश ३ रा

[ स्थळः—राजवाडा एक खाजगी महाल. रंगो प्रवेश करतो ]

**रंगोः**—शिकेमोर्तब चोरीला जातात नी त्या चोरींत जवळचे आश्रित सांपडतात! कोतवाल सुद्धां साथीदार! हें कारस्थान अगदीं जिवाशीं भिडलं! शिकेमोर्तबाच्या जिवावर वाटेल ते खोटे नाटे पुरावे तयार झाले असतील! राजांच्या सुटकेचे सारे मार्ग बंद झाले असतील! काल महाराजांना साहेबांनीं दिला निकाल कायमचाच असावा!—सारी राजवट भुतासारखीं अंगावर चालून आल्याप्रमाणं वाटतें!

[ रागः—कामोद. झपताल. ]

**फिरला जरि मुरारी ॥ अंधार झाला! ॥ नच मार्ग यशकारी ॥ धृ० ॥ खल प्रबल भारी ॥ सजला नृपारी ॥ विष वमे विखारी ॥ विधि त्या न तारी ॥ १ ॥**

( बजाजी येतो )

**बजाजीः**—हुजूर, कांचन दिलारा बाहेर हजर आहेत——

**रंगो०ः**—जा, त्यांना पाठवून दे आंत आणि कोतवालालाही बोलावून आण! जा—( बजाजी जातो. ) धन्याच्या घराला चूड लावणारे बदमाष पुढं येणार नी मेल्या जिभेत रंगो त्यांना सवाल करणार? ( दिलारा कांचन प्रवेशतात ) कोण—कांचन? कुळी सज्जन तुमची! राजाश्रयावर पोसलेले म्हणून दालतीचे असे पिंड पाडायला तयार झालात?

**कांचनः**—सरकार, निवळ तोहमत ही——

**रंगो०ः**—खबरदार बदमाष खोटी जबान हालेल तर! बजाजीला आम्ही आज ओळखीत नाहीं! शिक्के बजाजीनं चोरले, कोतवालानं पकडले आणि या दीडदमडीच्या रांडरानं—गांवाबाहेर पोहोंचवले काय?

**कांचनः**—तें मी काय सांगूं हुजूर?

**रंगोः**—तें तुला कसं सांगता येणार? दिलाराच्या मुक्यामिठ्यांनीं तुझी जबान बंद झालेली! बोल दिलारा बोल, राजांच्या वैभवाचा सूर्य कलला असला तरी अजून तुझ्यासारखी शेंकडों घुंगुर्टी जाळून राळ उडवतां येतील! बोल—काय खरी हकीकत?

**दिलारा**:—बातमी खरी ! धाकट्या सरकारांच्या नादानं नी बाळाजीपंताच्या सांगीनं मीच तें यांना करायला लावलं !

**कांचन०**:—( बाजूस ) अरेरे–ऐनवेळीं अगदी केसानं गळा कापला कीं हिनं ?

**रंगो०**:—ऐक-ऐक कर्मचांडाळा ऐक ! अरे जातिवंत मांग सुद्धां खाल्या दूधभाताला जागतो रे–पण तूं ?– दिलारा, आप्पासाहेब महाराजांनीं तुला मोठं बक्षीस दिलं असेल नाहीं ?—

**दिलारा**:—काय सांगूं ?–तें मला राणी—

**रंगो**:—किती भोळी पोर आहेस तूं ? नक्षत्रासारखी देवगुणी साध्वी पत्नी असतांना ज्यांनीं लाथाडली तें तुला जवळ करणार ? करतीलही कदाचित्–! या विपरीत काळांत काय होणार नाहीं ? ( बजाजी कोतवालासह येतो )–कोतवाल, किती इमानानं चाकरी करतां हो ? आज थोरले सरकार तुमचा गौरव करणार आहेत !

**कोतवाल**:—म्हणजे ? हा बजाजी मुद्देमालासह पकडला ना हुजूर !

**रंगो०**:—मग मुद्देमाल कुठं आहे ?

**कोतवाल**:—तो जप्त केलेला माल आहे !

**रंगो०**:—राज्याचे शिक्के आणि शहरचा शिपुर्डी शिपुर्डी जप्त करणार ! लाज नाहीं वाटत बेशरम बडबडायला ? काळ्याचे पांढरे केलेस ते ही घरफोडी करायला ? बापजाद्यांचं नांव मराठा सांगतोस नी ही कसाबकरणी ? पाक कुळीचा मराठा असा चुडीनं वाघ घरांत घेत नाहीं ! बोल–या बदमाषांना तूं साथी होतास कीं नाहीं ?

**कोतवाल**:—मी ओळखीतहि नाहीं यांना—

**रंगो०**:—डोळ्यांच्या खांचा केल्या म्हणजे दिसूं लागेल ! लांबलेली जीभ छाटून थोडी बेताची केली म्हणजे सीधा जबाब येईल ! छत्रपतींच्या सत्तेचा इतका बोजवारा—?

**कोतवाल**:—सरकार—

**रंगो**:—चूप बदमाष ! बजाजी, या तिन्हीं देशबुडव्यांना काढणी लाव, नी महाराजांच्या दर्शनी घेऊन चल—

**तिघे**:—सरकार, गुन्हा कबूल—( पाय धरतात )

**कांचन**:—सरकार, माफ करा–मी आपले पाय—

**रंगोः**—माझे पाय धरशील तर तुला पाप लागेल! चल हो दूर! ब्राह्मण पडलास, दिलारा स्त्री पडली, नाहीं तर लाथेच्या ठोकरीखालीं असली देशबुडवी कमजात अवलाद चिणून टाकली असती! बजाजी—

**राणीः**—( प्रवेशून ) शांत-रंगो, बजाजी शांत रहा! गुन्हा झाला, नेकीचे नेकजात फिरले, रक्ताचा संबंधसुद्धां ओळखीनासे झाले तिथं या गरिबांना काय म्हणून छळायचं? घर फिरलं म्हणजे घराचे वासे सुद्धां फिरतात! पोटापायीं आगळीक घडली असेल!

( रागः-कानडा. त्रिवट )

**जनिं कोंदला, व्यामोह सारा ॥ विटल्या जनां जग हा पसारा! ॥ ध्रु० ॥ यशनाश हो कटु काल येतां ॥ हतभागि जीवां, नच शांतिथारा ॥ १ ॥**

छत्रपतींच्या या मावळत्या वैभवांत, बिचाऱ्यांच्या आठवणींत राहील अशी सजा देऊन, अपयश कां घ्यायचं? रंगो उदारपणा छत्रपतीच्या या आत्मत्यागाला अधीक भूषण देईल! दिलारा जिवलग मैत्रीणीप्रमाणं वागवली तुला!—जा—तुला सजा करायची आमची इच्छा नाहीं!

**रंगोः**—मासाहेब, असल्या सापांना पोसून—

**राणीः**—आतां अधीक कोणता विखारी डंख राहिला रंगो? गादीवरून खालीं आलों! यांच्याच बरोबरीबरीनं आतां छत्रपतींच्या गादीला आपण मुजरा करायला हवा! छत्रचामरांचे दिवस गेले! जा, कांचन, कोतवाल, जा तुम्ही;—येत्या छत्रपतींना तरी असे नाडूं नका! (कांचन, दिलारा व कोतवाल मुजरा करून जातात.) बजाजी—

**बजाजीः**—सरकार!

**राणीः**—काय देणार तुला? जन्मानं भिकारी पण नेकीनं बादशहा ठरलास! छत्रपतींच्या प्रेमाचं सिंहासन, आमच्या प्याऱ्या आश्रिता तुला बहाल आहे!

**बजाजीः**—आहाहा, मासाहेब—मासाहेब, धन्य धन्य झालों मी! याचवेळीं हा बजाजी आनंदानं, अभिमानानं असा नाचत उडत असतांना, मरून कां जात नाहीं?

**रंगो०**:—बेटा, खाशांच्यावर याही पेक्षां भयंकर संकटं यायची असतील! त्यांच्या खांद्याशीं खांदा लावणारा बजाजी इतक्यांत देवांदरबारी नेऊन कसं चालेल?

**बजाजी**:—मासाहेब, या गरीब लेकराला या जन्मीं अंतर देऊं नका एवढीच हात जोडून मागणी आहे! बजाला नाहीं ना दूर करणार? आई, खाशांच्या करतां तुम्हां देवांच्या पायांवर या देहाची खांडोळी होऊन पडतील पण बजाजी इमाना-पासून ढळणार नाहीं.

**राणी**:—देव तुला खाशांची रखवाली करायला उदंड आयुष्य देवो! जा, भवानीची आज आम्ही स्वतः पूजा बांधणार असं वाड्यांत कळीव!

**बजाजी**:—आज्ञा हुजूर— ( जातो )

**राणी**:—रंगो—

**रंगो**:—मा—

**राणी**:—सातारा सुटणार बरं आपल्याला! आज याच हेतूनं भवानीची ही शेवटची चाकरी आम्ही करणार! रंगो, खाशांना आजवर अंतर दिलं नाहींत—यापुढं—

**रंगो**:—मासाहेब, कां ही शंका? याच पायांची आण घेऊन सांगतों कीं खाशांना याच राजवटींत छत्रचामराखालीं पुन्हां आणीन, झाला अन्याय दूर करण्याकरतां साता समुद्रापलीकडं हनुमंताच्या धडाडीनं जाईन, आणि पदरीं निराशाच आली तर हें सातारचं गाऱ्हाणं देवाघरीं नेईन—पण तसलं काळं तोंड आपल्याला किंवा सातारला नाहीं दाखवणार!

( राग:—**बागेश्री. त्रिवट** )

**प्रभूपदीं जाय काया लया॥ कुणा असुलोभ हा?॥ धृ०॥**
**प्रबल करणि करि नर नारायण॥ मोल ना ये वाया जिवाला॥ १॥**

**राणी**:—अशीं देवाच्या मोलाचीं माणसं असतांना काळानं चोरपावलीं दगा दिला!—जीव रात्रंदिवस जळतो तो यामुळं!

**रंगो**:—मासाहेब, परिस्थितीची तळमळ दिव्य पराक्रमाची जन्मदात्री असते! छत्रपतींचा हा राज्यसंन्यास, उद्याच्या महाराष्ट्राला स्वातंत्र्याचा दिव्य राजमुकुट उत्पन्न करून देणार नाहीं कशावरून?

**राणी**:—तुमच्या तोंडीं साखर पडो! उद्याच्या महाराष्ट्राकरतां हा एकच काय असल्या शेकडों आत्मयज्ञांच्या पर्वण्या येतील तर आम्हीं स्वतःला धन्य मानूं!

रंगो, आल्या प्रसंगीं चित्ताची शांतता किंचितहि ढळूं देऊं नकोस अशी अंबिकेजवळ आपण भीक मागूं !—चला——

( रागः—देस. त्रिवट )

**दे जये ! शुभदायी अभय आई ! ॥ तव पदिं भार जिवाचा ॥ धृ० ॥ सुचे रुचे कांहिं न या हृदया ॥ घोर घोर प्राणपाश कलिचा ॥ १ ॥**

( जातात. पडदा पडतो. )

---

## प्रवेश ४ था

[ **स्थळः**—सातारा. गोलवडी. आप्पासाहेब एकटेच तंबूबाहेर विचार करीत आहेत. ]

**आप्पा०ः**—सूर्य मावळूं लागला आणि हृदयांतल्या पुण्याईच्या ज्योती मालवूं लागल्या कीं काय असं वाटतं ! आज बुवामहाराज कैद होणार ! साताऱ्चा सिंह आज पकडला जाणार !—यांत पाप तर नाहीं ? पुण्याहून येणाऱ्या पलटणीच्या पावलांचे आघात कानीं आले आणि त्याच तालावर "आपासाहेब, कुलाचा नाश करूं नकोस" असा पडसाद अन्तरीं उठूं लागला ! बुवामहाराज, आपल्या पश्चात् आपल्या गादीला पाय लावतांना आप्पासाहेबांना आनंद होईल कीं दुःख वाटेल हें या मनःस्थितींत आम्हांला अजमावतांच येत नाहीं ! पण पावलोंपावलीं आमची नालायकी आमच्या नजरेस आणून आपण हरदम आमच्या हृदयाला दुखवता ना तर आप्पासाहेब या पातकाला तयार झाला नसता ! भावाच्या मानेवर सुरी; हें पातक समजत असून आम्हांला माघार घेतां येत नाहीं !

[ रागः—**मिश्र. झपताल** ]

**थोर कुलसंपदा, होय लय; काय कटु काल अजि येत हा ? ॥ धृ० ॥ गुणवंत राजा ॥ जरि लोककाजां ॥ चुकतां प्रलय होत ॥ ही शापबाधा ॥ १ ॥**

( पडद्यांत ब्यूगल ) ही सैन्याला इशारत ! कसा सुटूं या पेंचातून ?—कोण—बाळाजी ?

**बाळाजीः**—( प्रवेशून )— होय हुजूर ! सूर्य मावळला—

**आप्पा०**:—होय–बाळाजी हा सूर्य मावळला आणि सातारचाही सूर्य थोड्याच वेळांत मावळणार !

**बाळाजी**:—त्याला काय करणार? न्यायदेवता आंधळी असते! बुवा-महाराजासारख्या कर्तबगारावर हा प्रसंग! पण कर्तबगारीचा तोल झुकून, मार्ग चुकला कीं अशी आपत्ति यायचीच! हा इंग्रेजी न्याय म्हणजे अग्नीचा अवतार आहे! चुकून पाय पडला तरी दाह व्हायचाच !

**आप्पा०**:—पण बाळाजीपंत, हे डाग, हे सख्या भावाच्या हृदयावर द्यायचे डाग आमच्याकडून न देतां—

**बाळाजी**:—म्हणजे हुजूर? आज वाणीचा झोक कांहीं निराळाच दिसतो! गांठ इंग्रेज बहादुराशीं आहे! ऐनवेळीं चुकवाचुकव केलेली इंग्रेज बहादुरांना पटणार नाहीं!

**आप्पा०**:—हरकत नाहीं; पण या मानसिक यातना आणि बुवामहाराजांचा नाश जर टळत असेल—

**बाळाजी**:—फार उशीरा हा बुद्धिवाद आपल्याला सुचला ! आतां आपण माघार घेतलीत तरी बुवामहाराज तर वाचत नाहींतच पण त्याच्याच दावणीला आपणही जाल ! सरकार, यावेळीं हृदयाची शांतता ढळूं देऊन कसं चालेल? महत्वाकांक्षा आपपरपणा विसरते हुजूर !

**आप्पा०**:—पण बळवंतराव, उद्यां जनता काय म्हणेल? "बंधुघातकी नराधम" म्हणून भोसल्यांच्या इतिहासांत आमचं नांव अजरामर होईल ना?

**बाळाजी**:—नाहीं हुजूर! उपकारकर्त्या इंग्रेजबहादुरांशीं विश्वास घातानं वागणाऱ्या जुलमी राजाला आपण योग्य तोच मोबदला दिलात असंच सारी जनता म्हणेल! चला–वेळ गमावूं नका! साहेब वाट पहात असतील आपली! मेजर क्रिस्टल पलटणी घेऊन निघालेही असतील !

**आप्पा०**:—पलटणी निघाल्या! बाळाजीपंत, खरोखरच नाहीं कांहो माघार घेतां येणार? आजचा प्रसंग उद्यांवर नाहीं कां टाकता येणार!

**बाळाजी**:—उद्यांचा दिवस आजच आणतां नाहीं कां येणार, असा इंग्रेजी मुत्सद्यांचा नेहमीचा प्रश्न असतो! सरकार, बाळाजीला इतक्या मिनतवारीनं आपलीं आर्जवं करण्याचं कारण आहे असं कां आपल्याला वाटतं? हें प्रकरण आपण उपस्थित केलंत आतां तें आपणांलाच तडीला नेलं पाहिजे!–माझं काय? आपण नाहीं येत

म्हणालांत तर तसा निरोप साहेबांना सांगायचा ! साहेबांचा निरोप पुन्हां आपणां-कडं पोहोंचवायचा ! परिणामाकडं लक्ष देण्याची निरोप्याला काय जरूरी ? इतक्या निस्वार्थ बुद्धीनं वागावं तरी जग " नीच देशबुडवा " म्हणून आम्हाला म्हणणा-रच !–मग काय ? जाऊं ?

**आप्पा०:**—थांबा–बाळाजीपंत–आम्ही दिशाभूल होऊन भडकल्याप्रमाणं झालों आहोंत–तुम्हींच आमचा तोल सांवरा ! मायेचं तुमच्याशिवाय आतां कोण आहे आम्हांला ?

**बाळाजी:**—हुजूरची बुद्धि बृहस्पतीलाहि लाजवील ! अद्याप शहरची नाके-बंदी व्हायची आहे ! उशीर झाला तर साहेब रागावतील !–चलावं–साऱ्या पातकांचा भार या बाळाजीच्या शिरीं टाकून आपण निश्चिंत चलावं !—

( जातात. पडदा उघडतो. )

---

## प्रवेश ५ वा

[ **स्थळ:**—सातारा. राजवाड्यापुढील पटांगण. रंगो व बजाजी प्रवेशतात. ]

**रंगो:**—बजाजी, इमानी सेवक आहेस, हाडाचा मराठा आहेस ! छत्रपतीच्या कुडीचा पाहरा आज तुला करायचा आहे ! पण लक्षांत ठेव, आजचा प्रसंग धारेशीं तकदीर घासण्याचा नाहीं ! येईल त्या प्रसंगाला मान झुकवण्याचाआहे !

**बजाजी**—सरकार, या देवडीवर राजांच्या राजवटींतली शेवटची चाकरी करतांना बंदा हुकमाला चोर ठरणार नाहीं !

**रंगो:**—ठीक आहे ! आम्ही कबिल्याची व्यवस्था पाहून येतों–पण ते पहा, महाराजच आले !

**प्रताप:**—कोण रंगो ? किती रात्र झाली ? आज डोळ्यावर झापडच चढेना ! पलीकडच्या झाडावर मघां घुबडानं घूत्कार केला ! वेळ चमत्कारिक वाटतो रंगो !–

**रंगो:**—मनीं वसे तें स्वप्नीं दिसे म्हणतात ! हुजूर, जें जें व्हायचं असेल तें होऊन जाईल ! काळजी करण्यांत मतलब नाहीं ! सरकार, दोन प्रहर रात्र उलटून गेली असावी !

**प्रताप**:—आणि तरी तुम्ही जागे? आम्ही जागे म्हणून आम्हाला दोषं देतां आणि स्वतः जातीनं तीच कृती करतां? (पडद्यांतून "घूत्कार") रंगो, तो ऐका–पुन्हां–घुबडाचा घूत्कार!

**रंगो**:—प्रतापी राजांनीं अशा पशुपक्षांच्या शकुनावर दिलदरियाची शांतता कां ठेवावी हुजूर?

[ रागः–**सारंग. त्रिवट.** ]

**प्रभुराज सेवकां आनंद ॥ ध्रु० ॥ प्रकटत अवचित पालनवाला ॥ सदय सदा भगवंत ॥ सेवकां ॥ १ ॥**

**प्रताप**:—आमच्या बापजाद्यांनीं शकुनवंतीच्या ताळमेळावर भवानी चालवून दौलत कमावली! आज अपशकून सुरूं झाले! रंगो, येत्या प्रसंगाला आम्ही भीत नाहीं; पण कुणाच्याही हातून अत्याचार होऊं नये अशी आमची शेवटची इच्छा आहे! छत्रपतीच्या या शेवटच्या इच्छेविरुद्ध, आमच्या निष्ठेपायीं कुणीही अत्याचार केला तरी सुद्धां आम्हाला मृत्यूच्या यातना होतील!– आज सेनापती कुठं आहेत?

**रंगो**:—त्यांचाच पत्ता नाहीं म्हणून थोडी शंका येते! आज इंग्रजी सैन्य पुण्याहून आल्यापासून सेनापती दिसेनात—

**प्रताप**:—रंगो, जातीचा मर्द, छातीचा शेर, पोलादी मनगटाचा बाळासाहेब कदाचित् येत्या प्रसंगानं बेभान होईल! बलाबलाचा विचार त्याच्या उसळत्या रक्ताला राहणार नाहीं! तुम्ही सावध असा; आणि सेनापती भेटतांच त्यांना त्याच घडीला आम्हांकडं पाठवून द्या!

**रंगो**:—आज्ञा हुजूर! रंगो इथं खडा असेतों अत्याचार होणार नाहीं! खात्री ठेवावी! मी कबील्याकडं जाऊन येतों; तोंपर्यंत स्वारीनं थोडी विश्रांति घ्यावी!–बजाजी देवडीवर आहेच!

**प्रताप**:—ठीक आहे! भवानीच्या मनीं असेल तें झाल्याशिवाय कसं राहील?

[ रंगो, बजाजी मुजरा करतात. प्रताप जातो. ]

**रंगो**:—बजाजी, स्वारी हवालदिल आहे! गाफील राहूं नकोस!

**बजाजी**:—बजाजी जिवंत असेतों काळाला सुद्धां फिरकूं देणार नाहीं हा बजाजी!

[ एका बाजूनें जातात. दुसऱ्या बाजूनें बाळाजीपंत व आप्पासाहेब येतात ]

**बाळाजी**:—सरकार, आतां पुढं आपणच झालं पाहिजे! छत्रपतीची जागा आपणच दाखवावी! इतरांना ती कशी समजणार?

**आप्पा०**:—पण नेहमींची जागा आज बुवासाहेबांनीं बदलली नसेल कशावरून? बाळाजी, प्रसंग विकट आहे! आज सेनापती खास रिसाला घेऊन कुठं गडप झाला आहे! ही बातमी खात्रीची आहे!

**बाळाजी**:—सरकार, आपल्याला तेंच पाहिजे! सेनापतीकडून एक आवाज आज निघाला तर सारा राजवाडा आज जमीनदोस्त करायला इंग्रेजबहादुरांना काय अवकाश लागणार? पुण्याहून तीन पलटणी इतक्या तातडीनं कशाला बोलावल्या असत्या?

**आप्पा०**:—पण बाळाजीपंत, भावाच्या रक्तानं रंगलेली गादी आम्हाला नको आहे!

**बाळाजी**:—आतां या म्हणण्याचा काय उपयोग?—आपली आतां इच्छा असो वा नसो, छत्रपति इंग्रेजसरकारचे कैदी आज झालेच पाहिजेत!

**ओव्हान्स**:—( प्रवेशून ) बाळाजीपन्ट, हायनेश कूटं हाय? आमचा मेजर क्रिस्टल कंपनी बराबर टैयार है!—टूमी सेंट्रीला जाऊन पूछो!—

**बाळाजी**:—हांजी सरकार! महाराज, आपण थोडे जवळ रहा! वेळ पडलीच तर आपण थोडं पुढं व्हावं!

( ओव्हान्स व आप्पा जातात. )

**बाळाजी**—काय रे—कोण आहे पहाऱ्यावर?

**बजाजी**:—कां?

**बाळाजी**:—महाराज केव्हां निजले?

**बजाजी**:—आपण कोण?

**बाळाजी**:—त्याशीं तुला काय करायचं आहे?

**बजाजी**:—मग महाराजांशीं तुम्हाला तरी काय करायचं आहे?

**बाळाजी**:—तेढा जाब देऊं नको! मुकाट्यानं महाराज कुठं आहेत तें सांग!

**बजाजी**:—आधीं तुम्हीं कुठले बादशहा तें सांगा!

**बाळाजी**:—ओळखत नाहींस मला?

**बजाजी**:—आज महाराजांच्या पायांशिवाय प्रत्यक्ष बापालाही ओळखणार नाहीं हा बजाजी!

**बाळाजी**:—लाथेनं ठोकरून आंत जावं लागेल!

**बजाजी**:—धन्यांकारणीं देह पडला तर देहाचं सोनं होईल! पण बजाजी जिवंत असतांना त्याला ठोकरून जाणार?—

**बाळाजी**:—होय होय! मुकाट्यानं दूर हो असा या बाळाजीपंताचा तुला हुकूम आहे!

**बजाजी**:—काय? बाळाजीपंत? धन्याच्या गळ्यावर सुरी फिरवणारा बाळ्या?

**बाळाजी**:—हुकूम मानतों कीं नाहीं?

**बजाजी**:—अरे जारे! ठोकरून देतों असले हुकूम!

**बाळाजी**:—जीभ उपटून काढावी लागेल!—चल हो दूर—

( त्याचा हात धरतो. )

**बजाजी**:—हरामखोर, छत्रपतीच्या चाकरावर हात? इथल्या इथं असा गळा दाबून घेऊं प्राण? उपटूं जीभ?—( गळा दाबतो )—महाराजांनीं आज्ञा केली रे—नाहीं तर—

**बाळाजी**:—अरे धांवा-धांवा—मेलों—मेलों—

**आप्पा**:—( प्रवेशून ) कोण बदमाष बाळाजीवर हात टाकतो?

**बाळाजी**:—( सुटून )—नोकरसुद्धां शिरजोर—

**बजाजी**:—कोण? हुजूर?—अरेरे—काय हें—

**आप्पा**:—सरकारस्वारी कुठं आहे?

**बजाजी**:—काय सांगूं सरकार! हातची समशेर बजाजीच्या देहात म्यान करा आणि मग असले प्रश्न विचारा—

**बाळाजी**:—खास, वाड्यांतच आहेत! साहेब—धांवा—धांवा—

**सेनापती**:—( प्रवेशून ) हा तुझा बाप इथं खडा आहे! कारवाया करून छत्रपतींचं रक्त प्यायची इच्छा आहे!—बोल—फोडूं नरडं? घेऊं नरडीचा घोट?

( नरडें दाबतो )

**बाळाजी**:— धावा—धावा—सेनापती—मेलों—

ना. ५५

**ओव्हान्सः**—( सैन्यासह प्रवेशून ) कौन ? शेनापती बलाशाब ?–पकरो उस्कू–

**सेनापतीः**—सेनापतीच्या हातीं पोलाद शस्त्र असे तों काय माय व्याली आहे कुणाची पुढं यायची ?

**ओव्हान्सः**—Major Cristal, " To Arms ! "

**क्रिस्टलः**—Troop, Allert, Guns ready !

[ सैन्य बंदुकी रोखतें ]

**सेनापतीः**—एकाव्या बाळासाहेबाच्या छांतीवर या नळ्या रोखून काय होणार ? छत्रपतीचा रिसाला बांगड्या भरून बसलेला नाहीं !–मर्द जवान, चलो–समशेर चला देव—

( रिसाला समशेरी उपसून चाल करतो. )

**ओव्हान्सः**—Major, Fire !

**क्रिस्टलः**—Troop !

[ राणी प्रवेशून ]

**राणीः**—खबरदार !–साहेब, भावोजी, काय हा अविचार ? भावोजी, मराठ्यांचे बरकंदाज जर रणांगणाला इतके हपापले होते तर वीस वर्षांमागं, छत्रपती बंदींत असतांना, त्यांची समशेर निजली कां होती ?

**सेनापतीः**—मासाहेब, भोसल्यांच्या कबिल्याचा गोषा झुगारून दिलात आणि अशा ऐन वेळीं आडव्या आलांत ? काय करूं ?–' मा ' म्हणून आज्ञा पाळून बांगड्या भरूं कीं–नाहीं–मासाहेब, कोणताहि युक्तिवाद यावेळीं सेनापतीला पटणार नाहीं !–काय नाहीं दूर होत ?–वहिनी–वहिनी–हातीं धरून दूर करावी लागेल आतां—

**राणीः**—या–समशेरजंग–ते सोहाळे एकदां होऊं द्यात ! परक्यांच्या देखत महाराणीची आज्ञा, छत्रपतींचा सेनापती पाळत नाहीं हें तरी सर्वांना दिसूं द्या—

**सेनापतीः**—मासाहेब, असल्या बेहिमती मरणानं मरायला कां सांगतां ? त्यापेक्षां ही हातची समशेर घ्या नी खुपसा या छातींत ! दावेदारांच्या गुलामगिरींत जन्म गुजरण्यापेक्षां धन्याहातीं त्याचा शेवट झाला तर सेनापतीला तेवढा तरी आनंद होईल !— ( तरवार फेकतो. रंगो प्रवेशतो. )

**रंगोः**—शांत–सेनापती–शांत व्हा ! कांहीं बलाचा विचार ? आपल्या एका आवाजाबरोबर समोरच्या शेकडों बंदुका कडाडतील ! या राजरूपांच्या देहामांसाचा

चिखल होईल इथं! उद्यां चिल्यापिल्यांचा किलबिलाट "राजे दाखवा–राजे दाखवा" म्हणून टाहो फोडूं लागला म्हणजे या मातीच्या ढिगाकडं कां बोट दाखवायचं? छत्रपतींची तपश्चर्या फोल ठरेल ना?—

**सेनापती:**—चल दूर हो! बायकी भ्याडबुद्धीनं सेनापती दबकणार नाहीं त्याचप्रमाणं तुझ्यासारख्या बेहिमती नादानाच्या शब्दानं पुढचं पाऊल रोखून धरणार नाहीं! मर्दहो–घ्या भवानीचं नांव–नी करा काटाकाट सुरूं—

**रिसाला:**—जय भवानी! हरहर महादेव!

**क्रिस्टल:**—Troop, Allert! Guns Ready!

**प्रताप:**—(प्रवेशून) सबूर, बेदर्द मराठा सबूर! कुणाची समशेर नी कुणाच्या हुकमानं रोखली जाते? बाळासाहेब, आमच्या हुकमाविगर काय हा तमाशा?

**सेनापती:**—भोंसल्याचं अन्न शांत बसूं देईना हुजूर!

**प्रताप:**—तर मग हातचं पोलादी पातं खुपस या छत्रपतीच्या छातींत!–छत्रपतीचा सेनापती सिंहाच्या दुधाचा आणि गादीचा मालक मेंढीच्या मेल्या दुधानं पोसला गेला असं कां तुला वाटतं?

**सेनापती:**—मग काय करूं–राजा–काय करूं?

**प्रताप:**—खुपस ती तरवार या छातींत!–वीस वर्षांपूर्वी याच इंग्रजांच्या गोटांत एकटे असहाय असतांना आम्हांला निशस्त्र व्हायला फर्मावलं! बावीस इंग्रजांची पोलादी पातीं छत्रपतीच्या छातींत घुसण्याकरतां एकजात बाहेर सरकलीं! पण छत्रपतीच्या हातची समशेर सुटली नाहीं कीं गर्दन पुढं झुकली नाहीं, ती या, या पोलादी मनगटांत पराक्रम नव्हता म्हणून? आज तुझ्यासारखे हिमतबहाद्दर पाठीशीं खडे असतांना आम्ही शस्त्रसंन्यास करतों याचं कारण?

**सेनापती:**—काय समजणार?

**प्रताप:**—हा राजसंन्यास तत्वाकरतां आहे! विकाराकरतां नाहीं! चल फेक; दे फेकून ती तरवार! तुझ्या राजाचा, छत्रपतीचा तुला हुकूम आहे! (सेनापती तरवार टाकतो) काय हुकूम आहे साहेब?

**ओव्हान्स:**—बॉंबे गव्हरमेंटच्या हुकमानीं टूमी आमचे कैडी हाट!

**प्रताप:**—हा मी तयार आहे! आतांच पोषाख करून येतो—(जाऊं लागतो)

**बाळाजी:**—(बाजूस ओव्हान्सला) साहेब,–पळून जातील कदाचित्!

**ओव्हान्स:**—सबूर! टूमाला आटा जाटा येनार नॉय—



**प्रतापसिंह:**—सबूर, बेदर्द मराठा सबूर ! —[ पृष्ठ ६१ ]

१२२८
नाटक.

**प्रतापः**—अरेरे—छत्रपतीचं वैभव संपल्यानंतर, त्याचीं लाज राखणारीं वस्त्रं सुद्धां त्याला मिळूं नयेत? पण राजाच्या उघड्यानागड्या अब्रूवर देवाशिवाय अशा-वेळीं कोण पांघरूण घालणार?

**बजाजीः**—( शालजोडी आणून देतो ) सरकार, ही शालजोडी तरी पांघरावी!

**प्रतापः**—आहाहा—बजाजी, बजाजी, बेटा खरोखरच देवानं कां तुला पाठवलं माझ्या देवदूता—या भिकारी राजाचा देव म्हणून कृतज्ञतेनं तुझ्या पायावर डोई ठेवावी असं वाटतं!

**बजाजीः**—सरकार, असे शब्द ऐकवण्यापेक्षां बजाजीच्या मेंदूचा पायीं चिखल होऊं द्या म्हणजे बजाजी खरोखरच देवलोकीं जाईल!—बजा जाणाऱ्या येणाऱ्यांच्या नवसाला पावेल!

[ नमस्कार घालतो. ]

**प्रतापः**—ऊठ—बजाजी—आमच्या बंधूच्याही मोठेपणाला लाजवलंस आज! आमच्या नागड्या अब्रूवर पांघरूण घातलंस—! मराठा असून या ब्रह्मकर्मानं ब्राह्मण ठरलास—पण—हा—बाळाजी! अरेरे—न्या आम्हाला इथून—

**ओव्हान्सः**—पकरो उस्कू!—( प्रतापला पकडतात ) ओ बालाशाव शेना-पतीला पकरो—

**बाळाजीः**—बसवा छत्रपतींच्याच शेजारीं—

( बाळासाहेबाला पकडतात व पालखींत छत्रपतींच्या शेजारीं बसवूं लागतात. )

**सेनापतीः**—निमकहराम बदमाष, राजाच्या गादीला पाय लावणाऱ्या निमक-हराम अवलादीचा बाळासाहेब नाहीं! छत्रपतींच्या शब्दाकरतां मघां तरवार फेकली पण आतां मात्र मुडदे पडतील!

[ अंगावर धाऊन जातो, रंगो मधें येतो ]

**रंगो०ः**—सेनापती, समशेरजंग, मनोवृत्तीवर जय मिळवायचा हा प्रसंग आहे—

**प्रतापः**—बाळासाहेब, छत्रपतीच्या रक्ताची आण आहे अविचार करशील तर! रंगो—कबिले सांभाळून आणा! आप्पासाहेब, येतों, आम्ही! प्रजेला लेकराप्रमाणं सांभाळा येवढीच शेवटची सांगी आहे तुम्हांला! मायभवानीला आमचा शेवटचा प्रणाम सांगा! [ जाऊन पालखींत बसतात. ]

**ओव्हान्स व सैन्यः**—Hail Britania!!—

—अंक ३ रा समाप्त—

# अंक ४ था

## प्रवेश पहिला

( स्थळः—सातारा, भवानीचें देऊळ. रंगो प्रवेशतो )

**रंगोः**—साताराचा इतिहास संपला ! बुवामहाराज कैद झाले ! जगांत सत्याचा न्याय असतो कां ? नीच्यांच्या डंकानौबदी झडूं लागाव्यात आणि जातिवंतांनीं तोंड दडवून अज्ञातवास पत्करावा ! काळाचीच इच्छा विपरीत तिथं मानवी मनसुबा कसा साधणार ? " माझा राजा, माझा राजा " म्हणून सारी प्रजा चौमुलखीं आतां टाहो फोडील ! जनतेच्या हृदयसिंहासनावर बुवामहाराज अजूनही आहेत हें आप्पा-साहेब आपल्याला कसं दिसत नाहीं ! आपण साताराचं सिंहासन मिळवलंत, पण मावळमराठ्यांच्या हृदयांतलं प्रीतीचं सिंहासन कायमचं गमावलंत !-काय करूं ? जगदंबे-माझ्या राजाच्या या अज्ञातवासांत मी कोणता मार्ग धरूं ? रामाला चौदा वर्षांच्या वनवासांनंतरच्या मुक्ततेची तरी आशा होती पण माझा राम-आजन्म वनवासी; जगदंबे-तुझीच तर तशी इच्छा नव्हती ना ? हीं पुण्यपावन शिक्के मोर्चेलं,-आपांच्या हातीं, आणि तीही माझा राजा जिवंत, निर्दोष असतांना ? नाहीं-सहनच होणार नाहीं हें !-नुसत्या कल्पनेनं माथ्याचा अंगार उडाला ! छत्रपतीची ही राजचिह्नं छत्रपतीजवळच असलीं पाहिजेत ! ( हातीं शिक्केमोर्चेल घेतों ) पण ही चोरी ! ही चोरी कां ? ही स्वराज्याची, राष्ट्राच्या स्वातंत्र्यचिन्हांची चोरी करतांना रंगो चोरच काय पण खुनी बदमाष ठरला तरी रंगोला धन्यताच वाटेल ! ( पडद्यांत चाहूल ) कोण ? आप्पासाहेब-बाळाजीपंत सुद्धां ! अरेरे, घात झाला. लपूं तरी—

( देवीआड लपतो. आप्पासाहेब बाळाजी येतात. )

**आप्पा०:**—बाळाजीपंत, भवानीच्या मंदिरांत पाऊल टाकलं खरं पण आमची वृत्ती एकदम बेचैन झाली ! याच भवनीपुढं " साताराचा छत्रपती " म्हणून मुजऱ्याला मान लववतांना, बुवामहाराजांची आठवण येते ! आशिर्वादा ऐवजीं भवानी

आमच्या या नादान कृतीबद्दल आम्हांला शापवाणीच ऐकवील कीं काय अशी भीती वाटते ! भोसल्यांचा कुळक्षय तर नाहीं ना होणार आमच्यामुळं ?

**बाळाजीः**—बुवामहाराज गेले म्हणून सातारच्या दगडाधोंड्यांनासुद्धां पाझर फुटला आहे हुजूर ! पण करणार काय ? इंग्रेजी न्याय ! पोटच्या पोराला सुद्धां सोडवतां यायचं नाहीं यांतून ! जगदंबा भवानीचं दर्शन घेतलं म्हणजे मन शांत होईल हुजूर !

**आप्पा:०**—आतां शांतता कुठली मनाला ? ही एकसारखी लागलेली हुरहूर आम्हांला मरेपर्यंत यातनाच देणार ! कोणती वस्तु बुवामहाराजांची आठवण देणार नाहीं ? प्रत्येक वस्तुंतून " बुवामहाराज, बुवामहाराज " असा ध्वनि उमटल्याचा भास होतो !–भवानीलाच आमची दया आली तर–( नमस्कार करतो. रंगोला पहातो ) कोण–कोण ते ?

**रंगोः**—छत्रपतींचा चाकर !

**आप्पाः०**—कोण रंगो ? बेटा, छत्रपतींना कुठं सोडलंस ? आणि या शापित नगरींत एकटाच असा देवदूतासारखा कां फिरतोस ?

**बाळाजीः**—छत्रपतींचे लोक अद्याप इथं वावरतात ? सरकार, साहेबांना हें कळलं तर त्यांना काय वाटेल ?

**आप्पाः**—त्यांना काय वाटेल याची पर्वा आम्हीं मुळींच करीत नाहीं ! अंतर्यामींच ज्वालामुखीचा भडका उडाल्यानंतर बाहेरच्या आगीला कोण विचारणार ?–रंगो–रंगो–बुवामहाराज आम्हांला क्षमा करतील कांहो ?

**रंगोः**—हुजूर, बुवामहाराज मूर्तिमंत शंकराचा अवतार आहेत !

**आप्पाः०**—त्यांच्या पायांवर डोई ठेवून केल्या पातकांची माफी मागावी असं वाटतं ?–पण तें हातीं काय ?

**रंगोः**—शिक्केमोर्तेल–छत्रपतींची शेवटचीं राजचिन्हं !

**आप्पा:०**—आणि तीं न्यायलाच कां इथं आलास ? पण तेंहि बरोबरच आहे; या नामधारी छत्रपतींच्या राज्याला या पुण्यप्रताप राजचिन्हांची जरूरी नाहीं !

**बाळाजीः**—म्हणजे हुजूर ! रंगो ही राजचिन्हांची चोरी करीत आहे !

**रंगोः**—बनावट पुरावे तयार करण्याकरतां शिक्केमोर्तबांची चोरी करण्यापेक्षां, या राजचिन्हांच्या पावित्र्याकरतां केलेली ही चोरी अधीक सोज्वल आहे !

**बाळाजीः**—चोरी ती चोरी! रंगो, छत्रपतींच्या मागं, त्यांच्या जिवलग आश्रितांवर वाईट प्रसंग येऊं नये अशी आमची इच्छा आहे! शिक्केमोर्तबाची चोरी हा राजद्रोह आहे!

**रंगोः**—देव सोडून दगडाला मुजरा करण्याकरतां रंगोचा जन्म नाहीं!

**बाळाजीः**—आप्पासाहेबांना, छत्रपतींना दगड म्हणतांना, रंगो, दगडाखालीं चिणून जावं लागेल अशी भीती नाहीं वाटली तुम्हाला?

**रंगोः**—माझ्या खऱ्या राजाकरतां उभा सोलून निघालों तरी रंगोच्या बहात्तर कुळींचा उद्धार होईल?

**बाळाजीः**—शिक्केमोर्चेल खालीं ठेवतो कीं नाहीं!

**रंगोः**—साफ नाहीं! शिक्केमोर्चेल रंगो खालीं तर नाहींच ठेवणार पण तुह्मां सर्वांदेखत, राजरोस अशी घेऊन जाणार!

**बाळाजीः**—खबरदार! इथल्या इथं गिरफदार व्हावं लागेल! शिक्केमोर्चेल खालीं ठेऊन माफी माग असा बाळाजीचा तुला हुकूम आहे!

**रंगोः**—हुकूम! आई भवानी आणि देवाच्या तोलाचा माझा राजा, यांच्याशिवाय रंगोची गर्दन कुणापुढंही झुकत नाहीं!

**बाळाजीः**—अस्सं?– रंगो–तर मग तुम्ही आमचे कैदी आहांत!

**आप्पा०**—आणि आप्पासाहेब जिवंत असतांना? बाळाजी, केलात येवढा पराक्रम पुरे नाहीं कां झाला? शिवछत्रपतींच्या मोर्चेलांचा वारा घेण्याची आमची लायखी नाहीं! जा–रंगो–खुशाल जा! राजांना सांग कीं आप्पांचा तोल झुकला, पण आप्पा आपला पायीक आहे!

**बाळाजीः**—शेवटीं असं यश बांधलं आमच्या पदरीं? हुजूर राजकारण विसरले;–आम्हीच शहाणपणाला विसरून इथं पाय ठेवला!

**रंगोः**—हुजूर! येतों–दयालोभ असूं द्यावा. (जाऊं लागतो) अरेरे–साताऱ्ची राजलक्ष्मी, नी अनवाणी? या साताऱ्च्या स्मशानांत शंकराला शोधण्याकरतां ही पार्वतीमाई तर नाहीं ना प्रकट झाली? बाळाजी, डोळे उघडून पहा, तुमच्या कारवाईनं आम्हां मावळमराठ्यांची ही भाग्यदेवता कशी कंगाल गाय झाली!

[ राग: भैरवी. कवाली ]

**कालि करीं सुधी गाय कां ॥-खलमनां दया येई कां ? ॥ ध्रृ० ॥ ठायिं ठायीं वधे वासरा ॥ जिव तिचा दिसे घावरा ॥ पान्हा सोडी आम्हां लेकुरां ॥ १ ॥ घार घाली निजां पाखरां ॥ निज मुखें जिवाचा झरा ॥ टोहो फोडीतसे आज कां ? ॥ २ ॥**

**आप्पा०:**—अरेरे—बाळाजी—बाळाजी पाहिलीत ही आमची भाग्यदेवता ? कृतांताचाही डोळा पाण्यानं भरून येईल !

**बाळाजी:**—काय—कबिले अजून इथंच ? बुवामहाराजांना तर इथं परत आणायचा विचार नाहीं ना ?

**आप्पा०:**—असं करणं जर अंगीं असतं तर तुमच्या सारख्यांच्या ओंजळीनं आम्हांला कां पाणी प्यावं लागतं ? ( राणी येते )—मा—मासाहेब—आप्पाला ओळखलं नाहींत कां ? पोराचा अपराध आईशिवाय कोण पोटांत घालणार ?

**राणी**—भावोजी, हें काय ? उठा ! छत्रपतींचं मस्तक आमच्यासारख्या अभाग्यांच्या पायदळीं पडण्याकरतां नाहीं ! आपली पायधूळ डोकीवर घेण्यांत मोठमोठ्या झुंजारांनासुद्धां भूषण आहे ! भवानीच्या मनीं होतं तसं झालं; वैराचं कारणच संपलं ! पण भावोजी, एक विनंति करूं कां ?

**आप्पा०:**—मासाहेब, आपला प्रत्येक शब्द भाल्याच्या टोकाप्रमाणं हृदयाला बोचून जातो ! काय आज्ञा आहे ?

**राणी:**—एकच ! जातांना भोसल्यांच्या कुलस्वामिनीची एकदा पूजा बांधायची आहे मनांतून ! पुन्हां मंगळाई आईचं दर्शनसुद्धां व्हायचं नाहीं आम्हाला ! कराल ना एवढी दया ? पुरवाल ना भावोजी एवढा हट्ट ?

**आप्पा०:**—आईसाहेब, बुवामहाराजांशीं वागतांना आप्पानं कसाबकरणी केली—आप्पाला आपण खाटीक कां समजूं नये ? पण देवाचे दरवाजे राजाच्या राजालाही बंद करतां येणार नाहींत !

**राणी**—उपकार झाले आपले ! भावोजी, आजदिन वागवण्यांत कुठं चुकलं असेल, तर उदारपणानं छत्रपतींना क्षमा करा ! त्यांच्या तामसी स्वभावानं आपलं

मन कितीदां तरी दुखावलं होतं;—मी पदर पसरून भीक मागते तिकडच्याकरतां ! विसराल ना आमचे अपराध ?

**आप्पा०**:—आपले अपराध ! आपले अपराध असें होतें कीं त्यानं या दगडाचा देव बनवला असता ! आप्पा पुण्याईचा पुतळा झाला असता ! पण आज—अरेरे—देवानं अमृताचा कुंभ हातीं देऊन, आम्हीं तो विषाच्या भावनेनं मातींत मिसळला ! हा आमचा अपराध मात्र आम्हाला विसरतां येणार नाहीं ! मा—मा—आपले हे शेवटचे बोल हृदयांत साठवून ठेवतांना, डोळे आसवांनं भरून येतात,आणि आपलं दर्शन अपुरं वाटतं !—मासाहेब, आपलं हें पवित्र रूप एकदां डोळेभरून पाहूं द्या ! आणि आपली ही पुण्यमूर्ती डोळ्यांवाटें हृदयावर उमटून आप्पानं डोळे मिटले कीं त्याला इथून जायची परवानगी द्या ! या पवित्र मंगल वेळेला एकहि कटु शब्द आम्हाला ऐकणं जड जाईल !—मा—मा, मासाहेब—येतों आम्हीं.

( रागः—**असावरी-त्रिवट** )

**नंदनवनिं मंगलमय नंदिनि विधिची अभिरामा ॥ गमे**
**भाग्यदेवी विचरे शुभकामा ॥ ध्रु० ॥ करीं माळ गुंफुनिया,**
**भावाजिवाची ॥ ओपिते स्वकुलां ॥ सौभाग्या नेई ॥ १ ॥**

**रंगो**:—बाळाजी, उभे कां ? मासाहेबांना शांतता पाहिजे, समजत नाहीं ?

**बाळाजी**:—होय समजतं ! ही शांतता फार वेळ अनुभवतां येणार नाहीं म्हणून मात्र दुःख वाटतं !—मासाहेबांनीं दर्शन लौकर आटोपून मार्गी लागावं !

**राणी**:—बाळाजी आजदिन आमच्या तोंडून कुणालाच कठोर शब्द गेले नाहींत ! आम्हाला याहि स्थितींत डिवचण्यांत तुम्हाला काय भूषण वाटतं ? आम्ही आमच्या कुलस्वामिनीची मनमुराद सेवा केली तर तीसुद्धां तुम्हाला रुचत नाहीं ! जा—कठोर शब्द आमच्या तोंडून काढवून—आम्हाला कमीपणा आणवूं नका !

**बाळाजी**:—धुळीला मिळाले तरी अजून पीळ ! ठीक आहे, जातों आम्ही; पण आमच्याहि हातून कांहीं भलतं सलतं होऊं नये अशीच वागणूक ठेवावी अशी विनंति आहे !

**राणी**:—कशाची भीती दाखवता आतां ? छत्रपतींना आतां भेडसावण्याचं सामर्थ्य कुणांतच नाहीं ! बाळाजी, छत्रपती समाजाच्या शेवटच्या पायरीवरून तुमच्या नीचपणाला, भवानीच्या साक्षीनं आव्हान देत आहे ! सांगा—कोणतं अन-

हित तुम्ही आमचं करणार? बंधांना कोणतं सुख शिल्लक असतं? छत्रपती तुमच्या कक्षेच्या बाहेरचे आहेत आतां! जा–चालते व्हा इथून! रंगो–बाळाजींना मंदिराबाहेर घालवा!—

**रंगोः**—बाळाजी–मासाहेबांचा हुकूम झाला! बाहेर व्हा—

**बाळाजीः**—ठीक आहे, बाळाजीचे हात फार लांब आहेत!

**राणीः**—पण ते छत्रपतीपर्यंत आतां खास पोंचणार नाहींत!

**बाळाजीः**—तेंही दिसेलच! ( जातो )

**राणीः**—रंगो, आज भवानीची सेवा होताच आम्ही मंगळाईच्या दर्शनाला पायींच जाणार! महाराष्ट्राच्या या राणीनं आजपासून आपला गोषा झुगारून दिला! आतां तरी आमच्या समदुःखी जिवांची ओळख आम्हाला होईल ना? आतां तरी आमचा आवडता महाराष्ट्र आम्हाला जवळ करील ना? जिव्हाळ्याच्या संयोगाच्या आड येणारा हा छत्रपतीचा मोठेपणा आम्ही सोडून दिल्यानंतर गरीबांचं हृदय ओळखणं राजाच्या राणीला अवघड नाहीं पडणार!

**रंगोः**—सरकार, महाराष्ट्राच्या हृदयाचं सिंहासन आपल्याला, या अलौकिक स्वाभिमानी स्वार्थत्यागी छत्रपतिला अयोग्य ठरेल! साऱ्या दुनियेच्या हृदयाच्या सिंहासनावर माझा राजा आतां विराजमान होईल! हा मूठभर मावळमराठा आपल्या जिवाची कुरवंडी करील आपल्यावरून!

**राणीः**—हें भाग्यवंताचें जिणं आम्हांला लाभलं, पण तें त्या तोलानं राखण्याचं धैर्य अंबाबाईनं आम्हांला द्यावं! जा–रंगो–पालखीची जरूरी नाहीं असं भोयांना सांगून किल्ल्यावर जायची तयारी करा–तोंपर्यंत आम्ही भवानीचं दर्शन घेतों—

**रंगो०ः**—आज्ञा हुजुर! [ मुजरा करून जातो ]

**राणीः**—भवानीचं दर्शन झालं! रोमरोमांत नवीन चैतन्याचा उत्साह खेळूं लागला! आनंद-आनंद झाला आम्हाला! राजा आणि प्रजा हा नात्याचा नाजुक बंध असतांना महाराष्ट्राचं खरं हृदय आम्हाला अनुभवतांच आलं नाहीं! तो अनुभवाचा प्रसंग आम्हाला आज आला! महाराष्ट्रांत छत्रपतींची सेवा मान्य केली! स्वाभिमानापायीं दौलतीचा संन्यास घेतांना महाराष्ट्राला देहानं आम्हीं मुकत असलों तरी प्रेमानं छत्रपतींचं हें मावळतं घराणं महाराष्ट्राशीं एकजीव झालं तें तुटणं शक्य नाहीं! प्याऱ्या महाराष्ट्रा नाहीं ना विसरणार आम्हाला!

[ रागः—भैरवी. त्रिवट ]

**प्रिय सदय आई ! देइ तव आशी शुभदायी ॥ विगत-विभवनृपकला नत तव पायीं ॥ धृ० ॥ मातृभू ! तुला जन हा मुकला ॥ विसर न यासि दयाळे ! ॥ १ ॥**

( जातात. )

---

## प्रवेश २ रा

( **स्थळः**—सातारा. दिलारा प्रवेश करते. )

**दिलाराः**—शेवटीं मीच मूर्ख ठरलें ! पुरुषांचा विश्वास कधीं कधीं ग ठेऊं नये बाई ! कशी कोणत्या वेळीं मान कापतील त्याचा नियमच नाहीं ! वरून कामापुरते तेवढे अगदीं गुल्गुल् गोड बोलतात आणि काम झालं कीं मेले उलटलेच ! त्यांतल्या त्यांत हे मेले मोठे तेवढे खोटे ! त्यांना शीलाची, अब्रूची, कश्शा कश्शाचीं चाड नसायची ! दिलारा राणी तर नाहींच झाली पण आतां जगेल कशी याचीच पंचाईत आली ! रडूं तरी किती ! पहावं तों मेला रडतच सुटला आहे !

**कांचनः**—रडण्यानं दुःख हलकं होतं ! पूजे परी पूजा सुटली दिलारा परी दिलारा निसटली ! दिसायला पाहिजे· यावेळीं;—आहेच कीं इथं ही गांवदेवी ! काय ग ए विजली, आतां पुढं काय ?

**दिलाराः**—पुढं काय ? खरंच कांचन आतां काय हो करायचं पुढं ? आप्पासाहेब गादीवर आल्यावर आपल्या शब्दाला जागतील असं वाटलं होतं ! पण आपल्या साऱ्या टोळीलाच त्यांनीं हाकलून दिल्याप्रमाणं केलं आहे ! ज्याचा त्याचा माझ्यावर दांत !

**कांचनः**—त्याला कोण बरं जबाबदार ? इतकी सुंदर झालीच नसतीस तर असा प्रसंग आलाच नसता तुझ्यावर ! थोरल्या राणीसाहेबांबरोबरच जावं असं एकदां वाटलं—पण त्या आतां कांचनाची सावलीसुद्धां पडूं द्यायच्या नाहींत ! तुझ्यामुळं हें असं झालं बरं !

**दिलाराः**—अस्स काय ? चोरी करतांना कुठं गेली होती अक्कल ! मी लाख सांगितलं चोरी करा—पण तुम्हाला नव्हता कां विचार !

नां. न. ८०५ ७६
१५-१५-३

**कांचनः**—याचं उत्तर जगांतल्या प्रेमी वीरांना विचार! माणूस प्रेम करायला लागला कीं अविचार करायला लागलाच! दिलारा, ही दुक्कल आतां कशी ग पोट भरणार?

**दिलारा:**—मी केला आहे विचार!

**कांचनः**—विचार? चुकतेस तूं! मरायची तयारी केली आहेस असं म्हण म्हणजेच जगायची युक्ति तुला सांपडली आहे असं मी म्हणेन! तूं प्रेमी आहेस ना वेडे—

**दिलारा:**—मी प्रेमी? वेडे आहात कांचन झालं! माझं कधींच कुणावर प्रेम नव्हतं! प्रेमाचा नी स्त्रीहृदयाचा कधीं मेळच बसत नाहीं! शब्दाला ऊत यायला लागला कीं प्रेमाला ओहोटी लागलीच असं समजावं!

**कांचनः**—धन्य आहे स्त्रीजातीची! देवबाप्पा, जन्मजन्मांतरीं सुद्धां मला स्त्रीचा जन्म देऊं नकोस! काय ठरवलं आहेस तूं—

**दिलारा:**—बजाजीशीं–हें कोण? कोतवाल वाटतं? हे कां डोळे पुसत येतात? सारा साताराच रडूं लागला कीं काय?

**कोतवालः**—( प्रवेशून ) काय करूं रे? तो भटजी नी दिलारा दिसायला पाहिजे? तुला सरदार करतों–मानकरी बनवते–अशा लंब्याचवड्या थापा मारून बनवलान् कीं मला! म्हाताऱ्या केसाला काळं फासलं! अक्कल असून बळी द्यायचा बोकड झालें आज! नोकरी गेली आणि हा वनवास पदरीं आला! (रडूं लागतो).

**दिलारा:**—कांचन, रडा हो रडा! समदुःखी आहोंत असं याला दाखवलं म्हणजे—

**कांचनः**—माझे अश्रु आटले आहेत ग बुलबुल्!

**दिलारा:**—मग बसा हंसतच! ( रडूं लागते )

**कोतवालः**—कोण? दिलारा? भटजी?–काय ग ए छुमछुम्! राजाची राणी होणार होतीस नाहीं! मला सरदारी–अरेरे–अग आतां काय तुझ्या नांवानं संन्यास घेऊं?

**कांचनः**—हां खबरदार! तुझं तिच्यावर कांहीं प्रेम नव्हतं संन्यास घ्यायला! प्रेमी माणसालाच संन्यासाचे विचार शोभतात! खबरदार संन्यास घेशील तर!

**कोतवालः**—अरे–काय म्हणूं रे तुला? तूंही तिचाच साथीदार! कोतवाल

असतो तर मुद्द्या गाढवावरून धिंड काढली असती तुमची ! कडेलोट केला असता पोत्यांत बांधून ! डोळे काढले असते तुमचे ! पण आज, डोळे असून आंधळा झालों ! अक्कल असून बेअक्कल ठरलों !

**दिलारा:**—संपला कां राग? सगळेच आपण फसलों तर आतां कुणी कुणावर रागवायचं?

**कांचन:**—आपण सर्वांनीं त्या बजावर रागवायचं ! त्यांनीं जर आपल्याला पकडलं नसतं तर आज आपण कुठं असतो ! त्याचीच खोड मोडली पाहिजे !

**कोतवाल:**—शाहणा आहेस ! आतां जगायचं असेल तर त्याचेच पाय धरले पाहिजेत ! तो जाणार आहे बुवामहाराजाबरोबर काशीला ! मी तर ठरवलंच आहे ! त्याचेच पाय धरून— (बजाजी प्रवेशतो)

**बजाजी:**—रामराज्य संपलं नी ही झोटिंगशाही सुरू झाली ! राम वनवासाला जातांना सारी अयोध्या मागं लागली म्हणतात ! आज सारा सातारा महाराजामागं वनवासाला तयार झाला आहे ! सारी रडारड सुरू ! हे कोण? कांचन, दिलारा, नी कोतवाल !–ही तिरंगी झडप आतां कुणावर पडणार?–कायरे–कोतवाल—

**कोतवाल:**—बजाजी–माझा देव भेटला मला ! बजाजी, म्हाताऱ्या केसांची तरी दया येईल कांरे तुला?

**बजाजी:**—तुझी दया? दया येण्याजोगं बेट्या काय रे केलं आहेस तूं ! असलं सडून कुजून गेलेलं पान लौकर गळून पडेल तितकं बरं ! आपत्ति तरी टळेल भोळ्या जगावरची !

**कोतवाल:**—अरे पण मी स्वतः भोळा होतों म्हणून तर या जोडीच्या थापांना बळी पडलों ना? बजाजी, अनाथावर दया करण्यांत पुण्याई आहे बरं !

**कांचन:**—दिलारा, पहा-हा नंदीबैल गेला बरं बजाकडं ! आतां जर कां यानं शिंग उलटवलं–तर फुकट—

**दिलारा:**—म्हणजे? अजून तुम्ही बजाजीशीं भांडायला तयार आहातच कां?

**कांचन:**—म्हणजे तूंही त्याच्याच बाजूची झालीस कीं काय?

**दिलारा:**—म्हणजे? अद्याप तुम्हाला शंकाच आहे कीं काय?

**बजाजी:**—म्हणजे मी शुद्धीवर आहे ना? कीं मला हें स्वप्न पडत आहे दिलारा, कोतवाल, तुम्ही माझी चेष्टा तर नाहीं ना करीत?

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें

**कोतवालः**—अरे उद्यांच्या काळजीनं छाती दीड हात आंत गेल्यावर—बेटा चेष्टा सुचेल कां रे ? तूं जर महाराजांच्यापर्यंत माझी दाद लावली नाहींस तर उपाशी मरेल ना रे हा म्हातारा !

**दिलाराः**—आणि बजाजी तरुणपणांत उच्छृंखलपणा होतोच नाहीं ? पश्चात्तापानं एकादां जर पुन्हां पवित्र होत असेल तर तेवढी सुद्धां संधि त्याला नाहीं कां द्यायची ? दिलारा चुकली, फसली;–पदरीं घेऊनच तिला एकाद्या उदारानं पावन नको कां करायला ? फुलांच्या संगतीनं मातीला सुद्धां वास लागतो ! परीसानं लोखंडाचं सुद्धां सोनं होतं !

**कांचनः**—वाग सोनुकले ! म्हणजे मी एकटाच इथं उपाशी मरणार कीं काय ? बजाजी, साऱ्यांनीं तुला शब्दानंच दयेची विनंति केली ! मी सदेह विनंति करतों कीं या गरीब ब्राह्मणाला जीव दान दे ! कांचनाच्या सात–पिढ्या तुझा टाक करून देव्हाऱ्यांत पुजतील रे बाबा ! ( साष्टांग नमस्कार घालतो )

**बजाजीः**—कांचन, दिलारा, अहो कोतवाल, ज्यांना खरोखरच महाराजांच्या बरोबर जायचं असेल त्यांना महाराज कधींच दूर करणार नाहींत ! ही तुम्हां कंगालांची माळका मी करतों त्यांच्यापुढं उभी ! मग तुमचं नशीब !

**कोतवालः**—महाराज उदार आहेत ! आमचे–अन्याय ते खात्रीनं पोटांत घालतील ! त्यांनीं ते राहतील त्या गांवची कोतवाली दिली तरी आपण खूष राहूं !

**कांचनः**—आणि आपणाला पूजेचंच काम मिळालं तरी आनंद मानूं ! काय करणार मग ?

**बजाजीः**—आणि तिथंही कांहीं असाच फंदफिसाद करून पुन्हां त्यांच्यावरच उठलांत तर !

**कोतवालः**— कोतवाली सोडून देईन !

**कांचनः**—पूजा करणार नाहीं जन्मांत !

**बजाजीः**—तें आपोआपच होईल ! तें कांहीं नाहीं ! तुम्ही एकमेकाला जामीन पटवाल तरच नेईन महाराजाकडं ! कांचन, तूं रहा कोतवालाकरतां जामीन आणि कोतवाल—

**कोतवालः**—कांचनाकरतां एका पायावर जामीन राहायला तयार आहे मी !

**बजाजीः**—ठीक आहे !–पण तुझी वाट ?

**दिलारा**:— माझी वाट दुसरं कोण लावणार? मला महाराजांच्याकडं जायचं नाहीं; राणीसाहेबांनाहि तोंड दाखवायचं नाहीं! याच एकनिष्ठ पुण्यवंताच्या सेवेंत उरलं आयुष्य घालवायचं आहे!

**कांचन**:—काय तूं याच्याशीं निका लावणार कीं काय? बजाजी, काय हें? अब्रम्हण्यम्! अब्रम्हण्यम्!

**बजाजी**:—यच्चावत् परधर्मीय स्वधर्मप्रसाराकरतां वाटेल त्या मार्गानं वागतात तर बजाजीनं मनानंच धर्मांतर केलेल्या एकाद्या परधर्मी जिवाला हात दिला तर त्यांत पाप काय झालं?

**दिलारा**:—किती गोड–किती किती गोड बोलायचं तें! राया–कुठं रे इतकी जादूगारी शिकलास? दिलाराला पदरांत घेतलीस पण तिला अंतर नाहीं ना देणार?

( राग:—**भैरवी. केरवा** )

**प्रिय सखया रे! सदया रे शरणा रे! दीन ही अबला॥**
**चरणीं ॥ धृ० ॥ तेजगोल धरि फेर शशीला॥–भाव**
**विरोधी दावी बाला॥ प्रणयरीत हचि होत, ये प्रचीत॥**
**हृदया रे! ॥ सतता रे! ॥ दीन० ॥ १ ॥**

( जातात )

---

## प्रवेश ३ रा

( **स्थळ**:—लिंब. एक गोठा. प्रतापसिंह एकटाच बसला आहे )

**प्रताप**:—प्रतापसिंहाचा अवतार संपला! उद्याचं महाराष्ट्राचें भेसूर चित्र डोळ्यापुढं उभं राहिलं! स्वार्थी पोटभरूंचा बाजार झालेला महाराष्ट्र जगांत कोणती मान्यता मिळवणार? आमचा हा राजसंन्यास आमच्या सुखाच्या दृष्टीनं कितीही कष्टप्रद असला तरी आमच्या महाराष्ट्रांत, जर त्यामुळं नवीन चैतन्य उत्पन्न झालं तर आम्हीं स्वतःला धन्य मानूं! कोण?–राणीसाहेब—

( राणी प्रवेशते )

**राणीः**—होय. धनी आपली अभागी स्वामिनी !

**प्रतापः**—राणीसाहेब, असलं अभागी भाग्य फारच थोड्यांच्या नशिवीं येतं ! त्यांत वाईट वाटण्याचं कारण काय? संकटामुळंच मनुष्याची किंमत वाढते ! आल्या स्थितीबद्दल वाईट वाटतं आपल्याला ?

**राणीः**—धनी, वैभवाच्या झळाळीनं भोसल्यांचे डोळे कधींच दिपले नाहींत ! स्वतंत्र राजमुकुट निर्माण करणारे कर्तबगार भोसले, असले राजमुकुट मातींतल्या कणाकणांतून वेळ आली तर निर्माण करतील, हा आत्मविश्वास आम्हांला आहे ! आणि म्हणूनच अभिमानाच्या करतां हा राजसंन्यास घेतांना आनंदच वाटत होता–पण !

**प्रतापः**—काय ? स्पष्ट बोला,–अंतरींचा उमाळा असा आंतल्या आंत दाबूं नका. आम्हाला यातना होतात !

**राणीः**—यातना सोसण्याकरतांच राजांचा जन्म असतो. धनी आपल्या राज-संन्यासाचा धक्का बसून गोजरा राजांचा वाखा—

**प्रतापः**—काय ? माझ्या गोजराची अकाली प्रसूती;–अरेरे–असा आघात या हृदयावर होईल असं वाटलं नवतं ! मनाची समता ढळूं लागते ती यावेळीं ! एक बाजूनं ही जिवलग जिवांची माया, आणि दुसरीकडून मराठ्यांच्या नेत्यांची जबाब-दारी आम्हाला हवालदील करते ! काय–करूं ?

**रंगोः**—( मोर्चेल चामरें घेऊन येतो ) काय करूं याचं उत्तर–सरकार–या पुण्यप्रतापी मोर्चेलांना विचारा !

**प्रतापः**—काय–काय पाहातों आम्ही ? शिवछत्रपतींची मोर्चेल ? साताऱ्यांतून निघतांना या वस्तूंचं आम्हाला दर्शनही झालं नाहीं. यांच्या दर्शनानं आम्हाला आल्याप्रसंगीं धीरानं वागण्याचं बळ येवो ! ( नमस्कार करतो ) रंगो, कशा मिळ-वल्यात या वस्तु ?

**रंगोः**—सरकार कसूर माफ–मी हीं चोरून–

**राणीः**—रंगो–ही चोरी नाहीं ! कोणत्या स्वार्थानं तुम्हीं ही चोरी केलीत? भोसल्यांच्या राजाला राज्यच्युत केल्याचा कलंक या चोरीनं नाहींसा होईल कदाचित् !

**रंगोः**—या पवित्र वस्तु आतां त्या शापभूमींत राहूं नयेत येवढ्याच हेतूनं–

रंगोनं हें धाडस केलं! त्यांतच आप्पासाहेब सरकारनीं रंगोला पाठिंबा दिला! आप्पासाहेब सरकारनां केल्या कारवाईबद्दल पुरा पश्चात्ताप होत आहे!

**प्रताप**:—काय, काय–ऐकतों आम्हीं?

**राणी**:—होय धनी! भावोजीनीं आपल्या अश्रुनं आपलं पातक धुवून टाकलं!–मराठ्यांचा छत्रपती जागा झाला!

**प्रताप**:—आहाहा! आप्पा–आपल्या तळमळीच्या एकाच अश्रूनं आपल्या पातकांच्या कोटी धुवून जातील! रंगो–कोणत्या शुभ मुहूर्तावर ही राष्ट्रीय चोरी केलीत? आम्हीं स्वतः महाराष्ट्राच्या या नव्या छत्रपतीला ही मोर्चेलचामरं नजर करून आमची गादी स्वखुशीनं त्यांना वहाल करीत आहों! परकी सत्तेला मराठ्यांचा राजा कधींच सिंहासनावरून खालीं ओढतां येणार नाहीं इतकं त्याचं सिंहासन महाराष्ट्राच्या हृदयांत अढळ आहे, हेंच आम्हीं दाखवूं!–आम्हीं आनंदानं या वनवासाला तयार आहोंत!–रंगो–बाळासाहेब सेनापतींना आप्पांच्या दिमतीला इथंच राहूं द्यावं—

( सेनापती प्रवेशतो )

**सेनापती**:—साफ नाहीं! हुजूर बाळासाहेबाचा पराक्रम वाटेल त्या दगडाची रखवाली करण्याकरतां नाहीं! सेनापती हुजुरच्या ताटांतल्या अन्नावर पोसला! यां साडेतीन हाताचा वळी हुजूरच्याच जिवाकरतां आहे!

**प्रताप**:—पण सेनापती, आप्पासाहेबांचं हित वडीलकीच्या नात्यानं आपणच नको का बघायला—

**राणी**:—शिवाय, भावोजी, जाऊबाईंना पुरे दिवस झालेले–वाटेच्या श्रमानं कांहीं भलतंच व्हायची भीती नाहीं कां? गोजराराजांच्या प्रकारानं भीती वाटते! आपल्यासारख्यांच्या कर्तबगारीनं मराठ्यांची गादी अखंड उजळ राहिली तर आम्ही कुठंही असलों तरी आम्हाला आनंदच होईल!

**सेनापती**:—मासाहेब, कुणाला या बायकापोरांच्या मोहाच्या गोष्टी सुनावतां? माझ्या राजाच्या जिवावरून या बाळासाहेबानं, पोराबाळांसह आपल्या देहाचं लिंबलोण उतरून केव्हांच फेंकून दिलं आहे!

**प्रताप**:—आहाहा! बाळासाहेब, बाळासाहेब, या हृदयाचं सिंहासन तुला पुरेल कां रे? समशेरजंग–या–हा महाराष्ट्राचा सिंह आमच्याच बाहूंत आम्हाला बंदिवान

करूं द्या ! नाहीं तर आमच्या लोभानं तुम्ही महाराष्ट्र रक्तानं रंगवून काढाल कदाचित् ! ( भेटतात ) सेनापती, आपला बेटा छत्रपतीचा वारस होईल !

**सेनापतीः**—आहाहा ! धन्य झालों मी ! बाळासाहेबांच्या बहात्तर कुळींचा उद्धार झाला ! सेनापतीचा बेटा, महाराष्ट्राचा खरा राजा झाला !

[ पडद्यांत तोफा शिंगें तुताऱ्या ]

**रंगो०ः**—ऐका महाराज, आप्पासाहेब महाराजाकडून आलेली शिबंदी वाटतं !

**राणीः**—आतां स्वाराशिबंदीची आम्हाला काय जरूरी ? कैद्याबरोबरचा पहारा त्याला मोठेपणा देत नाहीं !

[ बाळाजी येतो. ]

**बाळाजीः**—पण महाराज मुळीं कैदी नाहींतच ! इथून उठायचं नी काशी अलाहाबादला जाऊन बसायचं ! राज्याची दगदग वाचली ! आणि बाकी मुक्तताच !

**रंगोः**—राज्याची दगदग वाचली आणि तुमच्यासारख्यांची पीडाही संपली !— आतां तर काशीविश्वेश्वराच्या पायाशीं आपण नाहीं ना येणार ?

**बाळाजीः**—सेनापती जर आधींच पळून गेले असते—

**बाळासाहेबः**—खबरदार ! बाळासाहेब पळपुट्या अवलादीचा नाहीं ! हा पहा सेनापती तुझ्यासमोर खडा आहे ! काय पारिपत्य करायचं असेल तें करून घे !—

**प्रतापः**—शांत हो सेनापती !—बाळाजीपंत, छत्रपतीनंतर सेनापतीची आपल्याला तहान लागण्याचं कारण ?

**बाळाजीः**— त्यांना आपल्याबरोबर येतां येणार नाहीं !

**बाळासाहेबः**—कारण ?

**बाळाजीः**—नगरशेटचं किती देणं बुडवायचा विचार होता ?

**रंगोः**—तुम्हाकडं नगरशेटनं फिर्याद कां केली ?

**बाळाजीः**—तशी फिर्याद आली नसली तरी संस्थानच्या दर्जाकरतां आम्हाला हीं प्रकरणं पाहिलींच पाहिजेत ! तुम्हामागं आप्पासाहेब सरकारांना तुमच्या कारणीं किंचितही झळ लागतां कामा नये ! नगरशेटचं देणं दिल्याशिवाय सेनापतींना इथून हालतां येणार नाहीं !

**बाळासाहेबः**—नगरशेटचं एक कवडीचंही देणं मी लागत नाहीं, आणि इथं राहण्याच्या तुमच्या इच्छेला जुमानीतही नाहीं !

**बाळाजीः**—तुम्हाला सरकारी हुकमानं गिरफदार करावं लागेल !

**बाळासाहेबः**—बाळासाहेबांच्या प्रेतावरच असा अत्याचार तुम्हांला करतां येईल !—जा, साताऱ्यांतील सेनापतीच्या दौलतीचाच लोभ सुटला असेल तर खुशाल सारी स्थावरजंगम मिळकत सरकारजमा करा. पण माझ्या राजापासून हा देह जिवंतपणीं वेगळा होणं शक्य नाहीं !

**बाळाजीः**—आनंद आहे ! आम्हाला काय ? कुणीकडून तरी नगरशेटचं देणं द्यायशीं कारण ! आपल्या मिळकतीचा लिलाव करून त्यांचें देणं देऊं !—महाराज काशीला निघाले ! शंकरच आपल्या मूळ ठिकाणीं चालले ! पण सरकार—आप्पा साहेबांच्या राज्यारोहणाची ही साखर घ्यायला हरकत नाहीं ! (साखर देऊं लागतो)

**राणीः**—ही साखर देतांना बाळाजी तुमचे शब्द आम्हाला कितीही कडू लागले तरी आप्पासाहेबांच्या वैभवानं आम्हाला आनंदच होईल ! ( साखर घेतात )

**बाळाजीः**—दुःखांत सुख मानण्याचा हा एक प्रकार आहे झालं !

**प्रतापः**—तुम्हीं या स्थितींत आम्हाला चीड आणण्याचा कितीही यत्न केलात तरी आमची वृत्ति भडकणार नाहीं ! बाळाजी, हे पहा साहेबच आले आमची रवानगी करायला ! ( ओव्हान्स—क्रिस्टल येतात )

**ओव्हान्सः**—परटापशिमराजे, टूमाला आलाबाडला जावा लागल अशा गव्हरमेंटचा हुक्म है ! टूमचे बराबर आमचा मेजर क्रिस्टल येल !

**प्रतापः**—आतां काशी काय किंवा रामेश्वर काय, या देशाच्या फकीराला दोन्ही सारखीच ! आम्ही तयार आहोंत !

**बाळाजीः**—कां इतक्यांत इतका संन्यास ? इतका वैताग ? रंगोकडून कांहीं खटपट नाहीं वाटतं करायचा विचार !

**रंगोः**—रंगोच्या जिवांत जीव असे तों माझ्या राजाचा हा अन्याय जगापुढं मांडल्याशिवाय रंगो कधींच राहणार नाहीं !

**बाळाजीः**—तरी मला वाटलंच ! बुवामहाराज शांत कसे बसतील !

**प्रतापः**—आणि आम्ही शांत बसावं तरी कां ?

**बाळाजीः**—आप्पासाहेबांच्या करतां आपल्याला मुळींच वाईट वाटत नाहीं ना ? मग हा त्रागा कां ?

**प्रतापः**—तुमच्याकरतां, बाळाजी तुमच्या नीचपणाकरतां ! सातारच्या या

दुर्दैवी छत्रपतीच्या बाबतींत राजरोस न्यायाचा पाडलेला खून आम्ही जगासमोर आणल्याशिवाय कधींच राहणार नाहीं ! महाराष्ट्राचा हा राजा असा गोठ्यांत गाईच्या मोतीनं बांधला गेलेला जगाला दिसला नसेल पण रंगोसारख्यांची जीभ खऱ्या दुनियेला आमचं हें चित्र दाखवून देईल !

**बाळाजी:**—म्हणजे? रंगो आतां साताराप्रकरणीं दौऱ्यावर जाणार तर !

**रंगो:**—यांत बाळाजी तुम्हांला आश्चर्य कसलं वाटलं ?

**बाळाजी:**—परदेशगमनांत पाप असतं म्हटलं !

**प्रताप:**—राजाच्या मानेवर सुरी फिरवण्याच्या पापापेक्षां परदेश गमनाचं पाप कमीच ठरेल ! बाळाजी, हा सातारचा अन्याय विलायती समुद्राच्या लाटा-लाटांतून आम्ही बोलायला लाऊं ही खात्री ठेवा ! महाराष्ट्राच्या राजाचा हा सिंहनाद या महाराष्ट्रालाच नव्हे तर साऱ्या दुनियेला जागं केल्याशिवाय राहणार नाहीं !

**बाळाजी:**—आणि रंगोच्या प्रयत्नांना यश येऊन, दैवयोगानं अलाहाबादहून उचलून इंग्रेजबहादूरांनीं राजांना सातारच्या गादीवर बसवलंच तर राजे काय करणार ?

**प्रताप:**—आम्हीं राजे झालों तर काय करणार ? आम्ही राजे झालोंच तर प्रथम साऱ्या देशबुडव्यांचीं घरंदारं बेचिराख करणार ! आमच्या कर्तबगारीनं या महाराष्ट्रांत एकीचा असा एकच सूर घुमवणार कीं भगव्या झेंड्याखालीं उभा असणारा प्रत्येकजण स्वतःला हिंदूच म्हणवून घेईल ! त्यावेळीं या स्वराज्याची धूळ-धाण उडवणाऱ्या जातिभेदाला आम्ही मूठमाती देऊं ! आणि एक हिंदू आणि हिंदूच जात अवघ्या महाराष्टांत फैलावून सोडूं !

**आप्पा०:**—( धांवत येऊन ) आणि बुवामहाराज, आपण नसतांना सुद्धां, आपल्या आशीर्वादानं आम्हीं आपल्याच मंत्राची घोषणा भोसल्यांच्या गादीवरून करूं ! महाराज, आप्पा फसला, बुद्धिचा ताबा सुटला आणि या स्वार्थी देशबुड-व्यांच्या नादानं—असा चुकलेल्या वासराप्रमाणं आसऱ्या करितां सैराट सुटला ! महाराज, आपण क्षमा केल्याशिवाय मी हे पाय सोडणार नाहीं ! ( पाय धरतो )

**प्रताप:**—आहाहा ! आप्पासाहेब, वाईट वाटूं देऊं नका ! आम्हांला गादी-वरून खालीं यावं लागलं यांत कांहीं तरी आई भवानीचा चांगलाच हेतू असला पाहिजे ! आम्हींच आपल्या हातानं हीं छत्रपतीचीं राजचिन्हं आपल्या स्वाधीन करतों ! महाराष्ट्राच्या भाग्यवंता, स्वतंत्र बुद्धीनं राज्य कर !

( मोर्चेल–चामरें देतो. )

**ओव्हान्सः**—ओह् ! ये टो स्टेट सील ऑर मोर्चेल ! रंगोनीं चोरला टे ! परट आला टर !

**बाळाजीः**—पण न्यायाच्या दृष्टींनं आपल्याला रंगोची चवकशी केलीच पाहिजे !

**आप्पाः**—खबरदार बाळाजी ! सातारचे मालक आतां आम्हीं आहोंत ! ज्या दिवाणपदाच्या आशेनं तुम्हीं आम्हांला हा नीच मार्ग दाखवलात तें दिवाणपद तर नाहींच पण यापुढं सातारचं कोणतंही वरखुरं काम तुम्हांला सांगण्याची आमची तयारी नाहीं !

**बाळाजीः**—म्हणजे-साहेब–याचा अर्थ !

**ओव्हान्सः**—All right ! All right ! बलाजीपन्ट, टूमची व्यवस्था आमी करेल ! परटापशिम–कूच करनेकू टैयार रहो ! दो कलाकसे अंदर मार्च सुरूं होयेगा !

**प्रतापः**—आमची तयारी आहे ! रंगो, आम्ही अलाहवादला पोंचतांच तुम्हीं विलायतेकडे निघा ! विलायती जाणारा पहिला हिंदू बुद्धीनंही पहिलाच ठरला पाहिजे अशी कृती करा !

**रंगोः**—सरकारची महत्वाकांक्षा पूर्ण करायला जगदंबा समर्थ आहे !

**बजाजीः**—( प्रवेशून ) पण सरकार–जाण्याआधीं कांचन–कोतवालाचे विनंति-अर्ज आहेत ! पोटाकरतां धन्याचरणीं ते भिक्षा मागत आहेत !

**राणीः**—बजाजी, त्यांची आमच्या खाजगीकडं व्यवस्था करूं बरं ! दिलारालाही आमची इच्छा दुखवावयाची नाहीं !

**बजाजीः**—मुजऱ्याला सारे हजरच आहेत ! ( कोतवाल, कांचन, दिलारा येतात. मुजरा करतात )

**ओव्हान्सः**—मेजर क्रिस्टल !–येना टाब्यामंडी घेवा !–आच्छा–माराज, लोक, Good bye !

**प्रतापः**—नमस्कार साहेब ! आपल्याबरोबर आमच्या प्याऱ्या महाराष्ट्राला आमचा हा शेवटचा मुजरा ! वंदे मातरम् ॥

( ड्रॉप पडतो. )

॥ समाप्त ॥